रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌ आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ MH/MR/RGD/RNP-16/2018-21 (31-12-2022) ॥ वर्ष ८५ ॥ अंक २३४ ॥ पृष्ठे ८ www.krushival.in

अंबा नदीवरील जुना पूल तोडण्यास सुरुवात



पान ३ वर

# कृषीवल

रायगड ॥ सोमवार, दिनांक ३१ जानेवारी २०२२

किंमत ४ ₹

युवा टीम इंडिया सेमीफायनलमध्ये



पान ८ वर

## म ह त्त्वा चे

### लता मंगेशकर कोरोनामुक्त

**मुंबई :** गानसम्राज्ञी लता मंगेशकर कोरोनामुक्त झाल्या आहेत, अशी माहिती राज्याचे आरोग्यमंत्री राजेश टोपे यांनी दिली. कोरोनाची लागण झाल्यानंतर त्यांना मुंबईतील ब्रीच कँडी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. तिथे सध्या त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. लता मंगेशकर यांच्या प्रकृतीमध्ये सुधारणा होत असून, लता दिदींचे व्हेंटिलेटर काढलं आहे. उपचारांना योग्य प्रतिसाद देत आहेत, असे राजेश टोपे यांनी सांगितले.



### पेगाससप्रकरणी याचिका दाखल

**नवी दिल्ली :** पेगासस हेरगिरी प्रकरणी सर्वोच्च न्यायालयात नवी याचिका दाखल करण्यात आली आहे. २०१७ मध्ये झालेल्या भारत-इस्रायल संरक्षण करारावेळी भारताने पेगाससची खरेदी केल्याचे वृत्त न्यूयॉर्क टाईम्सने दिले आहे. त्यामुळे भारत इस्रायल संरक्षण कराराच्या चौकशीचे न्यायालयाने आदेश द्यावेत, अशी मागणी या याचिकेतून करण्यात आली आहे. ॲड. एम.एल. शर्मा यांनी ही याचिका दाखल केली आहे.

### नीरज बिश्नोईचा जामीन फेटाळला

**नवी दिल्ली :** दिल्लीतील न्यायालयाने बुल्ली बाई ॲपचा कथित निर्माता नीरज बिश्नोईचा जामीन अर्ज फेटाळला आहे. सार्वजनिक मंचावर विशिष्ट समुदायाच्या महिला पत्रकारांना शिवीगाळ केल्याबद्दल आणि अपमानित करण्यासाठी लक्ष्य केले होते. ज्याचा निश्चितच जातीय सलोख्यावर विपरीत परिणाम होणार आहे. अतिरिक्त सत्र न्यायाधीश धर्मेंद्र राणा यांनी नीरज बिश्नोईचा जामीन अर्ज फेटाळताना सांगितले की, गुन्ह्याचे स्वरूप, आरोपांचे गांभीर्य आणि तपासाचा प्रारंभिक टप्पा लक्षात घेता अर्जात योग्यता आढळली नाही आणि त्यानुसार याचिका फेटाळली जाते.

### हुडहुडी कमी होणार

**मुंबई :** येत्या दोन ते चार दिवसांत थंडीची लाट आणि थंडी हळूहळू कमी होण्याची शक्यता आहे. यासंदर्भातील अंदाज भारतीय हवामान खात्याने व्यक्त केला आहे. आएमडीने म्हटलं आहे की, वायव्य आणि मध्य भारतात थंडीची लाट हळूहळू कमी होण्याची शक्यता आहे. वायव्य आणि मध्य भारतातील बहुतांश भागात २ फेब्रुवारीपर्यंत कमाल तापमान ३-५ अंश सेल्सिअसने वाढण्याची व त्यानंतर घट होण्याची शक्यता आहे.

### प्रचार सभांवरील बंदी उठणार?


**नवी दिल्ली :** आगामी पाच राज्यांमध्ये होणाऱ्या विधानसभा निवडणुकांसाठी सध्या कोरोनाच्या वाढत्या संसर्गाच्या पार्श्वभूमीवर जाहीर सभा, रोड शो, पदयात्रांवर निवडणूक आयोगानं बंदी घातली आहे. या बंदीचा आढावा घेण्यासाठी सोमवारी निवडणूक आयोगाची बैठक पार पडणार आहे. यामध्ये ही बंदी कायम राहणार की उठणार यावर शिक्कामोर्तब होईल. निवडणूक आयोगाने जानेवारी २०२२ मध्ये सभा, पदयात्रा, रोड शोंवरील बंदी ३१ जानेवारीपर्यंत वाढवली होती. बंदीची ही डेडलाईन उद्या संपणार आहे.

# परीक्षा ठरल्यावेळीच होणार

*। मुंबई । वृत्तसंस्था ।*

*राज्यातील दहावी आणि बारावीच्या परीक्षा ठरलेल्या वेळीच होणार आहेत, असे स्पष्टीकरण रविवारी राज्याच्या शालेय शिक्षणमंत्री वर्षा गायकवाड यांनी दिले. सध्या दहावी, बारावी परीक्षांच्या वेळापत्रकावरून विद्यार्थी आणि पालकांमध्ये बराच गोंधळ आहे. त्यावर शिक्षणमंत्र्यांनी खुलासा केला. खोट्या बातम्यांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.*

> *ठरलेल्या परीक्षांच्या कार्यक्रमात कोणताही बदल करण्यात आलेला नाही. जे विद्यार्थी कोरोना काळात परीक्षेला बसू शकणार नाहीत, त्यांच्यासाठी सप्लिमेंट्री परीक्षा घेण्यात येणार आहे. शिक्षक संघटना, शिक्षणतज्ज्ञ, शाळांचे मुख्याध्यापक या सगळ्यांशी चर्चा करून आराखडा ठरवू.* – वर्षा गायकवाड



### दहावी आणि बारावीच्या परीक्षांचे वेळापत्रक

*इयत्ता दहावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांच्या प्रात्यक्षिक परीक्षा १४ फेब्रुवारीपासून सुरु होणार आहेत. तर प्रात्यक्षिक परीक्षा २५ फेब्रुवारी ते १४ मार्च या कालावधित घेतली जाणार आहे. तसेच इयत्ता दहावीची लेखी परीक्षा १५ मार्च ते ४ एप्रिलदरम्यान होणार आहे. इयत्ता बारावीची प्रात्यक्षिक परीक्षा १४ फेब्रुवारी ते ३ मार्च या कालावधित घेतली जाणार आहे. तर लेखी परीक्षा ही ४ मार्च ते ३० मार्चदरम्यान होणार आहे.*

### वर्षा गायकवाड यांचा खुलासा

### विद्यार्थी, पालकांमध्ये होते संभ्रमाचे वातावरण

वर्षा गायकवाड म्हणाल्या की, दहावी आणि बारावीच्या परीक्षांच्या आयोजनासंदर्भात कुणीतरी खोटी बातमी पसरवली होती. विद्यार्थी, पालक आणि शाळांनी त्यावर विश्वास ठेऊ नये. दहावी आणि बारावीच्या परीक्षा ज्या तारखेला आहेत, त्याच तारखेला घेण्याचा आमचा प्रयत्न आहे. पान २ वर

# भीषण अपघातात पाच ठार

। मुंबई । वृत्तसंस्था ।

जुन्या मुंबई-पुणे राष्ट्रीय महामार्गावर कार्ला फाट्याजवळील शिलाटणे गावच्या हद्दीत कार आणि कंटेनरचा भीषण अपघात झाला असून, त्यात पाच जणांचा जागीच मृत्यू झाला आहे. हा अपघात इतका भीषण होता की गाडीचा चक्काचूर झाला.

रविवारी सकाळी ७.३०च्या सुमारास हा अपघात घडला आहे. लोणावळा ग्रामीण पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, जुन्या मुंबई-पुणे राष्ट्रीय महामार्गावर लोणावळ्याहून पुण्याकडे भरधाव वेगात जाणाऱ्या इको कारच्या चालकाचे कारवरील नियंत्रण सुटल्याने भरधाव वेगात जाणारी कार दोन्ही मार्गामधील दुभाजक ओलांडून ती पुण्याहून मुंबईकडे जाणाऱ्या एका कंटेनरला जोरात धडकली. ही धडक इतकी भीषण होती की, कार कंटेनर खाली घुसल्याने कारचा अक्षरशः चुराडा झाल्याने कारमधील पाचही प्रवाशांचा जागीच मृत्यू झाला आहे.



कंटेनरवर आदळून कारचा चक्काचूर

अपघाताची माहिती मिळताच लोणावळा उपविभागीय पोलीस निरीक्षक राजेंद्र पाटील, लोणावळा ग्रामीण पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन बनकर व त्यांच्या सहकाऱ्यांसह, देवदूत आपत्कालीन पथक, आयआरबीचे कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी देवदूत आपत्कालीन पथक व आयआरबीच्या पान २ वर

# सात आरोपींना सहा दिवसांची पोलीस कोठडी



वडखळ सामूहिक बलात्कार प्रकरण

**। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।**

पेण तालुक्यातील वाशी येथील तरुणीवर बलात्कारप्रकरणी अटक करण्यात आलेल्या सात आरोपींना रविवारी कोर्टात हजर करण्यात आले. यावेळी त्यांना सहा दिवस पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश देण्यात आले.

पेण तालुक्यातील वाशी परिसरात धमकी देत १७ वर्षीय युवतीवर सामूहिक बलात्काराची अमानुष घटना घडली. याप्रकरणी सात जणांना पोलिसांनी ताब्यात घेतले. तर, आणखी पान २ वर

## पोलीस ठाण्यातून आरोपी पळाला

**। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।**

वडखळ पोलीस ठाण्यात हाफ मर्डरचा गुन्हा दाखल असलेला आरोपी पेण पोलीस ठाण्यात अटकेत होता. टॉयलेटला जाण्याच्या बहाण्याने त्याने पोलिसांच्या हातावर तुरी देऊन पळून जाण्यात तो यशस्वी ठरला आहे. या घटनेमुळे पेण पोलिसांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. पान २ वर

## अल्पवयीन मुलीवर अत्याचार

### आरोपीला दहा वर्षांचा सश्रम कारावास

**। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।**



१७ वर्षांच्या अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणी विशेष व अति सत्र न्यायाधीश शईदा शेख यांनी दि. २९ जानेवारी रोजी महत्त्वपूर्ण निकाल दिला. या खटल्यात शासकीय अभियोक्ता भूषण साळवी यांनी सरकारपक्षातर्फे कोर्टासमोर केलेला युक्तिवाद महत्त्वपूर्ण ठरला. सदर खटल्यात आरोपी विवेक विजय गावंड याच्यावर पोक्सो कायदा अंतर्गत गुन्हा दाखल होता. त्यातील पोक्सो कलम २०१२ नुसार कलम ३ व ४ प्रमाणे न्यायालयाने आरोपी विवेक गावंड यास दोषी पकडून दहा वर्षांची शिक्षा व रक्कम रुपये ५० हजार रुपये दंड व पान २ वर

# भ्रष्टाचार ही देशाला लागलेली कीड

### ‘मन की बात’मधून पंतप्रधानांचा संवाद

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भ्रष्टाचार ही देशाला लागलेली कीड असून, आपण सगळे मिळून प्रयत्न केल्यास ही कीड नष्ट होऊ शकते, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्पष्ट केले. पंतप्रधानांनी रविवारी ङ्गमन की बातफ्मधून २०२२ मधील विविध विषयांवर नागरिकांशी संवाद साधला. यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांना अभिवादन केलं.

पंतप्रधान मोदी म्हणाले की, आज आपले पूज्यनीय महात्मा गांधी म्हणजे बापूंची पुण्यतिथी आहे. ३० जानेवारीचा हा दिवस आपल्याला बापूंच्या विचारांची शिकवण देतो. काही दिवसांपूर्वी आपण २६ जानेवारीला प्रजासत्ताक दिन साजरा केला. त्यात वेगवेगळ्या संस्कृतीचं दर्शन घडवणारे चित्ररथ होता. स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव आपण साजरा करत आहोत, असेही मोदींनी यावेळी सांगितले.

## जिल्ह्यातील ९८ अनुसूचित, नवबौद्ध विद्यार्थ्यांना स्वाधार

**। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।**

सन २०१७ पासून आतापर्यंत जिल्ह्यातील ९८ विद्यार्थ्यांना भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेचा लाभ मिळाला असून, सुमारे ७० लाख ४३ हजार रुपयांच्या निधी प्रत्यक्ष देण्यात आला असल्याची माहिती रायगड समाज कल्याण विभागाचे सहायक आयुक्त सुनील जाधव यांनी दिली आहे.

अनुसूचित जाती, नवबौद्ध समाजातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेताना अडचणी निर्माण येऊ नये यासाठी राज्य शासनाच्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब पान २ वर

### २८ फेब्रुवारीपर्यंत अर्ज करावे

**सद्य:स्थितीत महाविद्यालये बंद असल्याने ऑनलाईन प्रणालीद्वारे शिक्षण घेणाऱ्या अनुसूचित जाती व नवबौद्ध समाजातील आर्थिकदृष्ट्या मागास विद्यार्थ्यांना २८ फेब्रुवारीअखेर अलिबाग येथील कच्छी भवन, श्रीबाग रोड येथील समाजकल्याण कार्यालयाकडे अर्ज करावे.**

# मोरगिरीत शेकापच्या माध्यमातून विकासकामे



**। पोलादपूर । वार्ताहर ।**

पोलादपूर तालुक्यातील मोरगिरी ग्रामपंचायत हद्दीतील विविध विकासकामे शेतकरी कामगार पक्षाच्या माध्यमातून करण्याचा शब्द देण्यात आला होता. त्यांचा शुभारंभ आणि उद्घाटन माजी आ. पंडित पाटील यांच्या हस्ते करुन वचनपूर्ती केली आहे.

मोरगिरी ग्रामस्थांची वार्षिक महापूजा आणि हळदीकुंकू समारंभानिमित्त विविध कामांचे उद्घाटनांचे आयोजन माजी आ. पंडित पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यात्रसंगी शेकापक्षाच्या राजिप सदस्या सुमन कुंभार, सभापती नंदा चांदे, तालुका चिटणीस एकनाथ गायकवाड, बोरावळे सरपंच वैभव चांदे, पुरोगामी युवक संघटनेचे चंद्रकांत सणस, मोरगिरी पान २ वर

### पंडित पाटील यांच्या हस्ते उद्घाटन

## अमर जवान ज्योत होणार प्रज्ज्वलित

**। छत्तीसगड । वृत्तसंस्था ।**

अमर जवान ज्योती विझवण्याच्या मोदी सरकारच्या निर्णयानंतर छत्तीसगडच्या भूपेश बघेल सरकारने येथे अमर जवान ज्योतीची पायाभरणी करण्याचा निर्णय घेतला आहे. काँग्रेस खासदार राहुल गांधी ३ फेब्रुवारीला त्याची पायाभरणी करतील. शनिवारी छत्तीसगडचे मुख्यमंत्री भूपेश बघेल यांनी याबद्दल माहिती दिली. आपल्या शहिदांच्या शौर्यगाथा आपल्या पिढ्यांसाठी प्रेरणादायी असल्याचे मुख्यमंत्री भूपेश बघेल यांनी यांनी यावेळी स्पष्ट केले.

# विरार-अलिबाग कॉरिडोर; शेतकरी आक्रमक



### बैठकीत चर्चेतील मुद्दे?

- *जमिनीचा मोबदला तीन वर्षांत एमएसआरडीसी, नॅशनल थॉरिटी यांनी प्रतिचौरस मीटर भाव दिला आहे, त्याच्या २५ टक्के भाव वाढवून देण्यात यावा.*
- *शेतकऱ्यांचे योग्य पुनर्वसन तसेच शेतकऱ्यांना प्रकल्पग्रस्त दाखला देण्यात यावा.*
- *महामार्गालगत येणाऱ्या व्यवसायामध्ये भागीदारी मिळावी.*
- *महामार्गाचे नियोजन राहती घरे वगळून करावे, महामार्गाच्या दुतर्फा असणारी शेती नापिक होणार नाही तसेच घरांचे नुकसान होणार नाही, नुकसान झाल्यास योग्य तो मोबदला देण्यात यावा.*
- *शेतकऱ्यांच्या वहिवाटचे संरक्षण व्हावे, नैसर्गिक पाण्याच्या वाटा मोकळ्या ठेवाव्यात आदी मुद्द्यांवर यावेळी चर्चा करण्यात आली.*

**। उरण । वार्ताहर ।**

एमएमआरडीए विरार-अलिबाग महामार्गासाठी उरणमधील बाधित शेतकऱ्यांच्या मागण्यांचे निवेदन उपविभागीय अधिकारी यांना देऊन पुढील आंदोलनाची दिशा ठरविली जाईल, अशी भूमिका बाधित शेतकऱ्यांनी घेतली आहे. यावेळी विरार-अलिबाग कॉरिडोरला चिरनेर बैठकीत उपस्थित शेतकऱ्यांनी विरोध केला आहे.

विरार-अलिबाग या बहुउद्देशीय महामार्गाच्या भूमापणाला शेतकऱ्यांनी कडाडून विरोध केल्यानंतर तहसील पान २ वर

## जम्मू काश्मीरमध्ये पाच दहशतवादी ठार

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

जम्मू-काश्मीरमध्ये भारतीय लष्कर आणि दहशतवाद्यांमध्ये झालेल्या धुमश्चक्रीत पाच दहशतवाद्यांचा खात्मा करण्यात आला आहे. गेल्या १२ तासांत झालेल्या दोन चकमकीत पाकिस्तान पुरस्कृत दहशतवादी संघटना लष्कर-ए-तोयबा आणि जैश-ए-मोहम्मदचे पाच दहशतवादी ठार झाल्याची माहिती काश्मीरचे पोलीस महानिरीक्षक यांनी दिली आहे. काश्मीर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पुलवामा चार दहशतवादी, तर बडगाममध्ये एका दहशतवाद्याला ठार करण्यात जवानांना यश आले आहे.

# विश्वविक्रमी नदाल

### २१ वे ग्रँडस्लॅम खिशात

**। मेलबोर्न । वृत्तसंस्था ।**

क्ले कोर्टचा अनभिषिक्त सम्राट असणाऱ्या स्पेनच्या राफेल नदालने ऑस्ट्रेलियन ओपनचा अंतिम सामना जिंकत आणखी एक ग्रँड स्लॅम खिशात घातले आहे. त्याने इतिहासात सर्वाधिक म्हणजेच २१ ग्रँडस्लॅम मिळवले आहेत. टेनिसपटू राफेल नदालने अंतिम सामन्यात रशियाच्या डॅनिल मेदवेदवला मात देत दुसऱ्यांदा ऑस्ट्रेलियन ओपनच जेतेपद पटकावले आहे. अतिशय अटीतटीचा झालेला सामना जवळपास पाच तासांहून अधिक काळ चालला. ज्यात पाच सेट्समध्ये राफेलने विजय मिळवला. राफेलने २-६, ६-७, ६-४, ६-४ आणि ७-५ अशा फरकाने विजय मिळवला. पान २ वर



# चला मुलांनो, शाळेला जाऊया!



### रायगडात आजपासून भरणार शाळा

### स्वच्छता, लसीकरणावर प्रशासनाचा भर

*वैभव पाटील*
*अलिबाग*

*कोरोना आणि ओमिक्रॉनच्या पार्श्वभूमीवर रायगड जिल्ह्यात सर्व शाळा बंद करण्यात आल्या होत्या. ऑनलाईन शिक्षण सुरु आहे. परंतु, विद्यार्थी आणि पालकांचा शाळा सुरु करण्याबाबत आग्रह होता. जिल्ह्यातील कोरोना परिस्थिती हळूहळू नियंत्रणात येत असल्याने जिल्हा प्रशासनाने सोमवारपासून सर्व शाळा सुरु करण्याचा निर्णय घेतला आहे.*

> **अनेकांकडे परिस्थितीअभावी ऑनलाइन शिक्षणासाठी मोबाईल नव्हता. यामुळे विद्यार्थ्यांचा प्रतिसाद कमी होता. गावखेड्यातील विद्यार्थी मोबाईल आणि रेंज नसल्यामुळे ऑनलाइन शिक्षणापासून वंचित होते. परंतु, आता शाळा सुरु होत असल्याने बहुतांश समस्या दूर होणार आहेत. त्यामुळे आम्ही समाधानी आहोत.** – विभा पाटील, पालक

> **शिक्षण प्रक्रियेचा विचार करता अजून बऱ्याच पालकांकडे अँड्रॉईड मोबाईल नाहीत. ज्यांच्याकडे आहेत, ते पालक रोजगाराला जाताना मोबाईल सोबत घेऊन जातात. विद्यार्थ्यांसाठी सतत आम्ही नवनवीन प्रयत्न करत असतो, शिवाय शाळा बंद असल्यामुळे विद्यार्थी-विद्यार्थी आंतरक्रिया घडते, ती ऑनलाईन शिक्षण प्रणातील घडत नाही.** – कृष्णकुमार शेळके, प्राथमिक शिक्षक

*ऑनलाइन शिक्षणापासून राज्यातील लाखो मुले शिक्षणापासून वंचित राहत असल्याने त्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याचे सांगत अनेक पालक, शिक्षण तज्ज्ञ आदींनी राज्यातील शाळा या कोरोना प्रतिबंधाच्या नियमांचे पालन करून सुरू करण्याची मागणी लावून धरली होती. राज्यात ओमायक्रॉन विषाणूचा प्रभाव कमी झाल्यानंतर राज्यातील पहिली ते बारावीच्या शाळा सोमवार ३१ जानेवारीपासून सुरू होत आहेत. शाळेची घंटा पुन्हा वाजणार आहे. शाळेमध्ये पुन्हा किलबिलाट सुरू होणार. शाळा सुरू होणार हे कळताच* पान २ वर

अभ्युदय को-ऑप. बँक लि.
(मल्टी - स्टेट शेड्युल्ड बँक)
गृह कर्ज
6.70%* (प्रति वर्ष)
प्रक्रिया शुल्कात ६०% सवलत
*अटी लागू
आपली बँक
प्रजासत्ताक 73 मुदत ठेव योजना

| योजना | सामान्य नागरिकांसाठी | ज्येष्ठ नागरिकांसाठी | कालावधी |
|---|---|---|---|
| QICRIP | 5.50% | 5.75% | 18 महिने |
| QID | 5.60% | 5.85% | |

योजना मर्यादीत कालावधीसाठी उपलब्ध
अधिक माहितीसाठी लॉग ऑन करा www.abhyudayabank.co.in
टोल फ्री : 1800-22-3131

## अभीष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

**३१ जानेवारी**

१) श्रीम. प्रज्ञा जोशी,
३१-०१-१९५०
मु.पो.थळ आगार, ता.अलिबाग

**म ह त्त्वा चे**

## आक्षी पुलाखाली कचऱ्याचे साम्राज्य

**। चौल । प्रतिनिधी ।**

अलिबाग तालुक्यातील रेवंदडा-अलिबाग या मुख्य रस्त्यावरील आक्षी पुलाखाली मोठ्या प्रमाणात कचरा टाकण्यात येत आहे. त्यामुळे येथील परिसरात मोठ्या प्रमाणात दुर्गंधी पसरली आहे. याठिकाणावरुन प्रवास करताना प्रवाशांना नाक धरुन जावे लागत आहे. तरी संबंधित विभागाने बेकायदा कचरा टाकणाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.

# रायगड जिल्ह्यातील रस्त्यांची दुरवस्था

## कोर्ट कमिशनकडून मुंबई-गोवा महामार्गाची पाहणी

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

**मुंबई-गोवा महामार्गासह रायगड जिल्ह्यातील रस्त्यांच्या दुरवस्थेची पाहणी करण्याचे आदेश अलिबागच्या दिवाणी न्यायालयाने दिले आहेत. त्यासाठी 'कोर्ट कमिशन' म्हणून तज्ज्ञ अभियंता पी.एन. पाडळीकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. ते १ व २ फेब्रुवारी रोजी रस्त्यांची पाहणी करणार आहेत. त्यांना एक महिन्याच्या आत आपला अहवाल न्यायालयासमोर सादर करण्याचे निर्देश देण्यात आलेत.**

रायगड जिल्ह्यातील रस्त्यांची अवस्था खूपच बिकट आहे. मुंबई गोवा महामार्गाच्या रूंदीकरणाचे काम २०११ पासून सुरू झाले आहे. मात्र पहिल्या टप्प्यातील ८४ किलोमीटरचे कामदेखील गेल्या १० वर्षात पूर्ण झाले नाही. यामुळे नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागतो आहे.

अनेक ठिकाणी कामे अर्धवट अवस्थेत आहेत. रस्त्यावरून प्रवास करणाऱ्या प्रवाशांना धुळीचा आणि खड्ड्यांचा सामना करावा लागतो, तर पावसाळ्यात याच रस्त्यांवर चिखलाचे साम्राज्य असते. शासनाने या रस्त्यांच्या कामाचा ठेकेदार दोन वेळा बदलला, परंतु परिस्थितीत फारसा बदल झाला नाही. दुसरीकडे ग्रामीण भागातील रस्त्यांची अवस्था फारशी वेगळी नाही.

या पार्श्वभूमीवर अलिबाग येथील सामाजिक कार्यकर्ते ॲड. अजय उपाध्ये यांनी जुलै २०१७ मध्ये जिल्हा न्यायालयात याचिका दाखल केली होती. यात रायगड जिल्हाधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभाग, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, आरटीओ, पोलीस अधिक्षक यांना प्रतिवादी करण्यात आले आहे. यावरील सुनावणीदरम्यान न्यायालयाने रस्त्यांची पाहणी करण्याचे निर्देश दिले. स्वतः ॲड. उपाध्ये या पाहणीच्यावेळी हजर राहणार आहेत.


(संग्रहित छायाचित्र)

यावर बोलताना सामाजिक कार्यकर्ते ॲड. अजय उपाध्ये म्हणाले, रस्त्यांच्या दूरवस्थेमुळे जिल्ह्यतील नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागते आहे. मुंबई-गोवा महामार्गाचे काम गेल्या दहा वर्षांपासून रखडले आहे. याकडे न्यायालयाचे आणि सरकारचे लक्ष वेधण्यासाठी मी ही याचिका दाखल केली होती. त्यावर न्यायालयाने रस्त्यांच्या पाहणीचे निर्देश दिले आहेत. मी स्वतः या पाहणीच्या वेळी हजर राहणार आहे.

## निकम इंग्लिश स्कूलमध्ये बक्षीस वितरण सोहळा

**। माणगाव । वार्ताहर ।**

एस.एस.निकम इंग्लिश स्कूल अँड ज्युनिअर सायन्स कॉलेज माणगाव येथे ७३ वा प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला. याच दिवसाचे औचित्य साधून वेगवेगळ्या क्षेत्रातील प्रावीण्य लक्षात घेऊन यशस्वी विद्यार्थ्यांना बक्षिसे देऊन त्यांचे कौतुक करण्यात आले.

विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देण्यासाठी तसेच ज्ञानवृद्धीसाठी विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या स्पर्धा परीक्षांना सामोरे जाण्यासाठी प्रोत्साहित केले गेले. एवढेच नव्हे तर, परीक्षांमध्ये विद्यार्थ्यांने आपले प्रावीण्य दाखविले, अशा विद्यार्थ्यांना बक्षिसे देऊन गौरविण्यात आले.

सदर स्पर्धा परीक्षांमध्ये होमिभाभा स्कॉलरशिप, इंग्लिश व्याकरण परीक्षा, इयत्ता पाचवी व आठवी महाराष्ट्र स्कॉलरशिप, सायन्स व मॅथ ओलंपियाड, स्पेल बी एवढेच नव्हे तर, वूशू कॉम्पिटेशन, स्वरसंगम म्युझिक कॉम्पिटेशन, न्यू दिल्ली आयोजित संगीत स्पर्धा व संस्कृत श्लोक पाठांतर स्पर्धा अशा वेगवेगळ्या स्तरांवर विद्यार्थ्यांने प्रावीण्य मिळवून शाळेच्या यशामध्ये आपला वाटा दाखविला.

अशा विद्यार्थ्यांचे कौतुक संस्थेचे अध्यक्ष डॉ. एम.एस. निकम तसेच संस्थेचे इतर पदाधिकारी यांच्या हस्ते बक्षीस देऊन करण्यात आले. शाळेच्या प्राचार्या संगिता कोकाटे, को ऑर्डीनेटर विजय पाईकराव तर शाळेचे मुख्याध्यापक शैलेश जाधव यांनी या विद्यार्थ्यांचे कौतुक केले. तसेच पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## पान १ वरुन

### पोलिसांच्या हातावर तुरी

बिरु गणेश महतो असे या आरोपीचे नाव आहे. तो पाबल कार्ली येथे एका पोकलनवर मदतनीस म्हणून कामाला होता. पोकलन मशीन ऑपरेटर राजेंद्र चोलो यादाव (४२) हा आरोपी बिरू महतो याला पोवलन मशीन ऑपरेट करताना तसेच जेवण बनविण्यावरून काहीना काही कारण काढुन त्रास देत असल्याने त्या गोष्टीचा मनात राग होता. तो राग मनात धरून आरोपी बिरू गणेश महतो (१९) रा. वॉर्ड क्र. ९, कडूरुखुटा, पो. पॅक, ता. नावडीहा, जि. बोकारो, राज्य झारखंड याने राजेंद्र यादाव याचे दोन्ही हाताच्या पंजांवर, डोक्यावर, कपाळावर व चेहऱ्यावर लोखंडी कोयत्याने वार करून त्यास गंभीर दुखापती करून ठार मारण्याचा प्रयत्न केला. या प्रकरणी पोकलन मालकाने वडखळ पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला होता. याप्रकरणी आरोपीला पेण पोलीस ठाण्याच्या कोठडीत ठेवण्यात आले होते. मात्र, तो टॉयलेटला जाण्याच्या बहाण्याने बाहेर पडला. आणि, पोलिसांचे लक्ष नसल्याचा फायदा घेऊन त्याने पोलीस ठाण्यातून धूम ठोकली. या प्रकारामुळे पेण पोलीस ठाण्यात गोंधळ उडाला आहे. आरोपीला शोधण्यासाठी पोलीस गाव-गाव धुंडाळत आहेत. सदर प्रकरणाचा तपास वडखळ पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली तपासिक अंमलदार पोलीस उपनिरीक्षक शिद हे करीत आहेत.

### जिल्ह्यातील ९८ अनुसूचित, नवबौद्ध विद्यार्थ्यांना स्वाधार

आंबेडकर स्वाधार योजनेतून विद्यार्थ्यांना महापालिका व जिल्ह्याच्या ठिकाणी वसतिगृहात राहण्यासाठी भोजन, निवास व इतर शैक्षणिक सुविधा थेट अनुदानाच्या स्वरूपात देण्यात येतात.अनुसूचित जाती व नवबौद्ध समाजातील आर्थिक दृष्ट्या मागास विद्यार्थ्यांना उच्चाशिक्षण घेण्यात अडचणी येत असत, त्यामुळे त्यांना पूढील शिक्षण घेती येत नव्हते. या समस्येच्या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने सुरु केलेल्या या योजनेचा आता या विद्यार्थ्यांना मोठा आधार प्राप्त झाला आहे. अकरावी, बारावी आणि त्यानंतरच्या व्यावसायिक तसेच बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये अनुसूचित जात व नवबौद्ध समाजातील आर्थिकदृष्ट्या मागास विद्यार्थ्यांना प्रवेश मिळूनही कोणत्याही शासकीय किंवा महाविद्यालयाच्या वसतिगृहात प्रवेश मिळताना अडचणी निर्माण होतात. त्यामुळे अनेक वेळा आर्थिक अडचणींमुळे या विद्यार्थ्यांना आपले शिक्षण अर्धवट सोडावे लागते. काही विद्यार्थी अन्य ठिकाणी नोकरी करून उच्च शिक्षण घेण्याचा प्रयत्न करतात. परंतु, आता या समाजातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेण्यासाठी शासकीय अर्थसहाय्याची ही योजना अंमलात आणण्यात आली आहे.

दरम्यान, अनुसूचित जाती व नवबौद्ध समाजातील आर्थिकदृष्ट्या मागास विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ घेण्याकरिता विद्यार्थ्यांना दहावी, बारावी, पदवी किंवा पदविका परीक्षेत ६० टक्क्यांपेक्षा जास्त गुण आवश्यक आहेत. या प्रवर्गातील अपंग विद्यार्थ्यांसाठी ही मर्यादा ५० टक्के गुणांची आहे. विद्यार्थ्यांच्या पालकांचे उत्पन्न अडीच लाख रुपयापेक्षा अधिक नसावे. सामाजिक न्याय विभागाच्या वसतिगृहात वास्तव्यास असलेल्या विद्यार्थ्यांना ही योजना मात्र लागू नाही.

### विरार-अलिबाग कॉरिडोर; शेतकरी आक्रमक

कार्यालयात उपविभागीय अधिकारी राहुल मुंडके यांच्यासोबत शेतकऱ्यांची बैठक झाली. शेतकऱ्यांची सहमती मिळविण्यासाठी एका आठवड्याची मुदत देण्यात आली होती. त्यानुसार रविवारी उरण तालुक्यातील १६ गावांची चिरनेर येथील पी.पी. एज्युकेशन सोसायटीच्या सभागृहात बैठक घेण्यात आली .

महामार्गाबाबत पहिली सुनावणी पनवेल येथील पिल्ले महाविद्यालयात १६ जानेवारीला झाली होती. यावेळी उपविभागीय अधिकारी दत्तात्रेय नवले यांनी पुढे काय केले ते माहिती नाही, मात्र शेतकऱ्यांना पूर्ण अंधारात ठेवल्याचे संतोष पवार यांनी सांगितले. २०१७ ला जर जासईच्या शेतकऱ्यांना प्रति गुंठा २२ लाख ९५ हजार जमिनीचा मोबदला दिला असेल तर २०२२ मध्ये शेतकऱ्यांनी त्यापेक्षा जास्त मोबदला मिळावा, अशी भूमिका ॲड. विजय पाटील यांनी यावेळी मांडली. याप्रसंगी उरण सामाजिक संस्थेचे अध्यक्ष सुधाकर पाटील, जिल्हापरिषद सदस्य बाजीराव परदेशी, उद्योजक पी.पी. खारपाटील, माजी जिल्हा परिषद सदस्य संतोष ठाकूर, उपसभापती शुभांगी पाटील, ग्रामपंचायत सदस्य समेश फोफेरकर, ॲड. निनाद नाईक, प्रशांत पाटील, अविनाश नाईक, घन:श्याम पाटील, राजाराम जोशी, रामनाथ पंडित आदी १६ गावांतील सरपंच, उपसरपंच, शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### चला मुलांनो, शाळेला जाऊया!

*मुले, शिक्षक व पालकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले.*

*शाळा भरल्यानंतर होणारे राष्ट्रगीत, प्रार्थना, शिकवताना भरलेले वर्ग या सर्वच गोष्टींची सतत आठवण होऊन शिक्षकांनाही लवकरात लवकर शाळा सुरू व्हाव्यात असेच वाटत होते. रोजच्या रोज शाळेत जाण्याची सवय असणाऱ्या मुलांना अचानकपणे शाळा बंद झाल्याने घरी करमत नव्हते. शाळा बंद असल्याने घरी अभ्यास करायला मजा येत नव्हती. पालकांना मुलांच्या भवितव्याची चिंतेने ग्रासले होते, त्यांची चिंता आता मिटणार आहे.*

शाळा बंद असल्यामुळे गृहपाठ करता येत नव्हता तसेच एखाद्या गोष्टी शंका असेल तर ती शिक्षकांना प्रत्यक्ष विचारुन समाधान होते, ते ऑनलाईन शिकवताना मिळत नव्हते. परंतु, शाळा सुरु होत असल्याने मी आनंदी आहे, अशी प्रतिक्रिया यश घरत या विद्यार्थ्याने दिली.

### परीक्षा ठरल्यावेळीच होणार

राज्य सरकार आणि शिक्षण विभागाच्यावतीने आम्ही कोरोनाच्या स्थितीवर लक्ष ठेवून आहोत. ठरलेल्या परीक्षांच्या कार्यक्रमात कोणताही बदल करण्यात आलेला नाही. जे विद्यार्थी कोरोना काळात परीक्षेला बसू शकणार नाहीत त्यांच्यासाठी सप्लिमेंट्री परीक्षा घेण्यात येणार आहे, असेही यावेळी वर्षा गायकवाड यांनी स्पष्ट केले. दहावी बारावीच्या परीक्षा कधी होणार हे सरकारने स्पष्ट करावे, अशी मागणी मुख्याध्यापकांनी केली होती.

शालेय शिक्षण राज्यमंत्री बच्चू कडू यांनी नुकतीच महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वरिष्ठ अधिकार्यांसोबत ऑनलाईन बैठक घेऊन दहावी बारावीच्या लेखी, प्रात्यक्षिक आदी परीक्षा यांची तयारी, नियोजन आदींचा आढावा घेतला. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांच्या लसीकरणाची देखील माहिती घेतली होती. यावेळी दहावी-बारावीच्या विद्यार्थ्यांचे मोठ्या प्रमाणात लसीकरण झालेले नसल्याने मार्चच्या पहिल्या आठवड्यापासून सुरू होणार्या दहावी-बारावीच्या लेखी परीक्षा पुढे ढकलण्यात येण्याची शक्यता वर्तवण्यात येत होती.

**परीक्षा पुढे हितावह नाही**

शिक्षण मंडळाकडून दहावी, बारावीच्या परीक्षांचे वेळापत्रक जाहीर करण्यात आलेले असताना परीक्षा पुढे ढकलणे हितावह ठरणार नसल्याचे मत राज्य शाळा मुख्याध्यापक संघाकडून व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर त्यांनी राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचे अध्यक्ष, शालेय शिक्षणमंत्र्यांना पत्रे लिहिली असून, परीक्षा नियोजित वेळापत्रकाप्रमाणेच घेण्यात याव्यात, अशी मागणी केली आहे.

### कार-कंटेनरचा भीषण अपघात

पथकाच्या मदतीने अपघातग्रस्त कारला बाहेर काढून कारमधील पाचही प्रवाशांचे मृतदेह बाहेर काढले. त्यानंतर दोन्ही अपघातग्रस्त वाहने क्रेनच्या सहाय्याने बाजूला करून मुंबईकडे जाणारी वाहतूक सुरळीत केली. या घटनेचा पुढील तपास लोणावळा ग्रामीण पोलीस करीत आहे.

### अल्पवयीन मुलीवर अत्याचार

दंड न भरल्यास १ वर्षांची साधी कैद अशी शिक्षा ठोठावली आहे.

थोडक्यात हकिकत अशी की, पिरकोन उरण येथील आरोपी विवेक विजय गावंड हा सराईत गुन्हेगार असून, तो विवाहित आहे. आरोपी विवेक गावंड याला मोबाईल फोनवर अल्पवयीन मुलींसोबत मैत्री करण्याची सवय असून, या प्रकरणातील पीडिता हिच्याशीसुध्दा फेसबुकवर मैत्री करून सुरुवातीला तिच्याशी जवळीक साधण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर फोनवरून तिच्याशी संवाद साधत आरोपीने तिला लग्न करण्याची फूस लावली. पीडितेकडील सोन्याच्या दागिन्यांची माहिती करून घेतली. आरोपीने त्यानंतर दि. २ फेब्रुवारी २०२१ रोजी पीडितेला खारपाडा येथे सर्व सोन्याचे दागिने घेऊन बोलविले व तिला तिच्या मर्जीशिवाय पिरकोन, ता. उरण येथे पळवून नेले. सुरुवातीला विश्वासाने पीडितेकडील सर्व सोन्याचे दागिने स्वत:कडे काढून घेतले व नंतर तेथेच तिच्यावर एका भाड्याच्या रुममध्ये लैंगिक अत्याचार केले. या प्रकरणात मुलीचे वय १७ वर्ष आहे, हे माहिती असूनसुध्दा तिला आरोपीने पळवून नेले होते, हे न्यायालयासमोर सिद्ध झाले आहे. त्यानुसार न्यायालयाने आरोपी विवेक विजय गावंड यास १० वर्षांची शिक्षा व रक्कम रुपये ५० हजार रकमेचा दंड व दंड न भरल्यास १ वर्षाची साधी कैद अशी शिक्षा ठोठावली आहे. पीडितेच्या वडिलांनी पोयनाड पोलीस ठाण्यात तकार नोंदविली असता पोयनाड पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक आर.डी. अतिग्रे व त्यांच्या सहकाऱ्यांनी जलदगतीने हया केसचा तपास पूर्ण केले. या खटल्यात शासकीय अभियोक्ता भूषण साळवी यांनी एकूण १३ साक्षीदार तपासून युक्तिवाद केला.

### मोरगिरी येथे विविध विकासकामांचा शुभारंभ

सरपंच शरद जाधव, माजी सरपंच जगन्नाथ वाडकर, खरेदी विक्री संघाचे संचालक अजित कंक, मनोहर पार्टे, निवृत्ती उतेकर तसेच काशिनाथ कुंभार आदी मान्यवर उपस्थित होते. याप्रसंगी पोलादपूर नगरपंचायतीच्या नवनिर्वाचित नगरसेविका आशा गायकवाड-हांडे यांचा माजी आ. पंडितशेठ पाटील यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. प्रारंभी प्रास्ताविकामध्ये सरपंच शरद जाधव यांनी, पंचवीस वर्षांत शेकापक्षासोबत राहिल्यानंतर आपल्या सरपंचपदाच्या कारकीर्दीची दीड वर्षे शिल्लक असताना शेकापक्षाने नळपाणीयोजनेचे काम केले तर पदाचे सार्थक होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली.तालुका चिटणीस एकनाथ गायकवाड यांनी, आगामी काळात पोलादपूर तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या दोन्ही जागा लढता येईल, अशी विकासकामे करून कोणत्या जागेवर निवडणूक लढायची याची वाट पाहात असल्याने कार्यकर्त्यांनी मागीलप्रमाणे निवडणुकीसाठी सज्ज राहण्याची मानसिकता बाळगावी, असे आवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रमोद शिंदे यांनी केले.

### सात आरोपींना सहा दिवसांची पोलीस कोठडी

१२ जण फरार आहेत. यापैकी अटक करण्यात आलेल्या सात जणांना रविवारी न्यायालयात हजर करण्यात आले होते. त्यावेळी अधिक तपास करण्यासाठी त्यांना पोलीस कोठडीत ठेवण्याची मागणी सरकारकडून करण्यात आली होती. ही मागणी मान्य करीत त्यांना ४ फेब्रुवारीपर्यंत सहा दिवस पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश देण्यात आले. या प्रकरणात सुमारे १५ हून अधिक जण सहभागी असल्याची माहिती मिळाली आहे. वडखळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, सात जणांना पोलिसांनी चौकशीसाठी ताब्यात घेतले आहे. तर, आणखी १२ जण फरार असल्याची माहिती मिळाली आहे. या प्रकरणाचा तपास पोलीस उपविभागीय अधिकारी सोनाली कदम यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु आहे.

### विश्वविक्रमी नदाल

विजेतेपदासह नदालच्या खात्यात आता सर्वाधिक २१ ग्रँडस्लॅम जेतेपदे झाली आहेत. असा विक्रम करणारा तो जगातील पहिला टेनिसपटू ठरला. टेनिसमधील रॉजर फेडरर आणि नोव्हाक जोकोविच या दिग्गजांच्या नावावर प्रत्येकी २० ग्रँडस्लॅम जेतेपदे आहेत. अंतिम सामन्यात रशियाच्या मेदवेदेवने सुरुवात तर उत्तम केली. त्याने पहिले दोन सेट्स जिंकलेदेखील, पण अनुभवाच्या जोरावर अखेरचे तिनही सेट्स नदालने जिंकत जेतेपद पटकावलं आहे.

ऑस्ट्रेलियन ओपनचा हा सामना एखाद्या अंतिम सामन्याला अगदी साजेशा झाला. सुरवातीपासून अखेरपर्यंत उत्कंठा वाढवणारा हा सामना राफेलने जिंकला असला तरी डॅनिल याचा खेळही उत्कृष्ट होता. सामन्यात पहिल्या सेटमध्ये डॅनेलने नदालला ६-२ अशा मोठ्या फरकाने पराभूत केले. दुसरा सेटही डॅनेलने जिंकला पण यावेळी राफेलने कडवी झुंज दिल्यामुळे डॅनिलने ६-७ ने सेट जिंकला. तिसऱ्या सेटमध्येही डॅनेल जिंकेल असे वाटत असताना राफेलने कमबॅक करत अप्रतिम खेळ दाखवला आणि सेट ६-४ ने जिंकला. चौथा सेटही ६-३ ने जिंकल्यानंतर अखेरचा निर्णायक सेट राफेलने ७-५ ने खिशात घालत सामन्यासह स्पर्धा जिंकत इतिहास रचला.

## गिरणे स्मशानभूमी रस्त्याच्या कामाचा शुभारंभ

**। तळा । वार्ताहर।**

तालुक्यातील गिरणे ग्रामपंचायत हद्दीतील स्मशानभूमी कामाचा शुभारंभ गिरणे ग्रामपंचायतीच्या सरपंच ज्योती पायगुडे यांच्या हस्ते करण्यात आला. जिल्हा नियोजन अंतर्गत १० लाख (जनसुविधा) रुपयांचा निधी या कामासाठी मंजूर करण्यात आला आहे. गेल्या कित्येक वर्षांपासून गिरणे गावातील स्मशानभूमीच्या रस्त्याचे काम रखडले होते.

## म्हसळा सार्वजनिक वाचनालयात महात्मा गांधींना अभिवादन

**। म्हसळा । प्रतिनिधी ।**

महात्मा गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त सार्वजनिक वाचनालय, म्हसळा येथे महात्मा गांधी यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून पूजन व महात्मा गांधी यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी वाचनालयाचे अध्यक्ष संजय खांबेटे, सचिव अशोक काते, ग्रंथपाल उदय करडे, दिपाली दातार उपस्थित होते.




## तळा नगराध्यक्षापदाची माळ कोणाच्या गळ्यात?

### महिलांसाठी आरक्षित झाल्याने भाग्यवान कोण?

**। तळा । वार्ताहर ।**

तळा नगरपंचायत निवडणुकीत शिवसेनाला मागे टाकत एकट्या राष्ट्रवादी काँग्रेसने दहा नगरसेवक निवडून आणत तळा नगरपंचायत निवडणुकीत एकहाती सत्ता स्थापन करण्यासाठी सज्ज झाली आहे.

नुकत्याच पडलेल्या नगराध्यक्ष आरक्षणाने महिला प्रवर्ग आरक्षण झाल्यानेमहिलांच्यागोटातआनंदाचे वातावरण आहे. तळा नगर पंचायत निवडणूकीत राष्ट्रवादी काँग्रेसच्या सात नगरसेविका निवडून आल्या आहेत.तर, तीन पुरूष नगरसेवक निवडून आले आहेत.

महिला आरक्षणामुळे नगराध्यक्षपदाचे मुख्य दावेदार असलेले चंद्रकांत रोडे यांना आता उपनगराध्यक्ष पदावर समाधान मानावे लागणार आहे.

श्रीकार को-ओप हौसिंग. सोसायटी- अलिबाग मयूर बेकरीच्या मागे, अलिबाग - रायगड सोसायटीच्या मासिक सभेमध्ये सध्या असलेली ईमारत पुनर्बांधणी करिता देण्याचे ठरले आहे. तरी इच्छुकांनी अधिक माहिती करिता पुढील ७ दिवसांमध्ये खालील क्रमांकावर संपर्क करावा.
९४२२६ ९१०११
९७६९२ ०९९१९

### जाहीर नोटीस

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे -वेव्हवली ता. अलिबाग जि. रायगड येथील खालील वर्णन केलेली मिळकत आमचे अशिल यांनी विद्यमान मालकांकडून कायमस्वरुपी नोंदणीकृत दस्ताद्वारे घेण्याचे विचारात आहेत त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक | क्षेत्र हे.आर. | आकार (रु.पै) |
|---|---|---|---|
| वेव्हवली | १४३ | जिरायत ००-७१-७०<br>पो.ख. ००-२२-४०<br>एकूण ००-९४-१० | ०७.६८ |

वरीलप्रमाणे सामाईक क्षेत्रामधील विद्यमान मालक श्री. शाह फैजल अब्दुल मुनिम काझी यांच्या मालकीची खाते क्र. १०८ जिरायत - ००-३६-०० व पो.ख. ००-१०-०० अशी एकूण ००-४६-०० या नोटीशीचा विषय आहे.

वरील प्रमाणे वर्णन केलेल्या मिळकतीमध्ये कोणत्याही, कसलीही हक्क, हितसंबंध, बोजा, गहाण, दान, बक्षीस, लीज, वारसा, वहिवाट, इजमेंट, अदलाबदल, भाडेकरार, अन्नवस्त्र, पोटगी, कोर्ट जप्ती अगर कोणाचीही कुठल्याही प्रकारचा हक्क अथवा अधिकार असल्यास लेखी पुराव्यासहीत ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ (चौदा) दिवसांच्या आत खालील पत्त्यावर सर्व संबंधित कागदपत्रांसहित करुन घ्यावी अथवा सदरची मिळकत पूर्णपणे निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून तसेच कोणाचाही हक्क अगर हितसंबंध असल्यास तो त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिलेला आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर मागाहून कोणाचीही कसलीही तक्रार अगर हरकत असल्यास ती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

ठिकाण :- अलिबाग
दि. ३१-०१-२०२२

सही/-
**ॲड. योगेश द. घाडगे**
बी.ए.एलएलबी
मु.पो. कुरुळ, ता. अलिबाग, जि. रायगड
मो.बा. ९६३७२७१८१८

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे-भडवळ ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची बिनशेती मिळकत आमचे अशिल यांनी खालील नमूद विद्यमान मालक यांचेकडून कायमस्वरुपी खरेदी घेण्याचे ठरविले आहे.

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | प्लॉट नंबर | क्षेत्र चौ.मी. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| सरीता दिनकर पाटील | २५/२/अ/४ | ४ | २८० चौ.मी. | २८.०० |

तरी वरील बिनशेती मिळकती संदर्भात कोणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, बक्षिस, वारस हक्क, पोटगी, लीन, चार्ज, ताबा, वहिवाट अथवा कोणत्याही स्वरुपाचा कसलाही हक्क हितसंबंध असल्यास त्यांना ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून चौदा (१४) दिवसांचे आत खालील सही करणार यांचे पत्त्यावर प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरुपात हरकत घ्यावी. वरील मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न आल्यास सदरील बिनशेती मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो सोडून दिला आहे असे समजून सदरील बिनशेती मिळकती निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचे खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. हे सर्वास कळावे.

**ॲड. अशोक पालू डुकरे**
रा. प्रभातदर्शन अपार्टमेंट
ब्लॉक नं. १०१, ममदापूर रोड,
नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड
फोन नं. ९८८१२७९८१७

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे-ममदापूर, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत आमचे अशिल यांनी त्यांचे खालील नमूद विद्यमान मालक यांच्याकडून विकत घेण्याचे ठरविले आहे.

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हि.नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| रमेश बाबू-सोनावळे व इतर | २९ | २ | ०-०७-०० | ०=०६ |

तरी वरील मिळकतीसंदर्भात कोणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, बक्षिस, वारस हक्क, पोटगी, लीन, चार्ज, ताबा, वहिवाट अथवा कोणत्याही स्वरुपाचा कसलाही हक्क हितसंबंध असल्यास त्यांना ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांचे आत खालील सही करणार यांचे पत्त्यावर प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरुपात हरकत घ्यावी. वरील मुदतीत कोणाचाही लेखी हरकत न आल्यास सदरील मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो सोडून दिला आहे असे समजून सदरील मिळकती निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचे खरेदीखताचे व्यवहार पूर्ण करतील. मागाहून मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. हे सर्वास कळावे.

ठिकाण : नेरळ
दिनांक :- ३१-१-२०२२

**ॲड. अशोक पालू डुकरे**
रा. प्रभात दर्शन अपार्टमेंट
ब्लॉक नं. १०१, नेरळ
ता. कर्जत, जि. रायगड
मो. ९८८१२७९८१७

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे-भडवळ ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची बिनशेती मिळकत आमचे अशिल यांनी खालील नमूद विद्यमान मालक यांचेकडून कायमस्वरुपी खरेदी घेण्याचे ठरविले आहे.

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | प्लॉट नंबर | क्षेत्र चौ.मी. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| प्रसाद दिनकर पाटील | २५/२/अ/५ | ५ | २८० चौ.मी. | २८.०० |

तरी वरील बिनशेती मिळकती संदर्भात कोणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, बक्षिस, वारस हक्क, पोटगी, लीन, चार्ज, ताबा, वहिवाट अथवा कोणत्याही स्वरुपाचा कसलाही हक्क हितसंबंध असल्यास त्यांना ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून चौदा (१४) दिवसांचे आत खालील सही करणार यांचे पत्त्यावर प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरुपात हरकत घ्यावी. वरील मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न आल्यास सदरील बिनशेती मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो सोडून दिला आहे असे समजून सदरील बिनशेती मिळकती निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचे खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. हे सर्वास कळावे.

**ॲड. अशोक पालू डुकरे**
रा. प्रभातदर्शन अपार्टमेंट
ब्लॉक नं. १०१, ममदापूर रोड,
नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड
फोन नं. ९८८१२७९८१७

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे-भडवळ ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची बिनशेती मिळकत आमचे अशिल यांनी खालील नमूद विद्यमान मालक यांचेकडून कायमस्वरुपी खरेदी घेण्याचे ठरविले आहे.

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | प्लॉट नंबर | क्षेत्र चौ.मी. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| विनीता हेमंत पाटील | २५/२/अ/६ | ६ | ३४० चौ.मी. | ३४.०० |

तरी वरील बिनशेती मिळकती संदर्भात कोणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, बक्षिस, वारस हक्क, पोटगी, लीन, चार्ज, ताबा, वहिवाट अथवा कोणत्याही स्वरुपाचा कसलाही हक्क हितसंबंध असल्यास त्यांना ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून चौदा (१४) दिवसांचे आत खालील सही करणार यांचे पत्त्यावर प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरुपात हरकत घ्यावी. वरील मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न आल्यास सदरील बिनशेती मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो सोडून दिला आहे असे समजून सदरील बिनशेती मिळकती निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचे खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. हे सर्वास कळावे.

**ॲड. अशोक पालू डुकरे**
रा. प्रभातदर्शन अपार्टमेंट
ब्लॉक नं. १०१, ममदापूर रोड,
नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड
फोन नं. ९८८१२७९८१७

आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ MH/MR/RGD/RNP-16/2018-21 (31-12-2022)
सोमवार, दि. ३१ जानेवारी २०२२


## म ह त्त्वा चे

### दोन अपघातात दोन ठार

**पनवेल :** पनवेल परिसरात झालेल्या दोन वेगवेगळ्या अपघातात दोन ठार, एक जखमी झाल्याची घटना घडली आहे. पनवेल जवळील वडघर फाटा येथून एमपीएससी कॉलेजकडे जाणाऱ्या रस्त्यावर एका पादचाऱ्याला अज्ञात वाहनाची धडक बसून त्यात त्याचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. या घटनेतील मृत व्यक्तीच्या नातेवाईकांचा तसेच अज्ञात अपघात करणाऱ्या वाहनाचा शोध पनवेल शहर पोलीस करीत आहेत. तर दुसऱ्या घटनेत सीबीडी येथून मोटारसायकलवरून मुंबई बाजूकडे जात असताना तेजस बर्गे व प्रदिप माने यांच्या गाडीवरील नियंत्रण सुटल्याने त्यांनी रस्त्याच्या दुभाजकाला धडक देऊन झालेल्या अपघातात ते दोघे गंभीररित्या जखमी झाले. यात प्रदिप माने याचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे.

### ज्वलनशील द्रव्य पदार्थ जप्त

**पनवेल :** गुजरात वापी येथून सीबीडी बेलापूर परिसरात जाणारा पेट्रोलजन्य ज्वलनशील द्रव्य पदार्थ भरलेला टाटा कंपनीचा टँकर तळोजा हद्दीत एका रिकाम्या जागेत पार्किंग करून या पेट्रोलजन्य ज्वलनशील द्रव्य भेसळयुक्त करताना तळोजा पोलिसांनी व पनवेल तहसील कार्यालयाच्या पथक असे संयुक्तिक कारवाई करून मुद्देमाल जप्त करण्यात आला असून टँकर चालकाला ताब्यात घेऊन गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मात्र हा पेट्रोलजन्य ज्वलनशील द्रव्य पदार्थ बायोडिझेल असण्याची शक्यता असल्याने नमुने तपासणीसाठी पाठविण्यात आले आहे.

### ॲक्टीव्हा गाडीची चोरी

**पनवेल :** शहरातील रेल्वे स्टेशनच्या गेटजवळील कमानीजवळ उभी करून ठेवलेली ॲक्टीव्हा गाडी चोरून नेल्याची घटना घडली आहे. मनोहर शहा (वय-४२) यांनी त्यांची ३० हजारांची होंडा कंपनीची एक्टीव्हा ५जी मॉडेल क्र.-एमएच ४६ बीएल ८३२६ हि रेल्वे स्टेशनच्या गेटजवळील कमानीजवळ उभी करून ठेवली असता अज्ञात चोरट्यांनी सदर गाडी चोरल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# अंबा नदीवरील जुना पूल तोडण्यास सुरुवात

**। सुधागड -पाली । वार्ताहर ।**

वाकण-पाली-खोपोली राज्य महामार्गाच्या रुंदीकरणाचे काम सुरू आहे. शनिवारी (ता.२९) या मार्गावरील जांभूळपाडा अंबानदीवरील जुना पूल तोडण्यास सुरुवात झाली आहे. यावेळी उपस्थित ग्रामस्थांच्या डोळ्यात आनंदाश्रू तरारले तर काहीजण गहिवरले देखील. १९८९ च्या महाभयंकर पुरामध्ये देखील हा पूल खंबीर उभा राहिला होता.

गेली ६७ वर्षे पाली खोपोली या शहरांना व असंख्य गाव आणि लोकांना जोडणारा हा पूल तुटत आहे हे पाहून अनेकजण गहिवरले



तर नवीन पुलामुळे वाहतूक सुरळीत होऊन पावसाळ्यात पुलावरून पाणी जाऊन होणारी गैरसोय आता संपणार आहे हे पाहून अनेकांच्या डोळ्यात आनंदाश्रू तरारले. ग्रामस्थांनी या पुलाशी निगडित त्यांच्या आठवणी यावेळी सांगितल्या.

विलास गलबले म्हणाले की गणपती विसर्जनावेळी या पुलावरून नदीत उड्या मारून पहायचो. आता याजागी उंच मोठे पूल होत असल्याने तसे करणे शक्य नाही.

**|| राज्य महामार्गाच्या रुंदीकरणाच्या कामाला सुरुवात**

दरवर्षी पावसाळ्यात या पुलावरून पाणी जायचे आणि दोन्ही बाजूला वाहनांच्या लांब रांगा लागायच्या लहानपणी या रांगा बघायला आम्हाला मज्जा यायची. आता इथे नवीन पूल झाल्याने वाहनांच्या रांगा लागणार नाहीत आणि शाळेला देखील सुट्टी मिळणार नाही. ही बाब चांगली आहे. मात्र त्यामुळे विद्यार्थ्यांना गंमत येणार नाही. असे शिंदे म्हणाले.

# वीज बिल वसुली कर्मचाऱ्याला धक्काबुक्की

**महिन्यातील दुसरी घटना**

**। महाड । प्रतिनिधी ।**

महाड शहरातील नवे नगर परिसरामध्ये वीज बिलाची थकीत बाकी वसुली करणाऱ्या महावितरण कंपनीच्या वायरमनला वीज ग्राहकाकडून मारहाण करण्यात आली असल्याची घटना घडली असून एका महिन्यामध्ये अशा प्रकारची ही दुसरी घटना असल्याची माहिती वीज वितरण कंपनीकडून देण्यात आली.

महाड तालुक्यातील ग्रामीण त्याचबरोबर शहरी भागातील वीज ग्राहकांकडून थकीत वीज बिलाची वसुली करण्याची मोहिम येथील वीज वितरण कंपनीकडून सुरु करण्यात आली आहे. या मोहिमेअंतर्गत गावांगावात कर्मचारी जाऊन वीज थकबाकी वसुली करीत असताना कांही गावांमध्ये कर्मचाऱ्यांवर हल्ले करण्यात आल्याच्या घटना घडत आहेत. याच महिन्यामध्ये वरंध गावामध्ये वीज बिलाची थकीत बाकी वसुल करण्याकरीता गेलेल्या कर्मचाऱ्यावर हल्ला करण्यात आला.

**कर्मचाऱ्यांमध्ये भितीचे वातावरण**

**२३ जानेवारी रोजी वरंध येथील राजेद्र वसंत धनावडे यांच्याकडे देखील वीज बिलाची थकबाकी असल्याने आणि त्यांच्याकडून वेळेवर वीज बिल जमा न केल्याने त्यांच्याकडील वीज जोडणी तोडण्या करीता गेलेले वीज वितरण कंपनीचे वायरमन समीर मोरे गेले असता त्यांना देखील मारहाण करण्यात आली होती. वारंवार कर्मचाऱ्यांवर वीज ग्राहकांकडून जीवघेणे हल्ले होत असल्याने कर्मचाऱ्यांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले असून कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे.**

ग्राहकांने वीज बिलाची थकबाकी जमा केली नाही तर वीज जोडणी तोडण्याची कारवाई केली जात आहे.

महाड शहरामध्ये शनिवारी नवेनगर परिसरांत असलेल्या सिटी गार्डन या इमारती मधील तुषार सुरेश आठवले या ग्राहकाने वीज बिलाची रक्कम थकविल्यामुळे वीज पुरवठा खंडीत करण्यास गेलेल्या कर्मचाऱ्याशी प्रथम शाब्दीक चकमक झाली, त्यानंतर धक्कबुकी झाली आणि शेवटी कर्मचाऱ्याला मारहाण करण्यात येऊन त्याच्यावर हल्ला करण्यात आला अशी माहिती गोरेगाव येथील वीज वितरण कंपनीचे कर्मचारी तुकाराम पाचपोहे यांनी पोलिसांना दिली आहे. त्यांनी केलेल्या तक्रारीवरुन महाड शहर पोलीस ठाण्यामध्ये भादवी ३५३,३४१,५०४,५०६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# कोकण विभागीय उपाध्यक्षपदी धुरंदर मढवी

**। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।**

महाराष्ट्र पेन्शनर असोसिएशन द्वारा सन २०२२ ते २०२५ या तीन वर्षासाठी नुकताच निवडणुकीचा कार्यक्रम पार पडला. त्यात राज्य स्तरावर काम करण्यासाठी राज्य कार्यकारिणी गठीत करण्यात आली असून या वेळेस कोकण विभागातून राज्य स्तरावर रायगड जिल्ह्याचे विद्यमान अध्यक्ष धुरंदर श्रीराम मढवी मु. पेण यांची एकमताने निवड करण्यात आली. धुरंदर मढवी यांचा कामाचा उरक पाहता व सेवानिवृतांच्या समस्यांना सतत न्याय दिल्याने त्यांची कोकण विभागीय उपाध्यक्षपदी निवड झाली आहे.



मढवी यांनी पेन्शनच्या टेबलवर काम केलेले असल्याने संघटनेचे काम करताना त्यांना या अनुभवाचा मोठा लाभ झाला आहे. मढवी हे एक अभ्यासू व कर्तबगार अध्यक्ष म्हणून त्यांची ख्याती आहे. त्यांच्या निवडीमुळे रायगड मधील सेवानिवृतांना मोठा दिलासा मिळणार आहे. त्यांच्या निवडीबद्दल अलिबाग तालुका अध्यक्ष सुधीर पाटील, सदानंद पाटील, द.र.मोकल, सु.पाटील, राम म्हात्रे इत्यादी जिल्हा सदस्यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

# मुरुडचे मासळी मार्केट फुलले

**दोन महिन्यानंतर मासळी विक्रीला; भाव मात्र गगनाला**

**। मुरूड-जंजिरा । वार्ताहर ।**

तब्बल दोन महिन्यानंतर मुरूडच्या मार्केटमध्ये रविवारी सुरमई, कोलंबी, पापलेट, आंबाड, बांगडा, कालव, जिताडा, तांब, बोईट, करली, पाला, रावस, आदी मासळी विक्रीस आल्याने मार्केटचा परिसर ग्राहकांनी फुलला होता; मात्र मासळीचे भाव स्थानिकांना परवडणारे नव्हते. पर्यटक मात्र ताजी मासळी खरेदीसाठी सरसावल्याचे दिसून येत होते. खूप दिवसांनी मासळी मार्केटमध्ये स्थानिक आणि पर्यटकांची मोठी हजेरी दिसत होती.



वादळी वातावरण आणि अति थंडीमुळे दीड ते दोन महिने मासळी मिळत नसल्याने बहुसंख्य नौका किनाऱ्यावर परतल्या होत्या. काहीशी उघडीप मिळाल्याने आणि हाताशी पैसे नसल्याने काही नौका जवळील समुद्रात मासेमारीस गेल्या होत्या. भरपूर नाही परंतु काहीशी मासळी मिळाल्याने नौका सकाळी किनाऱ्यावर परतल्या. समुद्र किनारी मार्केट जवळ मासळीचा लिलाव करून मासळी मार्केटमध्ये रवाना करण्यात आली. यावेळी स्थानिक खवय्यांनी मोठी गर्दी केली; मात्र छोटी सुरमईचा दर ५०० रूपये, कोलंबीचा वाटा २०० रूपये, तांब ५०० रूपये, पापलेट जोडी ७०० रूपये, आंबाड वाटा ६० रूपये असे चढलेले भाव होते. मुरूडमध्ये समुद्र जवळ असूनही मासळीचे वाढलेले दर पाहून पर्यटक देखील अवाक झाल्याचे दिसत होते.

अलिबाग, मुरूड, श्रीवर्धन आदी समुद्रकिनारी मिळणारी ताजी मासळी खाण्यासाठी बहुतांश पर्यटक येत असतात. परंतु समुद्रात वाढलेले प्रदूषण, रोज बदलणारी वातावरणाची परिस्थिती यामुळे गेल्या ५ वर्षात मासळी मिळण्याचे प्रमाण घटत गेले.

# ऑनलाईन फसवणूक

**। पनवेल । वार्ताहर ।**

परिसरातील एका युवकाचे एसबीआयचे योनो अकाऊंट कार्ड ब्लॉक होणार आहे, त्यासाठी पॅनकार्ड अपडेट करण्यासाठी एक लिंक पाठवून त्यावर क्लिक करा असे सांगून त्याची सव्वा लाखांची फसवणूक करण्यात आली आहे. ओएनजीसी कॉलनी पनवेल येथे राहणारे जलाधर बेज (वय-३६) असे फसवणूक झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. याबाबतची ऑनलाईन फसवणुकीची तक्रार पनवेल शहर पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे. तरी अशा घटनांना भुलू नये असे आवाहन पनवेल शहर पोलिसांकडून करण्यात आले आहे.

**महर्षी विनोद सिद्धाश्रम सेवामंडळ आयोजित**

# निबंध स्पर्धेचा निकाल जाहीर

**। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।**

महर्षी विनोद सिद्धाश्रम सेवामंडळ केतकीचामळा व गणराज मित्रमंडळ अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्यस्तरीय निबंध स्पर्धेत श्रुती सौरभ भिडे यांनी प्रथम क्रमांक मिळवले तर निर्मला फुलगावकर द्वितीय क्रमांक व तृतीय क्रमांक गीता कळके यांनी मिळवले.

महर्षी विनोद सिद्धाश्रम सेवामंडळ व गणराज मित्रमंडळ अलिबाग यांच्या वतीने महर्षी विनोद यांच्या जन्मशताब्दी वर्षाचे औचित्य साधून विवेकानंद जयंती व महर्षी न्यायरत्न विनोद जयंती

**श्रुती भिडे प्रथम तर निर्मल फुलगावकर द्वितीय**

निमित्त जे.एस. एम.कॉलेज अलिबाग येथे वक्तृत्व स्पर्धा आयोजित केली जाते परंतु गेल्या वर्षा पासून कोरोनाचा प्रादुर्भाव असल्यामुळे वक्तृत्व स्पर्धा ऐवजी राज्यस्तरीय निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.

या राज्यस्तरीय निबंध स्पर्धेला चांगला प्रतिसाद मिळाला होता. १२७ स्पर्धकांनी दिलेल्या विषयावर निबंध पाठविले होते. या निबंधाचे परीक्षण लतिका सुरेंद्र दातार व नीलम जयेश म्हात्रे यांनी केले.

या स्पर्धेत पहिल्या तीन बक्षिसप्राप्त विजेत्यांशिवाय चतुर्थ क्रमांक श्रद्धा गजानन वझे यांनी लिहिलेल्या स्वातंत्र्याची ७५ वर्षे या निबंधास २ हजार रुपये तर पाचवा क्रमांक डॉ. वर्षा देशपांडे यांनी लिहिलेल्या विवाह संस्थेचे भवितव्य निबंधास १ रुपये मिळवले. सर्व विजेता स्पर्धकांना ॲड. अदिती वैद्य , ॲड. श्रीराम ठोसर, डॉ. सुरेंद्र दातार यांच्या हस्ते बक्षिसे देऊन गौरविण्यात आले.

# कामोठ्यातील दुभाजक केले साफ

**कामोठे कॉलनी फोरमचाउपक्रम**

**। कामोठे । वार्ताहर ।**

कामोठे कॉलनी फोरमतर्फे स्वच्छ कामोठे- हरीत कामोठे उपक्रमा अंतर्गत कामोठे हाय वे ब्रिज ते पोलीस स्टेशन चौक रस्त्यामधे असलेल्या दुभाजकावरील कचरा साफ करण्यात आला.

यावेळी झाडे जगवण्यासाठी झाडांच्या आजुबाजुला असलेले गवत अणि कचरा साफ करण्यात आला. यावेळी अनेक ठिकाणी नारळाच्या झावळ्या वायरला लटकलेल्या दिसल्या. या झावळ्यांमुळे रस्त्याने जात असलेल्या दुचाकीस्वारास अडथळा निर्माण होऊन अपघात होण्याची दाट शक्यता आहे.



अशा अनेक फांद्या अणि झावळ्या दुभाजकावरुन काढून टाकण्यात आल्या. अनेक ठिकाणी निर्माल्य दुभाजकावर फेकून दिल्याचे निर्दशनास आले. यावेळी स्वच्छ कामोठे हरीत कामोठेचा संदेश देणारे फलक दाखविण्यात आले. तसेच कामोठे कॉलनी फोरमच्या समन्वयकांनी शहर सुशोभिकरणाची मोहीम हाती घेतली असून यामधे पालिका अणि सिडको प्रशासनाचे सहकार्य अपेक्षीत आहे. पुढील ७ दिवसांत कामोठे शहरातील दुभाजक जर स्वच्छ नाही करण्यात आले तर दुभाजकांवरील कचरा सिडको ऑफिसला नेऊन टाकण्यात येईल असा इशारा कॉलनी फोरमच्या वतीने देण्यात आला.

या स्वच्छता मोहिमेध्ये कामोठे कॉलनी फोरमचे अध्यक्ष मंगेश अढाव, महिला अध्यक्ष जयश्री झा, फोरमचे समन्वयक बापू साळुंखे, समाधान काशिद, डॉ. गारळे, राहुल आग्रे, महेंद्र जाधव, अरुण जाधव, रवी पाढी, हिरा भट, सागर अलदर, संभाजी पवार, अमित घुटूकडे, अरूणा सावंत, शुभांगी खरात, निवेदिता बारापात्रे, सुधा सिंग, मनिषा नीलकंठ सहभागी झाले होते.

# रात्रीचा जाळला जातोय कचरा; कारवाईची मागणी



**। पनवेल । वार्ताहर ।**

नवीन पनवेल परिसरात साठलेला कचरा अज्ञात व्यक्तीकडून रात्रीच्या वेळेस जाळला जात असल्याने प्रदूषणात वाढ होत आहे. तरी अशा व्यक्तींविरूद्ध कारवाईची मागणी नवीन पनवेल मधील स्थानिक रहिवासी करीत आहेत.

नवीन पनवेल येथील परिसरातील अनेक होर्डिंग पाँड येथे फेरीवाले तसेच काही परिसरातील नागरिक रात्रीच्या वेळी कचरा टाकतात. सदर कचरा हा सिडको व महानगरपालिकेच्या माध्यमातून वेळोवेळी उचलला जातो व परिसर स्वच्छ ठेवण्यात येतो. मात्र काही जण हा जमलेला कचरा रात्रीच्या वेळी जाळत असल्याने हवेत मोठ्या प्रमाणात प्रदूषण होते व दुर्गंधी सुद्धा सुटते. कचरा जाळण्यास बंदी असतानाही हा प्रकार केला जातो. तरी अशा व्यक्तींविरूद्ध संबंधित विभागाने कारवाई करावी अशी मागणी स्थानिक रहिवासी करीत आहेत.

# आंबेडकर महाविद्यालयातील ग्रंथालयास कपाटांची भेट

**सह्याद्री मित्रमंडळ रिलायन्स टाऊनशिप नागोठणेचा पुढाकार**

**। पाली/बेणसे । वार्ताहर ।**

जुलै महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे महाड आणि परिसरात प्रचंड हाहाकार माजला होता. यात डॉ. आंबेडकर महाविद्यालय महाडच्या संगणक प्रयोगशाळा व ग्रंथालयाचे प्रचंड प्रमाणात नुकसान झाले होते. जीव, भौतिक व रसायनशास्त्र प्रयोगशाळा ही पूर्णपणे खराब झाल्या होत्या. हे सर्व दुरुस्त करणे किंवा नव्याने उभारणी करणे यासाठी महाविद्यालयाने समाजातील सर्व घटकांना मदतीचे आवाहन केले होते. हा खर्च एक रकमी उभारणे तर जवळपास अशक्यच होते. प्राचार्य, उपप्राचार्य महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व इतर कर्मचारी या सर्वांनी आपापल्या परीने समाज माध्यमांच्या माध्यमातून विविध सामाजिक संघटना,



राजकीय व सामाजिक कार्यकर्ते, मित्रमंडळी यांच्या पर्यंत पोहोचण्याचा यशस्वी प्रयत्न केला.

महाविद्यालयातील जीवशास्त्र विषयाचे प्राध्यापक सुरेंद्र वानखेडे यांचे आवाहन त्यांचे बी. एड. कॉलेज मधील मित्र सुनील घोलप यांच्यापर्यंत पोहोचले. घोलप यांनी सह्याद्री मित्रमंडळ रिलायन्स टाऊनशिप नागोठणे, आपले शिक्षक सहकारी व बी. एड. कॉलेज भोर मित्र आदींच्या पर्यंत हे आवाहन पोहचवून १८ हजार रूपयांची मदत गोळा केली आणि सुरेंद्र वानखेडे यांच्याकडे सुपूर्द केली. याच मदतीतून महाविद्यालयाच्या ग्रंथालयासाठी दोन कपाटे खरेदी करून महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी ती ग्रंथपालांना सुपूर्द केली. दरम्यान आपण केलेल्या आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद देणाऱ्या सर्व देणगीदार मित्रांचे दोघेही मनोमन ऋण व्यक्त करतात.

**अखिल भारतीय संत संमेलनात**

# चिंचवली येथील दिंडी सर्वोत्तम



**। नेरळ । प्रतिनिधी ।**

खालापूर तालुक्यातील इमॅजिका येथे झालेल्या १० व्या अखिल भारतीय संत साहित्य संमेलनात दिंडी स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत रमेश महाराज नाईक यांच्या माऊली महिला वारकरी दिंडी पथकाने पहिला क्रमांक मिळविला आहे. राज्यातील ६०० हून अधिक वारकरी मंडळाच्या दिंडी या संत साहित्य संमेलनात सहभागी झाल्या होत्या.

कर्जत तालुक्यातील चिंचवली येथील माऊली महिला वारकरी संपद्राय मंडळाची दिंडी राज्यातील अन्य दिंडी पथकासह सहभागी झाल्या होत्या. या संत संमेलनात आयोजित दिंडी पथकाने पारंपरिक वेशभूषा करीत सादर केलेले अभंग कीर्तन आणि हरिपाठ यासाठी तीन टप्प्यात गुण देण्यात आले होते. या तीन टप्प्यांत झालेल्या स्पर्धेतील परीक्षकांनी अखिल भारतीय स्तरावर तीन दिंडींना सर्वोत्कृष्ट दिंडीसाठी पुरस्कार जाहीर केले. त्यात रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यातील चिचवली गावातील माऊली महिला वारकरी संप्रदाय मंडळाची दिंडी प्रथम क्रमकांची मानकरी ठरली. महिलांनी नेतृत्व केलेल्या या दिंडीचे नेतृत्व रमेश महाराज नाईक करीत आहेत.

चिंचवली येथील माऊली महिला वारकरी संप्रदाय नंतर सुधागड येथील दिंडीला दुसरा आणि उंबरे येथील दिंडी तिसरी तर सोलापूर तालुक्यातील सोलापूरची दिंडी चौथ्या क्रमांकावर राहिली.

# वांगणीमध्ये जखमी सांबर मादीला जीवदान

**वनविभाग व पाणवठा अनाथाश्रमाची कामगिरी**

***। पाली/बेणसे । वार्ताहर ।***

*जंगलातून रस्ता चुकलेली व कुत्रे मागे लागल्याने घाबरलेली सांबराच्या प्रजातीची जखमी मादी कर्जत जवळील वांगणी गावातील कमलाकर जांगरे यांच्या घरात शिरली होती. घरात शिरलेला प्राणी पाहून सर्वांची एकच तारांबळ उडाली. मात्र या मादीला वनविभाग व पाणवठा प्राणी अनाथाश्रमाचे संचालक गणराज जैन व सदस्यांनी सुखरूप सोडवून उपचार करून सुरक्षित जंगलात सोडले आहे.*

*यावेळी ग्रामस्थांनी प्रसंगावधान दाखवून वनविभागाला या घटनेची त्वरित माहिती दिली. वन विभागाचे राऊंड अधिकारी श्रीकांत राऊत यांनी त्यांच्या टिम सहीत घटनास्थळी धाव घेतली. या प्राण्याची पाहणी केली असता त्यांना ती जखमी झाल्याचे निदर्शनास आले. तिच्यावर योग्य उपचार करता यावे व सांभाळ करण्यासाठी चामटोली-बदलापूर येथील पाणवठा या अपंग प्राण्यांच्या अनाथाश्रमाचे संचालक गणराज जैन यांच्याशी संपर्क केला. जैन यांनी त्वरीत पाणवठाच्या काही सदस्यांना घटनास्थळी पाठवले. वनविभागाचे कर्मचारी, स्थानिक ग्रामस्थ व पाणवठा अनाथाश्रमाचे सदस्य या सर्वांनी तिला सुखरुपपणे पाणवठा अनाथाश्रमात दाखल केले. त्यानंतर पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. प्रिती म्हात्रे यांनी तिच्यावर प्राथमिक उपचार केले. दोन दिवसांच्या अथक प्रयत्नांनतर पुर्णतः स्वस्थ झालेल्या या गोंडस प्राण्याला वनविभागाच्या ताब्यात देण्यात आले व वनविभागामार्फत तिला तिच्या नैसर्गीक आधिवासात परत सोडण्यात आले.*

*यावेळी गणराज जैन, डॉ. अर्चना जैन व त्यांच्या सहकाऱ्यांनी केलेल्या कार्याबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. पाणवठा आश्रमाचे सदस्य नितीन कांबळे, दत्ता लोहकरे, आकाश हिंदोळा, प्रथमेश त्रिभुवन, प्रसाद दळवी, हेमश्वेता पांचाळ, रोहीत गोविलकर, प्रकाश थापा तसेच वनविभागाचे अधिकारी, स्थानिक ग्रामस्थ संसारे व अनेक ग्रामस्थ या सर्वांनी अतिशय मोलाची कामगिरी बजावली आहे.*



**रस्ता चुकलेल्या वन्यप्राण्यांवर गैरसमुजत व जनजागृती अभावी काही गैरप्रकार होतात मात्र याठिकाणी असे काही झाले नाही. उलट स्थानिक लोकांनी दाखविलेली सतर्कता व वनविभाग आणि पाणवठाच्या टीमने घेतलेली मेहनत यामुळे या भरकटलेल्या जीवाचे प्राण वाचले आहेत.**

**– गणराज जैन, संचालक, पाणवठा प्राणी अनाथाश्रम**

## संपादकीय

# दूरगामी निकाल

भारतीय जनता पार्टीच्या १२ आमदारांचे निलंबन पीठासीन अधिकारी भास्कर जाधव यांनी पावसाळी अधिवेशनात केल्यानंतर हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आले होते. त्यावर न्यायालयाने हे निलंबन रद्द करत असताना अशा प्रकारे एक वर्षासाठी निलंबन करणे असंवैधानिक असल्याचे म्हटले आहे. निलंबन करायचेच होते तर ते फक्त एका अधिवेशनापुरतेच असायला हवे होते असेही या निकालात नमूद केले आहे. ओबीसींचे राजकीय आरक्षण कायम राहावे याकरिता आवश्यक असलेली सांख्यिकी माहिती केंद्राकडून मिळावी, असा ठराव विधानसभेत मांडण्यात आला तेव्हा विरोधकांनी जोरदार गदारोळ केला होता. तसेच, अध्यक्षांच्या दालनात शिवीगाळ करत त्यांच्या अंगावर धावून जाण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी भाजपाच्या १२ आमदारांना एका वर्षाच्या कालावधीसाठी निलंबित करण्यात आले होते. सदर निलंबनाची कारवाई ही राजकीय सूडापोटी करण्यात आल्याचाही आरोप करण्यात आला होता. कारण विधानपरिषदेच्या १२ सदस्यांच्या नियुक्तीची कार्यवाही राज्यपालांकडून झालेली नाही. त्यानंतर सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानंतर त्यावर राज्य सरकारला फटकार अशा टीकेपासून सत्तारुढ मंत्र्यांकडून विविध पद्धतीने यावर मतप्रदर्शन करण्यात येत आहे. मात्र अशा प्रकारचा हा पहिलाच निर्णय असल्याने आणि तोही सर्वोच्च न्यायालयाकडून आल्या कारणाने त्याचे दूरगामी परिणाम दिसतील यात शंका नाही. कारण पहिल्यांदाच न्यायपालिका आणि विधानपालिका यांच्या सीमारेषा या निकालाने बदलल्या गेल्या आहेत. विधानसभेचे कार्यक्षेत्र, त्याचे अधिकार आणि त्याचे निर्णय याबाबत विधानसभा अध्यक्षांनी घेतलेल्या निर्णयांना अनेकदा न्यायालयात आव्हान देण्यात आले होते. मात्र कोणत्याही स्वरूपाचे प्रकरण असले तरी सर्वोच्च न्यायालयाने कधीही विधीमंडळाच्या कामामध्ये हस्तक्षेप केला नव्हता आणि सातत्याने विधीमंडळाच्या अधिकाराच्या बाजूने निकाल दिला होता. विधीमंडळ, संसद तसेच न्यायपालिका यांच्या अधिकारांच्या कक्षा आणि सीमारेषा स्पष्टपणे घटनेमध्ये नमूद केलेल्या आहेत. संसद परिसरात तसेच विधानसभेत पीठासीन अधिकारी हाच सर्वोच्च अधिकारी असतो आणि त्यांचा निर्णय अंतिम असतो. त्याअर्थी आपल्या क्षेत्रात तोच न्यायाधीश असतो. त्याच्या या सर्वोच्च अधिकाराला कोणीही आव्हान देत नाही. त्याच्या निर्णयाला आव्हान न्यायपालिकेत देता येत असले तरी कार्यकक्षा सुस्पष्ट असल्याने त्यात न्यायपालिका हस्तक्षेप करत नाही. गैरवर्तवणूक रोखण्यासाठी या निलंबनाच्या अधिकाराचा वापर केला जातो. तसेच विधानसभेचा अवमान झाल्याप्रकरणीही गैरसदस्यांनाही त्या सभेत बोलावून त्यांना शिक्षा केली जाते. महाराष्ट्रातच जे शेकडो आमदारांना निलंबनाच्या कारवाईला सामोरे जावे लागले, त्यापैकी सर्वांत पहिले जांबुवंतराव धोटे हे सगळ्यांना त्यामुळे आठवतात. त्यांनी बोलण्याची संधी नाकारल्याबद्दल विधानसभा अध्यक्षांना पेपरवेट फेकून मारला होता. त्यांना विधानसभेची मुदत संपेतोवर निलंबित करण्यात आले होते. आता मात्र अशा प्रकरणी पहिल्यांदाच सर्वोच्च न्यायालयाने विधानमंडळाच्या क्षेत्रात हस्तक्षेप करत त्यातील सर्वोच्च अधिकाऱ्याचा निर्णय चुकीचा ठरवला आहे. म्हणूनच या निकालाचे परिणाम दूरगामी आहेत आणि देशभरात त्याचे पडसाद उमटलेले भविष्यकाळात दिसतील. तसेच, या निमित्ताने अनेक प्रश्नही उपस्थित होतात. अनिल परब यांनी उपस्थित केलेला मुद्दाही सर्वोच्च न्यायालयापुढे येईल. तो म्हणजे, एक वर्षासाठी निलंबन करणे हे असंवैधानिक असेल तर वैधानिक पदे सहा महिन्यांपेक्षा अधिक काळ रिक्त ठेवणे हेही असंवैधानिक आहे, असा सर्वोच्च न्यायालयाचा निकाल आहे. तसे असूनही महाराष्ट्राच्या राज्यपालांनी विधानपरिषदेच्या १२ आमदारांची नियुक्ती अठरा महिन्यांहून अधिक काळ रोखून धरली आहे. या असंवैधानिक निर्णयाबाबत सर्वोच्च न्यायालयात दाद मागितली जाणारच आहे. शिवाय, आमदारांना निलंबित करण्याचा इतिहास खूप जुना आहे आणि त्यात अनेकदा तीन वर्षांपर्यंतही निलंबने केली गेली आहेत. त्यामुळे सभागृहात सदस्यांच्या वर्तनावर वचक बसतो. त्यादृष्टीने सर्वोच्च न्यायालयाच्या सदर निर्णयामुळे सभागृहात गोंधळ निर्माण करणाऱ्या सदस्यांवर कोणताही वचक उरणार नाही आणि निलंबन फार तर अधिवेशनापुरते असते, असे मानून सदस्य कामकाज न होऊ देण्याच्या हेतूने गोंधळ निर्माण करू शकतात, अशी शक्यताही आहे. कारण या निकालाचा परिणाम देशभरातील विधानमंडळाच्या कामकाजावर होणार यात शंका नाही. मात्र विधानसभा आणि न्यायपालिका यांच्या अधिकार आणि मर्यादा याबाबत नव्याने कायद्याची लढाई सुरू होईल. कारण, सर्वोच्च न्यायालयाच्या या निकालाने विधानसभा तसेच विधानसभा अध्यक्षांच्या अधिकारांवर गदा आलेली आहे. ती मान्य केली जाणार नाही आणि त्याचा सोक्षमोक्ष लागेपर्यंत दीर्घ न्यायालयीन लढाई सुरू, हे मात्र निश्चित!

# अपेक्षांच्या ओझ्याखाली अर्थसंकल्प

स्वाती पेशवे

*संसदेपुढे केंद्रीय अर्थसंकल्प मांडण्याचा दिवस जवळ येतो तशा अर्थमंत्र्यांकडून जनतेच्या, उद्योगविश्वाच्या, बाजाराच्या अपेक्षा व्यक्त होऊ लागतात. गेली दोन वर्षे कोरोनासार'या भीषण संकटाशी झुंज घेत असल्यामुळे हताश झालेलं उद्योगजगत आणि लहरी वातावरणामुळे संकटग'स्त असणारं शेतीजगत अर्थमंत्र्यांच्या घोषणांकडे लक्ष लागून बसलं आहे. सामान्यांच्या याच अपेक्षांना या क्षेत्रातील तज्ज्ञ वाचा फोडतात आणि व्यक्त होतात...*



दरवर्षी जाहीर होणाऱ्या केंद्रीय अर्थसंकल्पाकडून उद्योगजगताप्रमाणेच सर्वच लहान-मोठ्या क्षेत्रांना आणि सर्वसामान्य जनतेला मोठ्या अपेक्षा असतात. या दृष्टीने आगामी अर्थसंकल्पाकडे बघता काही मुद्दे विचारात घेण्याजोगे ठरतात. विविध क्षेत्रातील तज्ज्ञ यावर आपली मतं प्रदर्शित करतात. ज्येष्ठ अभ्यासक प्रा. मुकुंद गायकवाड आगामी अर्थसंकल्पाकडून शेतकरीवर्गाला असणाऱ्या अपेक्षांबद्दल सविस्तर बोलताना म्हणतात, 'पंतप्रधान मोदी यांनी या वर्षात म्हणजेच २०२२ मध्ये शेतकऱ्यांचं उत्पन्न दुप्पट करण्याचं आश्वासन दिलं होतं. तसंच त्यांच्या सरकारनं सादर केलेल्या मागील काही वर्षांच्या अर्थसंकल्पांचा अभ्यास केला असता त्यांनी शेतकरी भिमुख बरेच निर्णय घेतल्याचंही दिसून येतं. या दृष्टीकोनातूनच त्यांनी २०२० मध्ये तीन शेतीविषयक कायदे पारित केले परंतु शेतकऱ्यांच्या दबावामुळे त्यांना ते मागे घ्यावे लागले. या पार्श्वभूमीवर यंदाच्या अर्थसंकल्पामध्ये शेतकऱ्यांचं उत्पन्न दुप्पट करण्यासाठी निश्चितच काही तरतुदी असणार आहेत. पण आत्तापर्यंत शेतकऱ्यांचं उत्पन्न दुप्पट का झालं नाही? हा प्रश्नही विचारात घ्यायला हवा. माझ्या अभ्यासानुसार त्यांनी पूर्वीच्या सरकारांच्या पद्धतीप्रमाणेच फार्म 'क्रेडीट टार्गेट वाढवण्यासार'या सुधारणा किंवा उपाय सुचवले आहेत. म्हणूनच शेतकऱ्यांचं उत्पन्न वाढलं नाही. म्हणूनच या अर्थसंकल्पाकडून मुलभूत आणि काही वेगळ्या उपायांची अपेक्षा आहे. स्वामीनाथन आयोग लागू करावा अशी शेतकऱ्यांची मागणी आहे. कृषीकायदे मागे घेताना सरकारनं शेतकऱ्यांच्या मागण्या मान्य केल्या नव्हत्या. परंतु उत्पन्न दुप्पट करायचं असेल तर या शिवाय दुसरा पर्याय नाही. सध्या खताच्या किमती वाढल्या आहेत. अन्नधान्याच्या किमती मात्र पूर्वीच्या पातळीलाच आहेत. हवामानबदलानं शेतकरी मेटाकुटाला आला आहे. त्यांना विमायोजनेची कोणतीही मदत मिळालेली नाही. या सगळ्या बाबींचा विचार करुन येत्या अर्थसंकल्पामध्ये शेतीधंद्यासाठी भरीव आर्थिक तरतूद आणि वेगळे मार्ग अवलंबले जाण्याची अपेक्षा आहे.'

ते पुढे म्हणतात, 'शेतीपुढील आव्हानांचा विचार करता बाजारव्यवस्थेतील सुधारणा अत्यंत महत्वाची आहे. पेट्रोल, डिझेलच्या किमती वाढतात तेव्हा त्याचा बोजा शेतकऱ्यांना सहन करावा लागतो कारण यामुळे वाहतूक महागते. या अर्थसंकल्पाकडून शेतकरीवर्ग विजेच्या बाबतीत फार मोठी अपेक्षा ठेवून आहे. सध्या शेतकऱ्याला पुरेशी वीज दिली जात नाहीच, पण रात्री वीज देणं, खंडित वा अपुरा वीज पुरवठा या अडचणीही मोठ्या आहेत. यामुळे विहिरीत पाणी असूनही शेतकऱ्यांना पिकाला पाणी देता येत नाही. तेलंगणा सरकारनं शेतकऱ्यांना वीज माफ केली तशी सुधारणा या केंद्रीय अर्थसंकल्पाकडून अपेक्षित आहे. हवामानबदलाचा फटका सहन करण्यासाठी विमायोजना अधिक कार्यक्षम करणाऱ्या तरतुदी या केंद्रीय अर्थसंकल्पाकडून अपेक्षित आहेत. शेतकऱ्यांना कर्जमाफी नको परंतु कर्ज कमी व्याजानं पाहिजे. खेरीज क्रेडीट कार्डच्या माध्यमातून कर्ज उचलण्याची सोय सक्षम आणि सोयीची व्हायला हवी. आता केवळ टार्गेट वाढवून जमणार नाही. याबरोबरच ग्रामीण भागातले रस्ते, शेतकऱ्यांचं आरोग्य, आयात-निर्यात व्यापार याकडेही अधिक लक्ष देण्याची गरज व्यक्त केली जात आहे.'

केंद्रीय अर्थसंकल्पाकडून असणाऱ्या अपेक्षांबद्दल बोलताना ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ गोविंद पटवर्धन म्हणतात, 'आयकर कायद्यात ज्याकाही सवलती दिल्या आहेत त्याची मर्यादा वर्षानुवर्षे तीच आहे. चलनाचं अवमूल्यन आणि आजची परिस्थिती तसंच गरजा लक्षात घेता त्यात वाढ करणं अपेक्षित आहे. उदा. अज्ञान मुलाचं रु. १५०० पेक्षा जास्त उत्पन्न हे पालकांचं उत्पन्न गृहीत धरलं जातं. ही मर्यादा वाढवून ती १०,००० तरी करावी. विमा, पीपीएफ इत्यादी मधील रु. १,५०,००० गुंतवणूक वजावट पात्र आहे. ती मर्यादा आता रु. ३,००,००० करावी. कलम ८० न्वये अनेक वजावटी दिलेल्या आहेत, त्यात अनेक वर्षे वाढ केलेली नाही. खरंतर दर तीन वर्षानं महागाई निर्देशांकानुसार वाढ करावी असा नियम केला तर दर वर्षी अशी मागणी करायची गरजच पडणार नाही.'

याच ओघात ते सांगतात, 'जीएसटी येऊन आता पाच वर्षे होत आली आहेत. कायदा नवीन असताना शासनानं 'गुड अँड सिंपल कायदा' अशी त्याची भलावण केली होती. बहुतेक व्यापारी, उद्योजक हे बीजेपी समर्थक आणि मोदीभक्त असल्यानं त्यांना ते खरंच वाटलं. मनुष्यबळ असणाऱ्या मोठ्या कंपन्यांना त्याचा त्रास वाटला नाही, परंतु हा कायदा नोकरशाहीनं लिहिलेला आहे. म्हणूनच इनपुट टॅक्स क्रेडीट मिळण्यास ज्या अवाजवी अटी आहेत त्या आता काढून टाकाव्यात. ते न मिळाल्यास धंदा करणं अवघड जाईल. अनेक तरतुदी किचकट, अवाजवी, अन्याय्य आहेत. छोट्या आणि मध्यम करदात्यांना हळूहळू याची जाणीव होऊ लागली आहे. जीएसटीसाठी सक्षम संगणक प्रणाली महत्त्वाची आहे. मुळ कायद्यात काही वाजवी तरतुदी होत्या पण संगणकाच्या सोयीनं त्यात बदल केले (तेही पूर्वलक्षी प्रभावानं). यामुळे अनेक व्यापारी त्रस्त झाले आहेत.'

ते पुढे म्हणतात, 'एकदा विवरणपत्रक भरलं की त्यात दुरुस्ती करता येत नसल्याचा फटका अनेकांना बसला आहे. दुरुस्तीची तरतूद करावी पण शासकीय अट्टाहास करायचाच असेल तर निदान आतापर्यंत ज्या चुका झाल्या असतील त्या सुधारण्याची एक संधी द्यावी अशीही अपेक्षा आहे. व्यवसाय कर माफ असणाऱ्यांनी एखादा करपात्र व्यवहार केला आणि उलढालीची मर्यादा ओलांडली की त्याची नोंदणी घेणं बंधनकारक आहे. आता त्यात बदल करणं आवश्यक आहे. थोडक्यात सांगायचं तर गेली दोन वर्षे छोट्या आणि मध्यम करदात्यांना फार कठीण गेली आहेत. सरकारनं त्यांना आर्थिक पाठबळ द्यावं आणि कर कायद्याचा जाच होणार नाही हे डोळ्यासमोर ठेऊन योग्य ते बदल करावेत असं वाटतं.'

याच विषयावर सविस्तरपणे आपली मतं मांडताना प्रसिद्ध अर्थतज्ज्ञ गिरीष जखोटिया म्हणतात, 'आगामी अर्थसंकल्पाकडून सर्वसामान्यांच्या बऱ्याच अपेक्षा आहेत. त्यातली एक महत्त्वपूर्ण अपेक्षा म्हणजे सरकारनं काही ठिकाणी कर विशेषत: जीएसटी कमी करणं ही आहे. हे करुन काही प्रमाणात महागाईला आळा घालता येईल का, याचा सरकारनं विचार करावा. खरं सांगायचं तर ही तातडीची गरज आहे. कनिष्ट मध्यमवर्गीय आणि गरिबांसाठी ती अत्यंत महत्वाची बाब आहे. उच्चमध्यमवर्गीय आणि श्रीमंतांना वाढत्या महागाईच्या झळा सतावत नाहीत पण देशातला केवळ २० टक्के समाज या वर्गात असून उर्वरित ८० टक्के जनता कनिष्ट मध्यमवर्गीय आणि गरीब वर्गात मोडते. त्यामुळेच ही अपेक्षा महत्त्वपूर्ण आहे.'

ते पुढे म्हणतात, 'दुसरी अपेक्षा म्हणजे मध्यमवर्ग थेट स्टॉकमार्केटमध्ये जाऊन गुंतवणूक करु शकत नाही. त्यांचा तेवढा अभ्यास नसतो. त्यांच्या मनात भीती असते. सध्या एफडीचे व्याजदर प्रचंड कमी आहेत. महागाईचा दर नऊ टक्के असेल तर त्यातुलनेत एफडीवर खूपच कमी दरानं व्याज मिळतं. त्यामुळे निवृत्तीवेतनावर गुजराण करणारे, एफडीतून मिळणाऱ्या व्याजावर घर चालवणाऱ्यांना मोठी समस्या जाणवत आहे. हे व्याजदर वाढावेत अशी त्यांची अपेक्षा आहे. तिसरी अपेक्षा कोरोनामुळे रोजगार गमावलेल्यांची आहे. कोरोनाकाळात अनेकांच्या नोकऱ्या गेल्या. पगार कमी झाले. आजही अनेकांना अर्धवेळ काम मिळतं. त्यांच्यासाठी सरकार काही योजना आणू शकतं का, हा प्रश्न आहे. हे सरकार शेतकऱ्यांना वर्षाला सहा हजार रुपये देतं, (ही मदत किरकोळ असली तरी) तसं या वर्गाबाबतही विचार होण्याची अपेक्षा आहे. गेली अडीच वर्षे कोरोनाशी झुंजणाऱ्या वर्गाला ही मोठी मदत होईल. त्यांच्यासाठी एखादी स्किम जाहीर करणं गरजेचं आहे. अपेक्षेचा चौथा मुद्दा शेतकऱ्यांसंबंधी आहे. किमान हमी भावाबद्दल सरकारनं आधीच खूप गोंधळ घातला आहे. स्वामीनारायण अहवालामध्ये मूळ किंमत अधिक पन्नास टक्के नफा असं ठोबळरित्या सुचवलं आहे. पण या अहवालात 'कॉस्ट' कशाला म्हणतात याबाबतही गोंधळ आहे. त्यांनी सुचवलेल्या तीन पद्धतींही परिपूर्ण नाहीत. त्यामुळेच या त्रुटी दूर करुन हे सरकार महत्त्वाच्या किमान वीस पिकांसाठी किमान हमीभाव जाहीर करु शकतं का, हा प्रश्न आहे. अर्थात याबाबत फारशी अपेक्षा नाही कारण हे करायचं तर सरकारनं वर्षभर चाललेला शेतकऱ्यांचा संप टाळला असता. फक्त पंजाब-हरियाणाला शिव्या देऊन चालणार नाही कारण हा प्रश्न सगळ्याच शेतकऱ्यांचा आहे. महाराष्ट्रात उठाव झाला नाही म्हणजे इथले शेतकरी समाधानी आहेच असा त्याचा अर्थ नाही. मूळ प्रश्न अत्यंत गंभीर आहेत. म्हणूनच सरकारला इथे महत्त्वपूर्ण पावलं उचलावी लागतील.'

आणखी मुद्दे उपस्थित करताना ते म्हणतात,'अर्थसंकल्पाकडून अन्य अपेक्षांही आहेत. माणसाच्या सहा गरजा म्हणजेच अन्नधान्य, उर्जा, शिक्षण, वीज, पाणी, प्रवास आणि निवास यामध्ये सामान्य माणूस पिडला गेला आहे.

## नराधमांना कठोर शिक्षा द्या!

महिलांवरील अत्याचार, विनयभंगाच्या घटना देशात रोज कुठे न कुठे तरी घडत आहेत, ही अतिशय संतापजनक बाब आहे. रायगड जिल्ह्यातील वडखळमध्ये सतरा वर्षीय तरुणीवर पंधरा ते वीस जणांनी सामूहिक बलात्कार केल्याची घटना शनिवारी उघडकीस आली. या संपूर्ण घटनेने रायगड जिल्हा हादरुन गेला असून, महिलांची सुरक्षा चिंतेचा विषय ठरत आहे. जिल्ह्यात वारंवार होणाऱ्या महिला अत्याचाराच्या घटनांमुळे महिला वर्गात भीतीचे वातावरण पसरले आहे. परंतु, अशी घाणेरडी कृत्ये करणाऱ्या नराधमांना ना कायद्याची भीती, ना केलेल्या कृत्याची लाज, हीच चिंतेची बाब आहे. कायद्यात बदल करून त्यावर थोडे नियंत्रण करता येईल. पण, त्याचबरोबर महिलांबद्दल पूर्वापार रूजलेला दूषित दृष्टिकोन बदलण्यासाठी समाजाची मानसिकता बदलणे गरजेचे आहे. बलात्कार्याला फाशीची शिक्षा देऊन प्रश्न सुटणार नाहीत. आपल्याकडे खून केला तर फाशीची शिक्षा आहे. पण, तरीही खून होत नाहीत का? अशा घटनांनी समाजातल्या चांगल्या संस्काराचे अध:पतन झाल्यासारखे वाटते. कमी कपड्यामुळे स्त्रियांवर अत्याचार होतात, हा मुद्दा तर हस्यास्पदच आहे. आपल्याकडे सात वर्षांच्या चिमुकलीपासून सत्तर वर्षांच्या वृद्धेवर पण बलात्कार होतात, तेव्हा हा मुद्दा लागू पडतो का? अत्याचाराचा दोष स्त्रीला देणे, हे पुरूषांच्या विकृत मनोवृत्तीचे लक्षण आहे. स्त्रीने कसे वागावे, राहावे हे ठरवण्याचा पूर्ण अधिकार स्त्रीला आहे. आजकाल सोशल मीडियावर चर्चा असते, की बालपणापासून तिला ज्यूडो कराटे शिकवा तिच्या हाती तलवार द्या. सात महिन्यांच्या बाळाला किंवा एखादी मुलगी अपंग, मानसिक रोगी असेल तर हे शक्य आहे का? या चर्चा करताना कोणीही पुरुषांची मानसिकता बदलली पाहिजे, असे बोलत नाही. स्त्री ही फक्त उपभोग्य वस्तू नसून, ती कुटुंबाचा आधार आहे, पाया आहे, हा संस्कार मुलांवर केला तर अशा गुन्ह्यांची शक्यता कमी होईल. कायद्यात सुधारणा करून, कायद्याची भीती निर्माण झाली तर बलात्काराचे गुन्हे नियंत्रणात येतील. पण, याचे उच्चाटन करायचे असेल तर कुटुंबाने संस्कार करून समाजाची मानसिकता बदलणे गरजेचे आहे. आजच्या गुन्हेगारांना दयाभाव न दाखवता कठोर शिक्षा व पीडित स्त्रियांना आत्मसन्मान मिळवून देणे, ही आजची खरी गरज आहे.

## वेळीच सावध व्हावे!

वारा-वारा

राकेश लोहार

इंटरनेटसारखे प्रभावी माध्यम, 'फेसबुक', ट्विटर, व्हॉट्सॲपसारख्या सोशल नेटवर्किंग साइट्स आणि त्यावरच्या तिन्हीत्रिकाळ चालणाऱ्या गप्पाटप्पा, काही विधायक आणि बरेसचे निरर्थक उपक्रम व अन्य ॲक्टिव्हिटीज ज्यांच्या दैनंदिन जीवनाचा, आयुष्याचा अविभाज्य भाग बनून गेल्या आहेत. आज सोशल मीडियाच्या आहारी गेलेल्यांची संख्या दिवसेंदिवस वेगाने वाढत चालली आहे. 'फेसबुक'पेक्षा ट्विटर, व्हॉट्स ॲप यांसारख्या सोशल साइट्सवर आपल्याला अधिक खुलेपणाने थेट व्यक्त होता येते, हे या तरुणाईला उमजले आहे. ट्विटर वा इन्स्टाग्रामसारख्या साइट्सवर कुणालाही त्याचा वैयक्तिक तपशील जगजाहीर करता येतो. 'फेसबुक'चा ज्या प्रकारे गैरवापर होतो आहे, व्यक्तींची बदनामी होते आहे, ब्लॅकमेल केले जात आहे, शोषण केले जात आहे; त्यातूनच आज महिलांवरील अन्याय-अत्याचाराच्या घटना, मुला/मुलींचे वाढते अपहरण या घटना वाढत आहेत. सोशल मीडियामुळेच या घटनांना आज खतपाणी घातले जात आहे. नकळत्या वयातील, अल्पवयीन, स्वत:चे बरे-वाइट समजू न शकणाऱ्या मुला-मुलींना 'फेसबुक' वापराचे वा पोस्ट्स पब्लिक केल्यास शक्यप्राय धोके समजावून देण्याची गरज आहे. 'फेसबुक' आपल्याला मानसिकदृष्ट्या परावलंबी बनवते, आपला आत्मविश्वास खचवते, त्या धोक्यांविषयीही मोठ्यांनी तर स्वत:हून शहाणे व्हावे. परंतु, आपल्या पाल्याचे पालकांनीच उचित समुपदेशन करावे, जेणेकरुन आपली मुले त्याच्या आहारी जाणार नाहीत. आजचे वास्तव असे आहे की, 'फेसबुक' वा अन्य साईटवरील प्रतिमेला आम्ही अधिक महत्त्व देऊ लागलो आहोत. यामुळेच एकंदर समाजस्वास्थ्यासाठी आणि या अल्पवयीन, अनभिज्ञ प्रजेचे मानसिक दौर्बल्य वाढू नये यासाठी ऑनलाइन फसवणूक, शोषण, छळ याविरुद्ध लढत असलेल्या संस्थांनी, व्यक्तींनीही पुढाकार घेऊन याबद्दल जनजागरण करायला हवे. मैदान खुले वाटले तरी याच मैदानातील हिरवळीखाली खड्डे, खाचखळगे असू शकतात आणि त्यामुळे घात-अपघात, इजा होऊ शकते, याची जाणीव सोशल मीडियानेच नव्या पिढीला करुन द्यायला हवी. अन्यथा येणारा काळ अजून कठीण होईल. आणि, चांगल्या गोष्टींपेक्षा वाईटाचा प्रचार-प्रसार अधिक होईल.




आणि जो सूर्यग्रहाच्या अंत:प्रदेशात प्रवेश करु शकतो त्याची तुलना परम सत्याच्या साकार रुपाचा साक्षात्कार करणाऱ्याशी करता येते. म्हणून सर्व प्रकारचे विद्यार्थी जरी परम सत्य या एकाच विषयाच्या अध्ययनात मग्न असले तरी भक्त किंवा ज्यांनी परम सत्याच्या भगवान स्वरुपाचा साक्षात्कार केला आहे ते सर्वश्रेष्ठ अध्यात्मवादी आहेत. सूर्यप्रकाश, सूर्यगोल आणि सूर्यग्रहातील आंतरिक व्यवहार एकमेकांपासून अलग करता येत नसले तरी तीन विविध अवस्थांचे अध्ययन करणारे विद्यार्थी एकाच प्रकारचे नसतात.

भगवान या संस्कृत शब्दाचे स्पष्टीकरण, व्यासदेवांचे पिता, महान आचार्य पराशर मुनी यांनी केले आहे. संपूर्ण ऐश्वर्य, संपूर्ण बल, संपूर्ण यश, संपूर्ण सौंदर्य, संपूर्ण ज्ञान आणि संपूर्ण वैराग्य यांनी युक्त अशा सर्वश्रेष्ठ व्यक्तित्वास भगवान असे म्हटले जाते. असे अनेक लोक आहेत जे अत्यंत श्रीमंत, अत्यंत बलवान, अत्यंत सुंदर, अत्यंत प्रसिद्ध, अत्यंत ज्ञानी आणि अत्यंत अनासक्त विरागी आहेत; पण कोणीही ठामपणे सांगू शकत नाही की, त्याच्याकडे संपूर्ण ऐश्वर्य, संपूर्ण बल इत्यादी सर्व पूर्ण रुपामध्ये आहे. केवळ श्रीकृष्णच तसे ठामपणे सांगू शकतात कारण ते पुरुषोत्तम श्रीभगवान आहेत. ब्रह्मदेव, भगवान शिव, नारायण किंवा कोणत्याही जीवाकडे श्रीकृष्णांइतके संपूर्ण ऐश्वर्य नाही. म्हणून स्वतः ब्रह्मदेवांनी ब्रह्मसंहितेमध्ये स्पष्टपमे सांगितले आहे की, श्रीकृष्ण हेच पुरुषोत्तम श्रीभगवान आहेत. त्यांच्या बरोबरीचा किंवा त्यांच्यापेक्षा श्रेष्ठ असा कोणी नाही. तेच आदिपुरुष किंवा भगवान आहेत व गोविंद या नावाने जाणले जातात आणि तेच सर्व कारणांचे परम कारण आहेत.

ईश्वरः परमः कृष्णः सच्चिदानंद विग्रहः ।
अनादिरादिर्गोविन्दः सर्वकारणकारणम् ।।

'भगवंतांच्या गुणांनी संपन्न अशा अनेक व्यक्ती आहेत; परंतु श्रीकृष्ण हेच सर्वश्रेष्ठ आहेत कारण, कोणीही त्यांची बरोबरी करु शकत नाही. तेच परम पुरुष आहेत आणि त्यांचे शरीर शाश्वत, पूर्णपणे ज्ञानमय आणि पूर्णपणे आनंदमयी आहे (सच्चिदानंद), तेच आदिपुरुष श्रीगोविंद असून सर्व कारणांचे मूळ कारण आहेत.' (ब्रह्मसंहिता ५.१)

श्रीमद्‌भागवतातसुद्धा पूर्ण पुरुषोत्तम भगवान यांच्या अनेक अवतारांची यादी आहे, पण श्रीकृष्णांचे आदिपुरुष श्रीभगवान असेच वर्णन करण्यात आले आहे व त्यांच्यापासूनच अनेकानेक अवतारांचा विस्तार होतो.

एते चांशकलाः पुंसः कृष्णस्तु भगवान् स्वयम् ।
इन्द्रारिव्याकुलं लोकं मृडयन्ति युगे युगे ।।

'या ठिकाणी भगवंतांच्या ज्या अवतारांची यादी देण्यात आली आहे ती म्हणजे भगवंतांची विस्तारित रुपे आहेत किंवा त्यांच्या विस्तारित रुपांची अंशरुपे आहेत, पण श्रीकृष्ण हे स्वतः पूण पुरुषोत्तम भगवान आहेत.' (श्रीमद्‌भागवत १.३.२८)

म्हणून परमात्म्याचे आणि निर्विशेष ब्रह्माचे उगमस्थान असणारे श्रीकृष्ण हेच पूर्णपुरुषोत्तम भगवान परम सत्य आहेत.

पूर्ण पुरुषोत्तम भगवंतांच्या उपस्थितीत अर्जुनाचा आपल्या नातलगांबद्दलचा शोक हा निश्चितच अशोभनीय आहे आणि म्हणून श्रीकृष्ण कृतः म्हणजेच कोठून या शब्दांत आपले आश्चर्य व्यक्त करतात. आर्य म्हणून जाणल्या जाणाऱ्या सुशिक्षित समाजातील व्यक्तींकडून अशा प्रकारचे दौर्बल्य कधीच अपेक्षित नव्हते. आध्यात्मिक ज्ञानावर आणि जीवनमूल्यांवर आधारित असणाऱ्या समाजातील व्यक्तींनाच आर्य हा शब्द लागू पडतो. जीवनाबद्दलच्या भौतिक संकल्पनेने पछाडलेल्या लोकांना जीवनाचे ध्येय हे परम सत्य, श्रीविष्णू किंवा श्रीभगवान यांची प्राप्ती आहे याचे ज्ञान नसते. ते भौतिक जगाच्या बाह्यात्कारी रुपाद्वारे आकर्षिले गेल्यामुळे त्यांना मुक्ती म्हणजे काय, याचे ज्ञानच नसते. ते भौतिक जगाच्या बाह्यात्कारी रुपाद्वारे आकर्षिले गेल्यामुळे त्यांना मुक्ती म्हणजे काय, याचे ज्ञानच नसते. ज्या लोकांना भौतिक बंधनातून मुक्त कसे व्हावे याचे ज्ञान नसते त्यांना अनार्य म्हटले जाते. अर्जुन जरी क्षत्रिय असला तरी त्याने युद्ध करण्याचे नाकारल्यामुळे क्षत्रियांना नेमून दिलेल्या कर्तव्यांपासून तो च्युत होत होता. अशा प्रकारची भ्याडवृत्ती ही अनार्थांनाच शोभणारी होती.

**(क्रमशः)**

**(भगवद्‌गीता स्पर्धा माहिती पान क्रमांक ८ वर)**

## मराठी गझलकार इलाही जमादार

डी.बी. जगत्पुरिया

जीवनात कुणीतरी आपल्याला मदत करीत असतो. काही देत असते, जेव्हा घेण्यापेक्षा आपण कुणाला काही द्यायची यादी मोठी असते, तेव्हा जीवन सफल होते. विख्यात गझलकार इलाही जमादार साहित्य रसिकांना खूप भरभरुन देऊन गेले. जस कवीश्रेष्ठ कुसुमाग्रजांनी मराठी साहित्याला खूप खूप श्रीमंती देणाऱ्या कविता दिल्या तसे इलाही जमादरांनी गझलेच्या प्रांतात आपल्या अर्थप्रच्युर गझलांनी जमावारी केली. त्यांना सादर करायची व त्यांच्या समवेत कविता सादर करायचं भाग्य मला लाभलं!

या नववर्षाच्या शेवटी त्यांचा प्रथम स्मृतीदिवस आहे. तसे त्यांच्या गझलेची प्रत्येक ओळ रसिकांची दाद खेचून आणणारी. अशी क्षमता सिद्ध करणे प्रत्येकाला जमत नाही.

**'मी शब्दांसगे अविरत भांडत असतो अन् अर्थाचा मी काथ्या कांडत असतो**
**जे मुशीतूनी ताऊन सलाखून निघावे**
**ते कांचन मी बाजारी मांडत असतो'**

अशा ओळी ऐकल्यावर कुणाच्या मुखातून उत्स्फूर्त दाद निघणार नाही? खऱ्या रसिकांचे ओठ क्या बात है! असं उच्चारतील! आपल्या गझलेचा प्रत्येक शेर आपल्या खास कमवलेल्या शैलीत सादर करावयाची त्यांची खासियत होती. ज्याही शेराला त्यांचा हस्तस्पर्श लाभला त्याला सुवर्णाचं परिमाण लाभलं, असं म्हणतांना मला जराही अतिशयोक्ती वाटत नाही. गझलच्या नावावर रसिकांच्या दरबारात कांचन मांडणारे इलाही जमादार एक अस्सल गझलकार होते.

**'तुला वाटते की तुला हे कळाले**
**खरं सांग मित्रा कितीसे कळाले?'**

माणसाला व्यवहारातल्या अनेक गोष्टी कळतात. समजतात असे नाही. तरी तो आपल्याला सर्वच कळते असं भासवत असतो. स्त्रियांचा संदर्भात एका शेरमध्ये गझलकार म्हणतात.

**'शिड सुकाणू नसलेले मी गलबत बाई**
**जीवन म्हणजे तारेवरची कसरत बाई'**

इथे या समर्थ गझलकारांनी आधी आनादीच्या मनातलं अफाट दु:ख एका शेरमध्ये अक्षरबद्ध करुन ठेवलं आहे! काही लोक पूजा करण्यात आरती करण्यात गुंतून आपल्या श्रद्धेचं प्रदर्शन करतात. काही आपल्या वाट्याला आलेल्या कामाला आपला धर्म मानतात. पण इलाही इथे आपलं म्हणणं मांडत रसिकांना आश्चर्याचा धक्का देतात. ते म्हणतात

**'मी न पूजा न आरती केली**
**फक्त श्रद्धेवर सही केली'**

कवी संमेलन असो की मुशायरा त्यात इलाही चैतन्य निर्माण करायचे ते माईकवर आल्यावर आता रसिकता तृप्त होणार याविषयी खात्रीच असायची. मृत्यूला खुलं आव्हान देत ललकारणारे जिगरबाज शायर म्हणजे इलाही जमावार! त्यांनी बिनधास्त लिहून टाकले.

**'मी तुझ्यासाठीच मृत्यो आणली ही जिंदगी**
**तूच दे शिक्षा तिला रे मानली ही जिंदगी'**

आपलं जीवन मृत्यूसाठीच आणलंय असं म्हणायला खरं तर महाधाडस असावं लागत. माणसाला जीवनाचं मोल कळत नाही. त्यामुळे तो मंदास होतो. माजतो. पुढे जाऊन ते म्हणतात.

**'आरास पाहिवी मी माझ्या कलेवराची**
**पाहून अंत्ययात्रा हरवून प्रेत गेले!**

असं असलं तरी इलाहीचा माणुसकीवर अथंग विश्वास होता. या जगात आपण असंख्य, स्वकेंन्द्री अनेक लोक पाहतो. पण आस्थेने, आपुलकीने बोलणारा हाच खरा मोठा माणूस असतो. पदामुळे मोठ्या वल्गना करणारे लोक मोठ्यातले छोटे असतात. खूप खूप खोटे असतात.



इलाही म्हणतात.

**'आयुष्याला नव्याने जगणे मी जमेल का ते बघतो**
**प्रेताला माझ्या सजणे जमेल का ते बघतो**
**शेंदूर फासूनी मजला पाषाण बनविले त्यांनी**
**माणूस म्हणोनी जगणे जमेल का मी बघतो'**

२००४ मध्ये त्यांचा 'अर्घ्य नावाचा तिसरा गझल संग्रह आला. त्रिवार काफिया गझल, मुस्तजाद गझल, अष्टाक्षरी गझल, नखल्लूस गझल, सेमिसरी (तीन ओळींचा शेर) गझल, मक्ताबंद गझल, सवतीकाफिया गझल इ. सर्जनात्मक योगदान त्यांच्या नावावर आहे. आपले आयुष्य गझलेला अर्पण करणारे ते अफलातून समर्पित गझलकार होते. पुरोगामी प्रखर मानवतावादी गझलकार म्हणून त्यांनी स्वत:ला सिद्ध केले. या प्रतिमेला व प्रतिभेला त्यांनी जराही धक्का लागू दिला नाही.

इलाही द्रष्टे गझलकार होते. म्हणून ते लिहून गेले-

**'चितेसारखे जाळ मला बा फुलाप्रमाणे माळ मला**
**शब्दाने हेटाळ मला पण नजरेने कुरवाळ मला'**

त्यांचा आत्मविश्वास खूप दांडगा होता म्हणूनच त्यांनी ठासून सांगितलं

**'अनाथ होईल जगी वेदना माझ्यानंतर**
**छळेल तुजला तुझी वंचना माझ्यानंतर'**

या ख्यातकीर्ती मराठी गझलकाराला विनम्र अभिवादन!

## म ह त्वा चे

### वेंगुर्लेतील युवकाचा अपघाती मृत्यू

**। सिंधुदुर्ग । वृत्तसंस्था ।**

भरधाव वेगाने जाण-ारी दुचाकी रस्त्याच्या कडेला असलेल्या आंब्याच्या झाडावर आदळून झालेल्या भीषण अपघ-ातात चालकाचा जागीच मृत्यू झाला. ही घटना कुडाळ-वेंगुर्ले मार्गावर पिंगुळी-काळेपाणी परिसरात घडली. महेंद्रकुमार सुवालाल सैनी (वय-१९, रा.मठ-गावठणवाडी, वेंगुर्ले) असे त्याचे नाव आहे. याबाबतची माहिती मुकेशकुमार जगदीशप्रसाद सैनी याने कुडाळ पोलिसात दिली. यानुसार पोलीस उपनिरीक्षक सागर शिंदे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी घटनास्थळी जाऊन पंचनामा केला. दरम्यान याबाबत पोलीस ठाण्यात अपघाताची नोंद करण्यात आली आहे. घटनेची अधिक माहिती अशी की, मयत महेंद्रकुमार हा आपल्या दुचाकीवरुन भरधाव वेगाने जात होता. यावेळी अवघड वळणावर त्याचा गाडीवरील ताबा सुटल्यामुळे दुचाकी रस्त्याच्या विरुद्ध दिशेला असलेल्या भल्यामोठ्या आंब्याच्या झाडावर जाऊन धडकली.

या अपघातात चालक महेंद्रकुमार याला गंभीर दुखापत होऊन त्यांचा मृत्यू झाला. तर दुचाकीचा पूर्णतः चक्काचूर झाला आहे. दरम्यान याबाबतची माहिती कुडाळ पोलिसांना मिळताच त्यांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. त्यानुसार पोलीस ठाण्यात अपघाताची नोंद करण्यात आली आहे. तर घटनेचा अधिक तपास शिंदे करीत आहेत.

# सिंधुदुर्ग जिल्ह्यातील ज्ञानमंदिरे आजपासून होणार खुली

**। सिंधुदुर्ग । वृत्तसंस्था ।**

कोरोनाच्या वाढत्या संसर्गाच्या पार्श्वभूमीवर बंद करण्यात आलेल्या इयत्ता पहिली ते बारावी पर्यंतचा शाळा ३१ जानेवारीपासून पुन्हा सुरु करण्याचे आदेश शिक्षणाधिकारी मुस्ताक शेख यांनी दिले आहेत.

मात्र तत्पूर्वी सर्व शिक्षकांना आरटीपीसीआर टेस्ट करून घेण्याचे बंधनकारक करण्यात आले आहेत. यामुळे सुमारे पाऊण महिने बंद असलेल्या शाळा पुन्हा गजबणार आहेत.

**पहिली ते बारावीपर्यंत शाळा सुरु करण्याचे आदेश | शिक्षकांना आरटीपीसीआर चाचणी बंधनकारक**



जानेवारीच्या सुरुवातीलाच जिल्ह्यात कोरोनाची तिसरी लाट सुरू झाली. त्यामुळे जिल्हाधिकारी के. मंजुलक्ष्मी यांच्या सूचनेनुसार जिल्ह्यात ६ जानेवारीपासून पहिली ते आठवीच्या शाळा बंद करण्यात आल्या होत्या. १२ जानेवारी पासून नववी ते बारावी वर्गाच्या शाळा बंद करण्यात आल्या होत्या.

ऑफलाईन शाळा बंद असल्यातरी ऑनलाईन शिक्षण सुरू होतेच परंतु ऑनलाईन नको ऑफलाईन शाळा सुरू करा, अशी मागणी शिक्षक संघटना, शाळा व्यवस्थापन समित्या व पालकवर्ग यांच्यातून होत होती. त्यासाठी जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी व जिल्हा परिषद अध्यक्षा यांना निवेदने सुद्धा देण्यात आली होती.

यानुसार राज्याने २० जानेवारीला आदेश काढत पुन्हा शाळा सुरू करण्याबाबत जिल्हाधिकारी यांना निर्णय घेण्यासाठी प्राधिकृत करण्यात आले होते. मात्र त्यावेळी जिल्ह्यात कोरोनाचे रुग्ण नियमित २०० च्या पुढे मिळत होते. अलिकडच्या चार दिवस कोरोना बाधित संख्या कमी झाली आहे. त्यानुसार जिल्हाधिकारी के. मंजुलक्ष्मी यांनी पुन्हा शाळा सुरू करण्यास अनुमती दिली आहे. त्याप्रमाणे शिक्षणाधिकारी शेख यांनी आज आदेश काढत जिल्ह्यातील बंद असलेल्या पहिली ते बारावी पर्यंतच्या शाळा पुन्हा ३१ जानेवारी पासून सुरू करण्याचे आदेश दिले आहेत.

**निर्बंधांचे बंधन**

*तिसऱ्या लाटेत बंद केलेल्या शाळा सुरु करण्याचे आदेश देताना कोरोना निर्बंधांचे कडक पालन करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. विद्यार्थ्यांची तापमान तपासणी करणे, विद्यार्थ्यांनी नियमित मास्क वापरणे, एका बेंचवर एकच विद्यार्थी बसविणे, या निर्बंधांचे पालन करून शाळा सुरु करण्यास परवानगी देण्यात आली आहे.*

### जिल्ह्यात कोरोनाचा जोर ओसरला

**। ओरोस । वृत्तसंस्था ।**

सिंधुदुर्ग जिल्ह्यात कोरोनाचा जोर ओसरलेला आढळत आहे. ३४८ रुग्णांनी कोरोनावर मात केली आहे. यामुळे सक्रिय रुग्णसंख्या हजाराच्या खाली आली आहे.

जिल्ह्यात आतापर्यंत एकूण ५६ हजार ५०१ कोरोना रुग्ण मिळाले आहेत. यातील ५४ हजार २३ रुग्ण कोरोनामुक्त झाले आहेत. आतापर्यंत १४८७ रुग्णाचे निधन झाले आहे. ९९१ रुग्ण उपचार घेत आहेत. यातील ६० रुग्ण शासन निर्मित कोविड केअर सेंटर, कोविड हेल्थ सेंटर व डेडिकेटेड कोव्हिड हॉस्पिटल या शासकीय संस्थेत उपचार घेत आहेत. उर्वरित ९३१ रुग्ण होम आयसोलेटेड आहेत, अशी माहिती प्रभारी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. श्रीपाद पाटील यांनी दिली.

## चिपळूणमध्ये राष्ट्रपिता गांधी यांना अभिवादन

**। चिपळूण । प्रतिनिधी ।**

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त चिपळूणमधील पूज्य गांधी प्रतिष्ठानच्या वतीने अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन गांधीघाट, गांधारेश्वर येथे आयोजित करण्यात आले होते. याप्रसंगी परिसरातील विविध मान्यवरांनी एकत्र येत महात्माजींच्या विचारांना उजाळा दिला.

या कार्यक्रमासाठी उपस्थित मान्यवरांनी महात्मा गांधी यांच्या समाधीचे दर्शन घेतल्यानंतर उत्तरा साडवीलकर व त्यांचे सहकारी यांनी महात्माजींची आवडती




भजने सादर केली. यावेळी आ. शेखर निकम यांच्या हस्ते समाधीची देखभाल करणारे विश्वास गुढेकर यांचा यथोचित सन्मान करण्यात आला. तसेच माजी आ. रमेश कदम यांच्या हस्ते शर्वरी कुडाळकर यांचा तर प्रशांत यादव यांच्या हस्ते उत्तरा साडविलकर यांचा सन्मान करण्यात आला.

या कार्यक्रमास नगरसेवक करामत मिठागरी, कबीर काद्री, रत्नागिरी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक संजय रेडीज, ज्येष्ठ राजकीय नेते सुरेश राऊत, माजी उपनगराध्यक्ष लियाकत शाह, माजी उपनगराध्यक्ष रतन पवार, वासुदेव सुतार, शमून घारे, जिल्हा परिषदेचे माजी सभापती विजयराव देसाई, लोकमान्य टिळक स्मारक वाचन मंदिराचे कार्यवाह प्रकाश देशपांडे, माजी नगरसेवक शिरीष काटकर, माजी नगरसेवक रमेश खळे, अरुण भोजने, पूज्य गांधी प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रा. विनायक होमकळस, उपाध्यक्ष जाफर गोठे, सचिव सुनील खेडेकर, कोषाध्यक्ष मंगेश वेस्वीकर, सदस्य सई वरवाटकर, दीपक महाडिक आदी मान्यवर उपस्थित होते.

## स्मिता देवधर यांच्या ५० व्या पुस्तकाचे प्रकाशन

**। चिपळूण । प्रतिनिधी ।**

कोमसाप चिपळूण शाखेच्या वतीने येथील ज्येष्ठ लेखिका स्मिता देवधर यांच्या ५० व्या पुस्तकाचे प्रकाशन नुकतेच ‘लोटिस्मा’च्या बाळशास्त्री जांभेकर सभागृहात समाजवादी विचारवंत प्रा. विनायक होमकळस यांच्याहस्ते झाले. यावेळी ज्येष्ठ लेखक प्रकाश जाधव, नामवंत कवी-समीक्षक अरुण इंगवले उपस्थित होते.

या कार्यक्रमात देवधर यांची राजमाता जिजाऊ, महाराष्ट्राचे लाडके साहित्यिक पु.ल. देशपांडे, काव्यसुमनांजली ही तीन पुस्तके प्रकाशित झाली. मान्यवर पाहुण्यांनी यावेळी देवधर यांच्या लेखनातील



समाजभान, सत्यघटनांचे वर्णन, सातत्य आदींचे महत्त्व विषद केले. प्रा. अंजली बर्वे यांनी ‘काव्यसुमनांजली’ मधील काव्याचे वैविध्य, अर्थ आणि भावसौंदर्य सांगितले. सांस्कृतिक कार्यक्रमात देवधर यांच्या परदेशी एकांकिकेतील प्रवेश, सुंदर माझं घर ही नाटुकली सादर करण्यात आली.

या कार्यक्रमास कोमसापच्या चिपळूण अध्यक्ष डॉ. रेखा देशपांडे, कोमसाप चिपळूण शाखेचे अध्यक्ष प्रा. संतोष गोनबरे, ‘लोटिस्मा’चे कार्याध्यक्ष प्रकाश देशपांडे, कोवॅस संस्थापिका सुमती जांभेकर, डॉ. मीनल थत्ते, सुनील खेडेकर, अभिजित देशमाने, कैसर देसाई उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अरुण इंगवले सूत्रसंचालन मनिषा दामले यांनी तर सांस्कृतिक कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अंजली बर्वे यांनी केले.

## ‘भाषा संवर्धनासाठी पालकांचे प्रबोधन आवश्यक’

**। चिपळूण । प्रतिनिधी ।**

सध्या मातृभाषेपेक्षा इंग्रजी भाषेचे वाढलेले महत्त्व, पालकांचा आपल्या मुलांना इंग्रजी माध्यमातून शिक्षण देण्याकडे असलेला कल आणि त्यामुळे प्राथमिक शाळांमध्ये रोडावलेली पटसंख्या अशा परिस्थितीत आपल्या मराठी भाषेच्या संवर्धनासाठी पालकांचे प्रबोधन होणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन प्रा.संगीता जोशी यांनी केले आहे.

गुरुकुल महाविद्यालयात आयोजित मराठी भाषेचे महत्त्व या विषयावरील कार्यक्रमात प्रमुख



वक्त्या म्हणून त्या बोलत होत्या.

आपल्या वक्तव्यात त्या म्हणाल्या की, आपली मातृभाषा आपला सांस्कृतिक वारसा पुढे चालवत असते. म्हणून तिचे संरक्षण व्हायला हवे. महाराष्ट्रात राहणाऱ्या आपल्या सर्वांची मातृभाषा मराठी आहे. मुलांना प्राथमिक शिक्षण मातृभाषेतूनच दिले गेले पाहिजे तरच विषयाचे आकलन त्याला लवकर होईल हा विश्वास विविध उदाहरणांनी त्यांनी पटवून दिला.

महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ, गट कार्यालय चिपळूण आयोजित ‘मराठी भाषा संवर्धन पंधरवडा’ दिनांक १४ जानेवारी ते २८ जानेवारी या कालावधीत विविध कार्यक्रमांनी सर्वत्र साजरा केला जात आहे. याचाच एक भाग म्हणून कामगार कल्याण मंडळ आयोजित मराठी भाषेचे महत्व या विषयावरील व्याख्यानाचा कार्यक्रम गुरुकुल कॉलेजमध्ये नुकताच संपन्न झाला.

## ६५ वर्षांनी महाजनकोकडून मिळणार दोन गावांना पाणी

**आ.निकम यांच्या माध्यमातून साळवींच्या प्रयत्नांना यश**

**। चिपळूण । प्रतिनिधी ।**

तालुक्यातील पोफळी सय्यदवाडी व कोंडफणसवणे या दोन गावांच्या पाण्याचा प्रश्न महाजनकोच्या अधिकाऱ्यांसमवेत नुकत्याच झालेल्या बैठकीत सुटला आहे. हा प्रश्न आ. शेखर निकम यांच्या माध्यमातून पंचायत समिती सदस्य बाबू साळवी यांच्या पाठपुराव्याला यश आले आहे.

यामुळे या दोन गावांना आता ६५ वर्षांनी मुबलक पाणी मिळणार असल्याने येथील ग्रामस्थांमधून



समाधान व्यक्त केले जात आहे.

पोफळी सय्यदवाडी व कोंडफणसवणे या दोन गावांना पाण्याचा प्रश्न भेडसावत होता. कोयना प्रकल्प अस्तित्वात आल्यानंतर प्रकल्प बाधित गावांना महाजनकोकडून पाणी मिळावे, यासाठी गेल्या काही वर्षांपासून पाठपुरावा सुरू होता. मात्र, हा प्रश्न मार्गी लागत नव्हता.

यानुसार आ. शेखर निकम यांच्या पुढाकाराने नुकतीच पोफळी येथे महाजनकोच्या अधिकाऱ्यांसमवेत बैठक झाली. या बैठकीत महाजनकोच्या अधिकाऱ्यांनी पोफळी येथील साठवण टाकीमधून पोफळी सय्यदवाडी व कोंडफणसवणे या दोन गावांना ग्रॅव्हिटीने पाणी देण्याची ग्वाही दिली. यामुळे या गावातील ग्रामस्थांच्या पाण्याचा प्रश्न सुटण्यास मदत झाली आहे.

यावेळी आ. शेखर निकम यांच्यासह राष्ट्रवादीचे नेते दादा साळवी, जयद्रथ खताते, पंचायत समिती सदस्य बाबू साळवी, संजय मानकर, संजय बामणे, पोफळीचे माजी उपसरपंच अब्दुल्ला सय्यद, इब्राहिम सय्यद, उस्मान सय्यद, किसन पवार, चंद्रकांत पवार, शिवाजी पवार, झिनगरे, शिगवण, आप्पा इंदुलकर, श्याम कदम, तसेच महाजनकोचे मुख्य कार्यकारी अभियंता चोपडे, कुंभार, आदी उपस्थित होते.

## देश-विदेश

# दिल्लीत नो पीयूसी नो पेट्रोल

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

राजधानी दिल्लीत यापुढे तुमच्याकडे वाहनाचे प्रदूषण तपासणी प्रमाणपत्र (पीयूसी) नसेल तर पेट्रोल पंपावर पेट्रोल व डिझेल मिळणार नाही. दिल्लीतील जीवघेण्या प्रदूषणाच्या नेमेची येणाऱ्या समस्येवर अरविंद केजरीवाल सरकारने हा उपाय शोधला आहे.

दिल्लीचा श्वास दरवर्षी गुदमरून टाकणाऱ्या प्रदूषणावर सरकार वेगवेगळे उपाय करत आहे. गेल्या काही वर्षांत दर हिवाळ्यात देशाच्या राजधानीचे रूपांतर गॅस चेंबरमध्ये होते. ऑक्टोबर ते फेब्रुवारी या काळात दिल्लीकरांना भयंकर प्रदूषणाच्या समस्येशी दरवर्षी लढावे



लागते.

दिल्ली विरुद्ध हरियाणा, उत्तर प्रदेशासारखी शेजारची राज्ये यांच्यातील राजकीय आरोप प्रत्यारोपांत हिवाळा उलटून जातो व पुढील वर्षी ये रे माझ्या मागल्या, हीच स्थिती उद्भवते. दिल्लीच्या प्रदूषणात धूर ओकत रस्त्यांवरून धावणारी लाखो वाहने सर्वाधिक म्हणजे किमान ४२ टक्के जबाबदार असल्याचे अहवाल यापूर्वीही समोर आले होते.

**केजरीवाल सरकारचा निर्णय**

दिल्लीच्या परिवहन विभागाच्या आकडेवारीनुसार, आजही तब्बल १२ ते १५ लाख वाहने पीयूसी न घेता सर्रास धावत असतात. यातील अनेक वाहनांवर मंत्रालये, पत्रकार व इतर अनेक स्टीकर चिटकविलेले असल्याने कारवाईबाबत पोलिसांचेही हात बांधले जातात. वाहनांमुळे होणाऱ्या धुराची समस्या कमी करण्यासाठी केजरीवाल सरकारने ऑड-इव्हन, सिग्नलला इंजिने बंद करणे आदी उपाय केले आहेत. आता पीयूसी प्रमाणपत्राचा नियम अनिवार्य करण्यात आला आहे.

**दिल्लीकरांची उदासीनता**

**वाहन खरेदीनंतर एका विशिष्ट कालावधीनंतर दर ६ महिन्यांनी पीयूसी नियमित घेणे बंधनकारक असून युरो-४ व त्यावरील प्रकारच्या वाहनांसाठी वर्षातून एकदा हे प्रमाणपत्र घ्यावे लागते. असे असले तरी कायदा न पाळणे यातच समाधान मानणारे लाखो दिल्लीकर हा नियम धुडकावतात हे लक्षात घेऊन दिल्ली सरकारने हा नियम लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. प्रत्यक्ष अंमलबजावणीसाठी हा मसुदा नागरिकांच्या सूचनांसाठी सार्वजनिक करण्यात येणार आहे.**

दिल्लीतील शेकडो पेट्रोल पंपांवर तशा सूचना देण्यात आल्या आहेत. वाहनसाठीची पीयूसी सहसा पेट्रोल पंपांवरच मिळतात. तरीही ती घेण्यास अनेक वाहनचालक टाळाटाळ करतात. त्यांना अटकाव करण्यासाठी सरकारने १० विभागांत ९६६ प्रदूषण तपासणी केंद्रे तातडीने सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. पीयूसी अनिवार्य करण्याचाही निर्णय त्याच मालिकेतील आहे.

## अमेरिकेला बर्फीय वादळाचा तडाखा

**। न्यूयॉर्क । वृत्तसंस्था ।**

अमेरिकेला बर्फीय वादळाचा मोठा दणका बसला. यामुळे अमेरिकेच्या पूर्वेकडील राज्यांमधील जनजीवन विस्कळीत झाले आहे. जवळपास ७ कोटी लोकांना अंधारात रहावे लागत आहे.

याशिवाय वाहतूक व्यवस्थासुद्धा कोलमडून पडली आहे. राष्ट्रीय हवामान सेवा देणाऱ्या संस्थेने नागरिकांना सावधानतेचा इशारा दिला आहे. या बर्फाच्या वादळाचा सर्वाधिक प्रभाव हा न्यूयॉर्क आणि बोस्टन शहरांमध्ये दिसून आला.

या वादळामुळे काही भागात मोठ्या प्रमाणावर बर्फवृष्टी झाली आहे. तीन फुट थर साचेपर्यंत बर्फ पडला असून जनजीवन विस्कळीत झाले आहे. नागरिकांनी काळजी घेण्याचे आवाहन करण्यात



येत आहे. बॉम्ब वादळाने १ लाख १७ हजार घरांची वीज बंद झाली आहे. किनारपट्टीच्या भागात एक फुट इतका बर्फ पडेल असा अंदाज वर्तवण्यात आला होता. न्यूयॉर्क, न्यू जर्सी आणि बोस्टनमध्ये वादळामुळे आणीबाणी घोषित करण्यात आली आहे. लोकांना घरात राहण्याचं आवाहन करण्यात आलं आहे. शनिवारी ३ हजार ५०० हून अधिक उड्डाणे रद्द करण्यात आली.

फ्लोरिडाच्या दक्षिणेत NWS ने थंडीच्या लाटेचा इशारा दिला होता. वादळामुळे पूर्वेकडील समुद्र किनारपट्टीवरील गावे आणि शहरांमधील लोकांना विनंती केली की घरीच रहा आणि अनावश्यक प्रवास करू नका. मॅनहॅटनच्या उत्तरेला दहा इंच इतकी बर्फवृष्टी झाली. रेल्वेसेवा अंशतः बंद करण्यात आल्या होत्या. न्यूयॉर्क शहरातील रस्त्यावर बर्फाचे तुकडे पडले होते. न्यूयॉर्क आणि न्यू जर्सीत लोकांनी अनावश्यक प्रवास टाळावा असंही प्रशासनाने सांगितलं आहे.

## निवडणूक लढवण्यासाठी बायको पाहिजे

**। औरंगाबाद । वृत्तसंस्था ।**

औरंगाबाद महापालिका निवडणूक लढवण्यासाठी बायको पाहिजे, अशा आशयाचे हे बॅनर असून शहरात तीन ठिकाणी लावण्यात आले असून, या बॅनरची चर्चा राज्यात रंगत आहे. रमेश विनायकराव पाटील यांनी हे बॅनर लावले आहे.

या बॅनरमध्ये मला तीन मुले असल्याने मी निवडणूक लढवण्यासाठी कायद्याच्या चौकटीत बसत नाही. त्यामुळे निवडणूक लढवण्यासाठी बायको पाहिजे. त्यासाठी कुठलीही जातीची अट नाही. कुठल्याही जातीची महिला चालेल. वय वर्ष २५ ते ४० वयोगटातील अविवाहीत, विधवा किंवा घटस्फोटीत महिला चालेल. पण, त्यात एक अट ठेवण्यात आली आहे. या महिलांना दोनच अपत्य असावी. जास्त असेल




**औरंगाबादमधील बॅनरची राज्यात चर्चा**

तर त्या महिलांना स्वीकारण्यात येणार नाही, असे या बॅनरवर लिहिले आहे.

तसेच मी सामाजिक कार्यकर्ता आहे. मी समाजासाठी खूप कामे केली आहेत. पण, लॉकडाऊनमध्ये मला तिसरं अपत्य झालं. त्यामुळे मी निवडणूक लढवण्यासाठी पात्र नाही. माझ्या घरातून एका व्यक्तीनं निवडणूक लढवावी आणि समाजाचे प्रश्न मांडावे असे मला वाटते. त्यामुळे बायको मिळाली तर मी तिला निवडणुकीसाठी उभे करणार.

हे बॅनर लागल्यानंतर मला चार-पाच फोन आले. पण, मी त्यांना काहीही प्रतिक्रिया दिली नाही. दोन-तीन दिवसात आणखी फोन येतील. सर्वांचा विचार करून जी लोकांची सेवा करेल अशा महिलेची निवड केली जाईल. घरातून देखील याला विरोध नाही. आई-वडिलांशी देखील बोलणं झालं आहे. ज्या महिला इच्छूक असतील त्यांनी यावं. त्यांचं स्वागत आहे, असे पाटील यांनी स्थानिक माध्यमांशी बोलताना सांगितलं.

## निराधार महिलांना स्वयंरोजगाराचा आधार

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

विधवा, घटस्फोटित, एकल महिलांना स्वतःच्या पायावर उभे राहता यावे, म्हणून महापालिका स्वयंरोजगाराची साधने पुरवणार आहे. कोव्हिड काळात पती गमावलेल्या महिलांचा या योजनेत प्रामुख्याने समावेश करण्यात येणार आहे. महिलांना स्वयंरोजगार करता यावा यासाठी महापालिकेमार्फत घरघंटी, शिवणयंत्र, वाती यंत्र अशी उपकरणे विकत घेण्यासाठी अर्थसाह्य केले जाणार आहे.

एकीकडे देशात महिला सबलीकरणाची ओरड असताना दुसरीकडे त्यासंदर्भात प्रत्यक्ष कोणतीच कृती करण्यात येत नाही. यामुळे आजही अनेक महिला निराधार असून, त्यांचे आर्थिक स्वावलंबन होत नाही. याच पार्श्वभूमीवर पालिका क्षेत्रातील विधवा, परित्यक्ता, घटस्फोटित, ४० वर्षांवरील अविवाहित महिला, गिरणी कामगार, देवदासी, दारिद्र्य रेषेखालील प्रमाणपत्रधारक महिला, सर्वसाधारण महिला, कोविडमुळे पतीचे निधन झालेल्या महिला अशा सर्व निराधार महिलांना मुंबई महानगरपालिका स्वयंरोजगाराद्वारे स्वावलंबनाचा आधार देण्यासाठी सज्ज झाली आहे. पालिका हद्दीतील केशरी शिधापत्रिक असलेल्या महिलांकडून यासाठी अर्ज मागवण्यात येत आहेत. २ फेब्रुवारीपर्यंत हे अर्ज उपलब्ध होणार असून, पालिका प्रभाग कार्यालयातील समाज विकास अधिकारी यांच्याकडे हे अर्ज उपलब्ध होणार असल्याची माहिती पालिकेच्या नियोजन विभागामार्फत देण्यात आली आहे.

## विनयभंग करणारा गजाआड

**। पुणे । वृत्तसंस्था ।**

पिंपरी शहरात गुन्हेगारीच्या घटना वाढत असताना, दुसरीकडे महिलांवरील अत्याचाराचे प्रमाण वाढले आहे. अशातच हिंजवडी परिसरात महिलेचा विनयभंग केल्याची घटना घडली होती. या घटनेची तात्काळ दखल घेत हिंजवडी पोलिसांनी आरोपीला अटक करून ७२ तासाच्या आत न्यायालयापुढे सादर केले. त्यानंतर शिवाजीनगर न्यायालयाने आरोपीला १८ महिन्याची शिक्षा सुनावली आहे. पोलिसांनी अटक केलेल्या आरोपीचे नाव समीर श्रीरंग जाधव असे आहे. आरोपीने महिलेच्या राहत्या घरी जाऊन छेडछाड करून विनयभंग करून जीवे मारण्याची धमकी दिली. याबाबत या संबंधित महिलेने त्याची तक्रार हिंजवडी पोलिसांत दाखल केली होती.

## भाजपकडून ९९ गुन्हेगारांना तिकीट

**। लखनऊ । वृत्तसंस्था ।**

उत्तर प्रदेशमध्ये जवळपास सर्व पक्षांनी आपल्या उमेदवारांची याद्या जाहीर केल्या असून, या पार्श्वभूमीवर अखिलेश यादव यांनी टीका करताना, भाजपकडून ९९ गुन्हेगारांना तिकीट दिल्याचा आरोप करण्यात आला आहे. अशा आशयाचे ट्विट त्यांनी प्रसिद्ध केले आहे.

उत्तर प्रदेशमध्ये विधानसभा निवडणुकांचे पडघम वाजले असून, सपा आणि भाजपमध्ये जोरदार लढत सुरु असल्याचे समोर येत आहे. थंडीच्या ऐन हंगामात येणाऱ्या आगामी निवडणुकांमुळे राजकीय वातावरणात तापमानाचा पारा दिवसागणिक उच्चांक गाठण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

कारण एकीकडे भाजपचे



**अखिलेश यादव यांची खरमरीत टीका**

सर्व बडे नेते या निवडणुकीच्या मैदानात उतरले असून, दुसरीकडे सपाचे अध्यक्ष अखिलेश यादव हे एकटे लढताना दिसत आहेत.

अखिलेश यादव आणि योगी आदित्यनाथ यांच्यात आरोप प्रत्यारोपांच्या फैरी झाडल्या जात आहेत. त्यातच आता अखिलेश यादव यांनी केलेलं ट्विट सध्या चर्चेत आहे. भारतीय जनता पक्षाकडून गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांना तिकीट दिलं जात असल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

## म ह त्त्वा चे

### गणपत धर्मा हजारे यांचे निधन

। नेरळ । प्रतिनिधी ।

नेरळ गावातील ज्येष्ठ कार्यकर्ते गणपत धर्मा हजारे यांचे वयाच्या ८६ व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले.



नेरळ गावातील सामाजिक कार्यकर्ते रायगड जिल्हा मध्यवर्ती शहरी बँकेचे संचालक राजेंद्र हजारे यांचे ते वडील होत. शेतकरी कामगार पक्षाच्या नेरळ गावातील जडणघडणीत गणपत तथा आप्पा हजारे यांचे मोठे योगदान राहिले आहे.

# ब्रिटिशकालीन तलाव भरला पाणथळीने

## नेरळ ग्रामपंचायतीचे दुर्लक्ष
## स्वच्छ धरण झाले विद्रुप

। नेरळ । प्रतिनिधी ।

नेरळ ग्रामपंचायतीमधील गणेश घाट म्हणून ओळखला जाणारा ब्रिटिशकालीन तलाव असून या तलावाकडे नेरळकर पर्यटनाच्या दृष्टीने पहात असतात. मात्र गणेश उत्सवानंतर या तलावाला पाणथळी वेलींनी वेढा दिला आहे. या वेलींनी संपूर्ण धरणाचे क्षेत्र आपल्या बाहुपाशात आणले आहे, मात्र नेरळ ग्रामपंचायतीचे या तलावातील वेलींकडे लक्ष नाही आणि त्यामुळे स्वच्छ धरण आता विद्रुप वाटू लागले आहे.

कर्जत तालुक्यातील नेरळ ग्रामपंचायतीकडून आयोजित केला जाणारा गणेश विसर्जन सोहळा गणेश घाट आणि ब्रिटिश कालीन तलावावर मोठ्या थाटामाटात केला जातो. त्याच धरणातील पाणी शोधण्याची वेळ नेरळच्या रहिवाशी यांच्यावर



आली आहे. कारण नेरळ गावातील लोक सायंकाळी विरंगुळा म्हणून ज्या धरणावर सध्या फिरायला जातात, त्यांना त्या धरणाच्या पाण्यावर हिरवळ तरंगलेली दिसून येत आहे. ती हिरवळ नसून पाणी खराब करणारे आणि भराभर वाढणारी वेल आहे. पाणथळी वेलीने नेरळ मधील धरणाला विळखा घातला आहे. त्यामुळे हा परिसर पूर्णपणे विद्रुप झालेला दिसून येत आहे.

जानेवारी महिन्यात या धरणातील पाणी आटून जाते, मात्र यावर्षी डिसेंबर महिन्यात झालेल्या अवकाळी परंतु दिवसभर पडलेल्या पावसाच्या पाण्यात धरण पूर्ण जोमाने भरून वाहत होते. त्यानंतर मागील १५ दिवसात धरणाच्या पाण्यावर पाणथळी वेलींचा शिरकाव झाला आणि आज संपूर्ण धरण पाणथळींनी व्यापून टाकले आहे. याच धरणाच्या दोन मिनिटांच्या अंतरावर नेरळ ग्रामपंचायतचे कार्यालय आहे. त्या ठिकाणी बसणारे लोकप्रतिनिधी आणि ग्रामपंचायत कर्मचारी हे याच धरणाच्या आजूबाजूने दररोज ये-जा करीत असतात. त्यामुळे धरण व्यापणाऱ्यावेलीनेरळग्रामपंचायतीला दिसत नाहीत काय? हा प्रश्न नेरळ मधील जनतेला सायंकाळी धरणावर गेल्यानंतर सतावत आहे.

## ग्रामस्वच्छता अभियान समितीकडून दांडगुरी, वडवली गावाची पाहणी

। बोर्लीपंचतन । वार्ताहर ।

कोरोना महामारीमुळे गेली दोन वर्षे खंडित झालेले संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान शासनाने या वर्षापासुन पुन्हा सुरु केले असून जिल्हास्तरीय स्पर्धेमध्ये जिल्हा परिषद गणातील एका गावाची निवड कामाचे मुल्यमापन करुन केली जाते. त्या अनुषंगाने सन २०१९/२० च्या पाहणी अंतर्गत श्रीवर्धन तालुक्यातील जिल्हा परीषद बागमांडले गणातील सुंदर ग्राम पुरस्कारप्राप्त दांडगुरी व बोर्लीपंचतन जिल्हा परीषद गणातील सांसद दत्तक ग्राम वडवली या गावांना दि. २७ जानेवारी रोजी रायगड जिल्हा पाणी व स्वच्छता विभाग जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक जयवंत गायकवाड व सहकारी सुनील माळी



यांनी भेट दिली.

दांडगुरी गावामध्ये लोकसहभागातून व शासनाच्या विविध योजनांतून वनराई बंधारे, श्रमदानाने बांधलेले जलसंधारण बंधारे, स्मशानभूमितील रस्ता, ग्रामपंचायत कार्यालय, पाणी व्यवस्थापन, पाणपोई पाराचे सुशोभिकरण, सांडपाणी नियोजन, घर व गाव परीसराची स्वच्छता, स्वागत कमान, बसण्यासाठी बाक इत्यादी कामांची पाहणी करून दलीत वस्तीला भेट दिली. गावामध्ये लोकसहभागातून, श्रमदानातून व शासनाच्या विविध योजनांतून झालेल्या विकास कामांबद्दल जयवंत गायकवाड यांनी समाधान व्यक्त केले. यावेळी त्यांच्यासोबत किशोर नागे, शंकर मयेकर, सरपंच गजानन पाटील, उपसरपंच दत्तात्रेय पांढरकामे, जयश्री धांदरुत, प्रगती इंदुलकर, गीता पवार, वैशाली शिंदे, वडवली येथे प्रियांका नाक्ती, सुरेश धुमाळ, ग्राम पं.सदस्य व ग्रामस्थ उपस्थित होते.

## सागर गडावरील आदिवासींना साहित्याचे वाटप

। अलिबाग । वार्ताहर ।

प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून सागर माची गडावरील आदिवासींसाठी अलिबाग मधील जनकल्याण समितीतर्फे एक गाडीभर कपडे, शैक्षणिक साहित्य आणि खाऊचे वाटप करण्यात आले. तसेच यावेळी चित्रकला स्पर्धा घेवून जयश्री पाटील यांचे तर्फे तालावर कविता म्हणण्यात आल्या.

या कार्यक्रमाची आखणी विजय रानडे, संदीप दिवेकर आणि अनंत भिडे यांनी केली व त्यांना मोलाचे सहकार्य व मार्गदर्शन जया पाटील, जयवंत पाटील, विशाल घरत, बाळकृष्ण पाटील, बाबाजी, डॉ. शिवकर, रंजना नाईक सरपंच खंडाळे आदी मान्यवरांची उपस्थिती होती.



क्लिक



■ अलिबागः रायगड जिल्हा परिषद शाळा वेश्वी रूग्ण सेवा केंद्रातर्फे इयत्ता पहिली ते चौथी पर्यंतच्या २६ विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप मुख्याध्यापिका अश्विनी लांगी यांच्या हस्ते करण्यात आले.

## म्हसळ्यात कवी संमेलन साजरे

। म्हसळा । वार्ताहर ।

भारतीय स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून व्हिजन एज्युकेशन फाऊंडेशन आणि तहसील कार्यालय म्हसळा यांच्या संयुक्त विद्यमाने 'आजादी का अमृत महोत्सव' या उपक्रमांतर्गत 'एक शाम राष्ट्रीय एकात्मता के नाम' कवी संमेलन व मुशायरा या कार्यक्रमाचे आयोजन घनसार कॉम्प्लेक्सच्या सभागृहात आयोजित करण्यात आला होते. तहसीलदार समीर घारे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या या कविसंमेलनास सुप्रसिद्ध कवी नईम परकार, पोलीस निरीक्षक उद्धव सुर्वे, नायब तहसीलदार महसुल पाटील, कार्यक्रमाची संकल्पना मांडणारे तथा अध्यक्ष व्हिजन फाऊंडेशन डॉ. मुबशीर जमादार, डॉ.मुबशीर कैवल, कविता देवगावकर आदी मान्यवर उपस्थित होते.

अनेक कवींनी या कविसंमेलनात सहभाग दर्शवून संमेलनाची शोभा वाढविली. त्यामध्ये प्रथम क्रमांक मुस्तुफा सैयद याने पटकवला. द्वितीय क्रमांक रणजित चौहान तर तिसरा क्रमांक अर्चना येलवे हिने मिळविला.

## माटवणच्या नवीन शाळागृहाचे उद्घाटन

### शेकापक्षाकडून विकासकामांना प्राधान्य - एकनाथ गायकवाड

। पोलादपूर । प्रतिनिधी ।

तालुक्यातील ग्रामीण भागात विकासकामे न करता सामाजिक व भावनिक राजकारण करून मते घेणाऱ्या नेत्यांना वेळोवेळी सत्ता मिळत असली तरी नेहमीच विकासकामे करून झाल्यानंतर मतांची अपेक्षा केली असून जनतेनेही विकासकामांसाठी आम्हाला साथ दिली असल्याचा अनुभव रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक एकनाथ गायकवाड यांनी सांगितला.

पोलादपूर तालुक्यातील माटवण ग्रामपंचायत हद्दीतील रायगड जिल्हा परिषदेच्या शाळेच्या नवीन इमारतीचे उद्घाटन प्रजासत्ताकदिनाचे





औचित्य साधून एकनाथ गायकवाड यांच्याहस्ते करण्यात आले. याप्रसंगी ग्रामस्थमंडळी आणि शेकापक्षाचे कार्यकर्ते आवर्जून उपस्थित होते.

याप्रसंगी माटवण ग्रामस्थांनी शाळेची संरक्षक भिंत व शाळेकडे जाण्यासाठी रस्ता शेतकरी कामगार पक्षाच्या माध्यमातून करण्यात यावा, अशी मागणी एकनाथ गायकवाड यांच्याकडे केली.

## प्रा.डॉ.संध्या कुलकर्णी सेवानिवृत्त

। माणगाव । प्रतिनिधी ।

माणगाव येथील जे.बी.सावंत एज्युकेशन सोसायटीच्या टिकमभाई मेथा कॉमर्स कॉलेजच्या प्राचार्या डॉ.संध्या भालचंद्र कुलकर्णी या ३१ जानेवारी २०२२ रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होत असल्याने प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून बुधवारी (दि.२६) त्यांच्या सेवानिवृत्तीचा कार्यक्रम सेक्रेटरी नानासाहेब सावंत यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून प्रा.हर्षल जोशी यांनी प्रास्ताविक केले.




प्रा.डॉ.संध्या कुलकर्णी या जून २०१० मध्ये मुंबई येथील नामांकित कॉलेज सोडून त्या माणगाव सारख्या छोट्या महाविद्यालयात प्राचार्य म्हणून हजार झाल्या. सर्वात महत्त्वाचे म्हणजे बँगलोर येथील नॅक संस्थेकडून महाविद्यालयाचे नामांकन करून महाविद्यालयाला ब दर्जा प्राप्त करून दिला व १० लाख रुपये विद्यापीठ अनुदान आयोगाचा निधी मिळविला. संस्थेचा भक्कम पाठिंबा व सेक्रेटरी नानासाहेब सावंत यांच्या विश्वासावर मी १२ वर्षे प्राचार्या पद सांभाळले असे त्यांनी आपल्या मनोगतात भावना व्यक्त केल्या.

सदर कार्यक्रमाला संस्थेचे सेक्रेटरी भाऊसाहेब सावंत, डॉ. मोहन दोशी, रामदास पुराणिक, डॉ, कामेरकर, प्रा.डॉ.खामकर, करकरे, संदीप अभ्यंकर, राधिका अभ्यंकर, वैभव सावंत, लता सावंत, साने कुलकर्णी बंधू, दिलीप ढेपे, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

## लोकशाहीचे जतन करा- तहसीलदार

। नेरळ । प्रतिनिधी ।

आपण आपले ध्येय्य निश्चित केले पाहिजे आणि ते ध्येय गाठण्यासाठी आपापल्या क्षेत्रात आपण उच्च शिखरावर जाण्यासाठी प्रयत्नशील रहा. मात्र चांगले नागरिक होण्याकडे पण लक्ष द्या. मतदान करणे आपले कर्तव्य आहे हे लक्षात ठेवून लोकशाहीचे जतन करा असा महत्वपूर्ण सल्ला तहसीलदार विक्रम देशमुख यांनी येथे विद्यार्थ्यांना दिला. यावेळी त्यांनी प्रश्नोत्तरे घेऊन विद्यार्थ्यांची शाळाच घेतली. राष्ट्रीय मतदार दिनाचे औचित्य साधून कोंकण ज्ञानपीठ राहुल धारकर फार्मसी महाविद्यालयात विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.

## रोठ खु.प्राथ.शाळेस प्रिंटर भेट



। खांब-रोहा । वार्ताहर ।

रोहे तालुक्यातील धाटाव औद्योगिक वसाहतीमधील कलर्स उत्पादनात अग्रगण्य असलेल्या निलिकॉन फुड डाईज अ‍ॅण्ड के. लि.या कंपनीचे वतीने रोठ खु.प्राथमिक शाळेस प्रिंटर भेट देण्यात आले.

येथील ग्रा. पं.सदस्य सचिन मोरे यांच्या प्रयत्नातून सदर प्रिंटर कंपनी व्यवस्थापक गजानन बामणे व समीर पाटील यांच्या तसेच अन्य मान्यवरांचे हस्ते शाळेस भेट देण्यात आले आहे. सामाजिक बांधिलकीचे नात्यातून निलिकॉन कंपनीच्यावतीने गेली अनेक वर्षे शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात समाजोपयोगी विविधांगी असे उपक्रम राबविले जात आहेत. त्याच उपक्रमाचा एक भाग म्हणून सदरचे प्रिंटर भेट देण्यात आले आहे. यावेळी रोठ खु.शाळेतील मुख्याध्यापक व शिक्षकवृंद तसेच रोठ खु.ग्रामस्थ उपस्थित होते.

## माणगावमध्ये राष्ट्रीय मतदार दिन साजरा

। माणगाव । प्रतिनिधी ।

माणगाव येथील जे.बी.सावंत एज्युकेशन सोसायटीच्या टिकमभाई मेथा कॉमर्स कॉलेजमध्ये शासन निर्णयानुसार राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे मंगळवारी (दि.२५) दूरचित्रपरिषदेद्वारे सर्व कोव्हिड १९ चे नियम पाळून राष्ट्रीय मतदार दिन साजरा करण्यात आला. राष्ट्रीय सेवा योजना प्रमुख प्रा.हर्षल जोशी यांनी राष्ट्रीय मतदार दिनाचे महत्व सांगितले. प्रा.संध्या कुलकर्णी यांनी नवमतदारांना मतदार नोंदणी करण्याचे आवाहन केले. सदर कार्यक्रमानिमित्त निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, प्रश्नमंजुषा, रांगोळी स्पर्धा व घोषवाक्ये स्पर्धांचे आयोजन केले होते. तहसीलदार प्रियांका आयरे कांबळे व निवडणूक शाखा माणगाव यांच्या सहकार्याने हा कार्यक्रम घेण्यात आला.

## ३७ वाड्यांवर जल उपसा सिंचनासाठी साहित्य वितरण

। पनवेल । वार्ताहर ।

प्रजासत्ताक दिनानिमित्त दीपक फर्टीलायझर आणि ईशान्य फाऊंडेशन यांच्यावतीने सीएसआर अंतर्गत परिसरातील ३७ वाड्यांवरील लाभार्थींना दीपक फर्टिलायझर कंपनीचे प्लांट हेड राधेश्याम सिंग, पनवेल पंचायत समितीचे माजी सभापती तसेच शेतकरी कामगार पक्षाचे पनवेल विधानसभा अध्यक्ष काशिनाथ पाटील, नगरसेविका अरुणा किरण दाभणे तसेच एव्हीपी कॉर्पोरेट अफेयर्स कंपनीचे अरुण शिर्के, सिनियर मॅनेजर अभिजित शिंदे यांच्या हस्ते जल उपसा सिंचनासाठी साहित्य वितरण करण्यात आले.

तळोजा विभागामध्ये दीपक फर्टिलायझर कंपनीच्या सीएसआर उपक्रमांतर्गत व ईशान्य फाउंडेशन मार्फत सन २०१२-१३ पासून परिसरातील आदिवासी वाड्यांवर कार्यक्रम राबवला जात आहे. या कार्यक्रमाचे मुख्य उद्दीष्ट हे शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवणे व कुटुंबाचा सर्वांगीण विकास साधणे असे असून या कार्यक्रमांतर्गत एका लाभार्थ्यास अर्धा एकर क्षेत्रावर आंबा लागवड करण्यास मदत केली जाते. तसेच या झाडांचे योग्य संगोपन करण्यासाठी शेतकऱ्यांना प्रशिक्षण, लागणारी खते व औषधे, पाणी व्यवस्थापनासाठी विविध प्रकारची जल उपसा साहित्य खरेदी करण्यास मदत केली जाते, येथील शेतकऱ्यांना भाजीपाला व फुलशेती करण्यास प्रोत्साहित केले जात असून त्यासाठी लागणारे बियाणे व रोपे देखील या उपक्रमांतर्गत दिले जात आहेत.

## उरण पोलीस ठाण्यात आरोग्य शिबीर

। उरण । वार्ताहर ।

उरण येथील श्री समर्थ कृपा सखी स्वयं सहाय्यता संस्था व शिवराज युवा प्रतिष्ठान उरण यांच्या संयुक्त विद्यमाने भारतीय प्रजासत्ताक दिनानिमित्त बुधवारी (दि.२६) उरण पोलीस ठाण्यात पोलीस कर्मचारी व त्यांच्या परिवाराकरिता आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. मेडलाईफ फाऊंडेशनचे संस्थापक भूषण शिरूडे, संचालक डॉ.भुषण शाक्यवीर व डॉक्टरांच्या टीमने ४७ पोलीस कर्मचाऱ्यांच्या आरोग्याची तपासणी केली.



### ॥ ४७ कर्मचाऱ्यांची केली तपासणी

यावेळी श्री समर्थ कृपा सखी स्वयं सहाय्यता संस्थेचे संस्थापक-संगीता सचिन ढेरे, सुप्रिया सरफरे, पुजा प्रसादे, अनघा ठाकूर, विशाखा म्हात्रे, वैशाली पाटील, मीना रावल, मंजू कुमार, शिवराज युवा प्रतिष्ठानचे संस्थापक संदेश ठाकूर, सचिन ढेरे, योगेश म्हात्रे, दिपक प्रसादे, धनंजय भोरे, राजेश सरफरे, सचिन भोईर, उमेश वैवडे, ओम पाटील, सत्यवान भगत, मेडलाईफ फाउंडेशनचे संस्थापक भूषण शिरूडे, संचालक डॉ. भुषण शाक्यवीर आदी मान्यवर उपस्थित होते. सदर आरोग्य शिबीर यशस्वी करण्यासाठी श्री समर्थ कृपा सखी स्वयंसहाय्यता संस्था व शिवराज युवा प्रतिष्ठानच्या पदाधिकाऱ्यांनी विशेष मेहनत घेतली.

## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

■ WORK FROM HOME ९५०३०५८६२४

■ नामांकीत कंपनीसाठी जागा विकत घेणे आहे
J.V.प्रापर्टी, बंगलो प्रोजेक्ट व कमरशील अलिबाग, मांडवा, मुरुड येथे संपर्क - ९९६०८०७८२८/९९२३ १३५४४४/९०२२९६६७०२.

■ ड्रायव्हर हवा आहे. Pickup/407
टेम्पोवर अनुभवी ड्रायव्हर हवा आहे.
१४०००/१५००० गोविंद गोपाळ अँड कंपनी
झिराड- ८००७८९३२३२/९४२१९५४३४८

जाहिरातीसाठी संपर्क
☎ (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

## अखेर मुरूड-काशीद बीचवर पर्यटकांची हजेरी

*। मुरूड-जंजिरा । वार्ताहर ।*

*कोरोनामुळे ठप्प झालेले पर्यटन आणि पर्यटकांची रोडावलेली उपस्थिती हळूहळू पूर्वपदावर येईल असे चित्र शनिवारी काशीद आणि मुरूड बीचवर दिसून आले. शनिवारी मुरूड, काशीद बीचवर खूप दिवसांनी पर्यटकांची मोठी गर्दी सायंकाळी दिसून आली. यामुळे पर्यटकांअभावी दुखावलेले लॉजिंग, हॉटेल्स, बचतगट, स्टॉलधारक सुखावल्याचे दिसून आले.*



*थंडीचा मोसम असल्याने पर्यटक खुशीत दिसत होते. मुरूड किनाऱ्यावर शनिवारी ५० टक्केच पर्यटक हजर होते.*

### पर्यटकांअभावी दुखावलेले व्यावसायिक सुखावले

*तसेच पर्यटकांना भावणारी किंवा आवडणारी पर्यटन स्थळे बंद केली तर ते हिरमुसतात, पून्हा येण्याचे टाळतात. त्यामुळे लोकप्रियतेला ओहोटी लागते अशी माहिती पुणे, मुंबईतील पर्यटक दिगंबर कामत, विशाखा ढेरे, नंदिनी वर्मा, सुरेश पाटकर, नाझीया शेख आदी पर्यटकांनी सायंकाळी मुरूड बीचवर बोलताना दिली. पर्यटन वाढीस शासनाने एकवाक्यता ठेवून पर्यटन विकसित करुन हसते खेळते ठेवल्यास झपाट्याने आधिक वाढीस लागेल असे मत अनेक पर्यटकांनी व्यक्त केले.*

> जंजिरा जलदुर्ग बंद असल्याने रविवारी देखील बाह्य दर्शन घ्यावे लागणार आहे. जंजिरा जलदुर्ग बंद असल्याने पर्यटक येत नाहीत, त्यामुळे पर्यटन व्यवसायावर मोठा विपरीत परिणाम झाला आहे
> – मितेश वरसोलकर, वाघोबा धाबाचे चालक, मुरुड

# तहान भागविणाऱ्या विहीरीशेजारी स्मशानभूमीचा घाट

## महिला ग्रामस्थांचा विरोध



। पाली/बेणसे । वार्ताहर ।

जिल्ह्यातील खेडोपाडी दिवसेंदिवस पिण्याच्या पाण्याचे दुर्भिक्ष होत असताना, मिळकतखार, मळा तसेच सारळ म्हाप्रोली ग्रामस्थांची तहान भागविणाऱ्या विहीरीशेजारी स्मशानभूमीचा घाट घालण्यात येत आहे. देवळाजवळ स्मशानभूमी नको, या भूमिकेतून या घाट घालण्यात येत असून, यास महिला ग्रामस्थांनी कडाडून विरोध केला आहे.

पाणी हे जीवन आहे. अवघी सजीवसृष्टी पाण्यावर निर्भर आहे. पाणी नाही तर जगणे ही मुश्किल असे असताना आजही रायगड जिल्ह्यातील अनेक गावे, वाड्या वस्त्या पिण्याच्या पाण्यासाठी वर्षानुवर्षे धडपडताना, संघर्ष करताना दिसत आहेत. कोट्यवधींच्या शासन योजना व नळपाणी पुरवठा योजना लालफितीत तर धूळखात पडल्यासारखी परिस्थिती आहे.

यातच रायगड जिल्ह्यातील मिळकतखार मळा तसेच सारळ-म्हाप्रोली गावातील ग्रामस्थांपुढे पिण्याचे पाणी मिळवण्याचे मोठे आव्हान आहे. मिळकतखार मळा गावातील महिला, पुरुष, वृद्ध व लहान मुले यांची तहान भागविताना मोठी दमछाक होते. नदीला बारमाही पाणी नसत्ते, त्यातच ज्यावेळी पाणी असेल ते उपलब्ध खारे पाणी उपयुक्त नसल्याने पिण्याच्या पाण्यासाठी वणवण भटकंतीच यांच्या नशिबी आहे.

गावातील घरापासून कोसो दूर खडकाळ, चढउतार व काटेरी कुटेरी वाट तुडवीत विहिरीजवळ पोहचावे लागते, तेथून पाणी उपसून डोक्यावर हंड्याच्या दुडी घेऊन उन्हातान्हात दमछाक करीत माघारी परतावे लागते. पाण्यासाठी येथील ग्रामस्थांना मोठी कसरत करावी लागते. याठिकाणी असलेली विहीर मळा व म्हाप्रोली ग्रामस्थांची तहान भागवते.

मात्र आता या विहिरीजवळ असलेल्या मोकळ्या जागेत काही ग्रामस्थांनी स्मशानभूमी करण्यासाठी पुढाकार घेतला आहे. स्मशानभूमी शेजारी असलेल्या विहिरीतील पाणी पिता येणार नाही, आधीच

**पाणी व स्मशानभूमी या दोन विषयाला घेऊन मोठा प्रश्न निर्माण झालाय. मळा मिळखतखार येथील गावाला जलजीवन मिशन अंतर्गत पाणीपुरवठा योजना प्रस्तावित असून योजना जलद कार्यान्वित झाल्यास इथला देखील पाणी प्रश्न सुटेल मात्र सद्यस्थितीत या प्रश्नी जिल्हास्तरीय प्रशासनाने बैठक लावून चर्चा करून तोडगा काढल्यास मार्ग निघू शकेल. असे सरपंच अमृता नाईक यांनी प्रसारमाध्यमांना सांगितले आहे.**

पिण्याच्या पाण्याचे मोठे दुर्भिक्ष व संकट शिरावर असताना येथील विहीर निरुपयोगी झाली तर पाण्यासाठी खूप हाल होतील, ग्रामस्थांना पाण्यावाचून तडफडून मरावे लागेल म्हणत, महिला व ग्रामस्थांनी सदरच्या स्मशानभूमीला कडाडून विरोध दर्शविला आहे.

सारळ ग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या गावातील देवळालगत दोन गुंठे जागेवर स्मशानभूमी व्हावी अशी मागणी जोर धरत आहे, तर देवळाजवळ स्मशानभूमी नको म्हणत काही ग्रामस्थ विहिरीजवळ असलेल्या मोकळ्या जागेतच स्मशानभूमी होईल या जिद्दीला पेटले आहेत.

परिणामी याठिकाणी स्मशानभूमी झाल्यास दोन गावांना पाणीपुरवठा करणारी पाणेरी विहीर पडीक होईल, यामुळे ग्रामस्थ संतप्त झालेत. कडक उन्हाळ्यात या विहिरीचा मोठा आधार आहे, पाणी पुरवठा करणारी विहीर अत्यंत उपयुक्त असून तिच्या वापराने किमान ४०० घरांची तहान भागत आहे. अशात जोपर्यंत येथील गावाला जलजीवन मिशन योजनेअंतर्गत नळपाणी पुरवठा नियमित सुरू होत नाही, तोपर्यंत प्रस्तावित स्मशानभूमीचे काम करू नये असा एकमुखी निर्धार स्थानिक ग्रामस्थांनी केला आहे.

> **सारळ ग्रामपंचायतीच्या अंतर्गत येणारी व सभोवताली असलेल्या १४ गावांना इथं पाणी उपलब्ध करून देण्यासाठी विहिरींची सुविधा दिली आहे. देवळाजवळ दोन गुंठे जागा आहे पण तिथे स्मशानभूमी करीत नाहीत. शिवाय इथे एक दर्गा आहे व ट्रान्सफार्मर आहे, म्हणून स्मशानभूमी नकोच.**
> **– शीतल पेडणेकर, सारळ ग्रामस्थ**

> **इथली विहीर ही १४ गावांसाठी आलेली विहीर आहे. सर्वांना या विहिरीतून मुबलक पाणी मिळत. मात्र काही ग्रामस्थ एकाच गावासाठीच ही विहीर असल्याचे सांगतात, हे योग्य नाही, पाणी हे माणसाचं जीवन आहे ते जीवनच तुम्ही खुंटून घेतलं तर माणसांनी जगायचं कसं? जर याठिकाणी स्मशानभूमी झाली तर प्रेताची राख, कपडे, गाद्या, उशा, हार फुले नदीत मिसळून पाणी दूषित होईल त्या पाण्याचा वापर करता येणार नाही. म्हणून आम्ही स्मशानभूमीला विरोध करीत आहोत.**
> **– प्रतिज्ञा परशुराम नाईक, स्थानिक ग्रामस्थ महिला**

## बालिका दिनानिमित्त वक्तृत्व स्पर्धा



। अलिबाग । शहर वार्ताहर ।

मुरुड तालुक्यातील मिठेखार येथे राष्ट्रीस बालिका दिनानिमित्त वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत परिसरातील विद्यार्थ्यांनी उत्स्फुर्त सहभाग नोंदविला.

नेहरु युवा केंद्र, रायगड अलिबाग यांच्या वतीने जिल्हा युवा अधिकारी निशांत रौतेला यांच्या प्रमुख मार्गदर्शनांतर्गत या कार्यक्रमाचे आयोजन मुरुड ब्लॉक एनवायकेव्ही केतन गोरीवले यांनी केले होते. ही स्पर्धा प्राथमिक आणि माध्यमिक या दोन शैक्षणिक गटात घेण्यात आली. याप्रसंगी अशोक गोखले, दीप्ती वाडेर आणि नंदकिशोर वाडेर हे प्रमुख मान्यवर उपस्थित होते.

या स्पर्धेत प्राथमिक गटातून श्रेया नंदकुमार घाग, मुद्रा महेश पाटील आणि श्रावणी सुनील म्हात्रे यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांकाचे यश संपादित केले आहे. तर माध्यमिक गटात रिया सुरेश तांबडे हिने प्रथम, सृष्टी मोहन बापलेकर हिने द्वितीय तर निधी नंदकुमार घाग हिने तृतीय क्रमांकाचे यश मिळविले आहे.

## नामफलकाचे अनावरण

। रसायनी । वृतसंस्था ।

मोहोपाडा येथील स्थानिक रहिवाशांचे ठिकाण म्हणून शिवनगर गावची ओळख आहे. या गावामध्ये येण्यासाठी चांभार्ली थांब्यावरुन शिवनगर स्थानिकांच्या वसाहतीकडे येण्यासाठी नागरिकांची रस्ता शोधताना दिशाभूल होऊ नये, तसेच हनुमान मंदीराच्या वळणावर शिवनगर गावातील श्री गणेश मंदिराकडे जाणारा दिशादर्शक नामफलक लावण्यात आला आहे. दरम्यान परगावातील येणाऱ्या नागरिकांना शिवनगर गाव शोधताना रस्त्यांची अडचण येवू नये, यासाठी हे फलक लावण्यात आले आहे.

## पनवेल शहर पोलीस ठाण्यात हळदीकुंकू समारंभ

। पनवेल । वार्ताहर ।

प्रजासत्ताक दिनाचे औचित्सर साधत पनवेल शहर पोलीस स्थानकातील महिला पोलीस कर्मचारी यांच्यासोबत मनसेतर्फे हळदीकुंकू समारंभ साजरा करण्यात आला. याप्रसंगी सॅनिटायझर आणि मास्कचे वाटप करण्यात आले.

ऑन ड्युटी २४ तास आपल्याला मदतीसाठी सदैव तत्पर असणारे पोलीस बांधव आणि भगिनी कोणताही सण असो वा कार्यक्रम तरीही आपले कर्तव्य चोखपणे बजावत असतात. त्यांना कोणत्याच सणवाराला सुट्टी नसते. अशाच पोलीस कर्मचारी भगिनींसाठी पनवेल शहर पोलीस ठाण्यात कोरोनाचे सर्व नियम पाळून हळदीकुंकू समारंभाचे आयोजन करण्यात आले होते.

याप्रसंगी मनसेच्या रायगड महिला जिल्हाध्यक्षा आदिती सोनार, सचिव रुपाली मुरकुटे, यांच्यासह सर्व महिला पदाधिकारी तसेच महिला सैनिक उपस्थित होते.

**ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन**

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

## इसांबे ग्रामपंचायत हद्दीत सिसीटिव्ही कॅमेरांचे उदघाटन

। रसायनी । वार्ताहर ।

इसांबे ग्रुप ग्रामपंचायत हद्दीतील नागरिकांच्या सुरक्षतेची काळजी घ्यावी या उद्दात विचारांतून तसेच वाढती लोकसंख्यामुळे चोरी तसेच अन्य प्रकार घडत असल्यामुळे ग्रामस्थांना कोणत्याही संकटाला सामोरे जावू नये, यासाठी खालापूर पोलीस निरिक्षक अनिल विभुते यांच्या हस्ते सिसीटिव्ही कॅमेरांचे उद्घाटन करण्यात आले.

यावेळी एपीआय गणेश कराड, हेड कॉन्स्टेबल निलेश कांबळे, सुभाष म्हात्रे, अमित सावंत, पोलीस नाईक आबा गेंद उपस्थित होते. तसेच ग्राम पंचायत इसांबे येथे सर्व या कॅमेरांचे नियंत्रण असल्याने कोणताही औचित्य प्रकार घडल्यास तिसरा डोळा आरोपी यांना शोधण्याची महत्वपूर्ण भूमिका बजावत असणार आहे.

ग्रामपंचायत परिसरात सिसीटिव्ही असावे अशी संकल्पना ग्रामपंचायतीने घेतल्याने थोड्या दिवसात संपूर्ण ग्राम पंचायत गावे अदिवासीवाडी रस्त्याच्या ठिकाणी, रहदारी मार्ग अशा विविध ठिकाणी हे कॅमेरे बसविण्यात आले. नेटली सर्विस अब्दुलरझाक शेख यांच्या माध्यमातून हे कॅमेरे बसविण्यात आले आहेत.



**महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ**
(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

**ई-निविदा सूचना क्रमांक ७२/२०२१-२०२२(मुंबई)**

म.औ.वि.महामंडळातर्फे खालील कामांकरीता ई-निविदा सूचना मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र | कामाचे नाव | अंदाजित रक्कम रुपये |
|---|---|---|
| १. | महाड औद्योगिक क्षेत्रातील पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरुस्ती... बाजीरे येथे सावित्री नदीवरील धरणाच्या डाव्या खालच्या बाजूला गॅबियन भिंत बांधणे. | रु. ४२,२९,९१४.०० |
| २. | रोहा औद्योगिक क्षेत्रातील पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरुस्ती... फिल्टर, केमिकल हाऊसच्या बाह्य पृष्ठभागावर व स्टोअर वरील टेरेस व जॅकवेलला एचडीआरए आणि एई प्रकारच्या संरक्षणात्मक कोटिंगची प्रक्रिया करणे. | रु. ४०,९७,११०.०० |
| ३. | रोहा औद्योगिक क्षेत्रातील सांडपाणी निःसारण योजनेची देखभाल व दुरुस्ती... ए रस्त्यालगतच्या सांडपाणी संकलन वाहिनीचा खराब झालेला व चोकअप झालेला भाग बदलणे. | रु. ४१,९६,६४४.०० |
| ४. | नागोठणे औद्योगिक क्षेत्राची देखभाल व दुरुस्ती... अशुद्ध जलउदंचन केंद्र नागोठणे येथील २२/०.४३३ केव्ही स्विचयार्ड मधील खराब झालेले लोड ब्रेक स्विच, स्मार्ट लोड ब्रेक स्विचने बदलणे. | रु. ३८,९०,०००.०० |
| ५. | पेण अलिबाग विभागाच्या पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरुस्ती... मे. गेल यांच्या एलपीजी रिकव्हरी प्लॅन्ट करीता व रुटवरील गावांकरीता टाकण्यात आलेल्या ४०० मि.मी. व्यासाच्या सीआय प्रकारच्या जलवाहिनीची वार्षिक तत्वावर देखभाल व दुरुस्ती करणे. | रु. ६,८०,४२५.०० |
| ६. | रोहा औद्योगिक क्षेत्रातील पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरुस्ती... विविध ठिकाणी अँडवान्सड अर्ली स्ट्रीमर एमिशन (ईएसई) लाइटिंग प्रोटेक्शन सिस्टीमचा पुरवठा करुन उभारणे. | रु. ३९,६८,८६३.०० |

उपरोक्त कामांकरीता निविदा प्रपत्र दिनांक ३१/०१/२०२२ ते दिनांक १४-०२-२०२२ पर्यंत महामंडळाच्या http://www.midcindia.org या संकेतस्थळावर उपलब्ध असतील.

इच्छुकांनी वरील कामांबाबत दिनांक ०३-०२-२०२२ पूर्वी त्यांचे प्रश्न महामंडळाच्या संकेत स्थळावर नोंदवावेत. कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण/महामंडळाचा खुलासा दिनांक ०८-०२-२०२२ पासून महामंडळाच्या संकेत स्थळावर उपलब्ध होईल.

**वाचकांसाठी निवेदन**

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**मुख्य संपादक**

**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, आमचे पक्षकार श्री. गुलफाम अहमद समानी यांनी खालील वर्णन केलेली बिनशेती प्लॉट मिळकत त्या मिळकतीचे मालक श्री. सरफराज ग्यासुद्दिन खान व इतर यांचेकडून विकत घेण्याचे ठरवले आहे.

**मिळकतीचे वर्णन :**
**मौजे-ममदापूर, ता. कर्जत, जि. रायगड**

| सर्व्हे नं. | प्लॉट नं. | क्षेत्र चौ.मी. | आकार | |
|---|---|---|---|---|
| | | | रुपये | पैसे |
| १७१ | ८ | ५३७.५४ | ५३ | ७५ |

सबब सदर बाबत कोणाचीही दान, गहाण, साठेकरार, खरेदीखत, ताबा,कब्जा, वहिवाट, बक्षीसपत्र लिज अथवा अन्य कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांच्याकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत दाखल करावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार केला जाईल. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक :- २७-०१-२०२२
पत्ता : ब्लॉक नं. १०३, बुरहान प्लाझा कॉलेज रोड, आयुष नर्सिंग होमसमोर ममदापूर, ता. कर्जत, जि. रायगड
मो. ९०११५५५८०१

सही/-
**ॲड. अल्ताफ लियाकत डोंगरे**
(वकील उच्च न्यायालय)

**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, खाली वर्णन केलेली मिळकत आमचे अशिल श्री. पांडुरंग निवृत्ती दाभाडे, रा. घर नं. १३२, मालवाडी, पो. इंदुरी, ता. मावळ-मालवाडी, पुणे-४१०५०७ यांनी कायम खरेदी घेण्याचे ठरविले आहे.

मौजे सालवड, ता. कर्जत, जि. रायगड येथील मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे,

| जमीन मालक | सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| १) कीथ नोयेल सायमन डिसोजा<br>२) डॅरल सायमन डिसोजा<br>३) फे. मर्वीन आल्मेडा<br>४) शामिन ज्यूड डिसोंजा | ४७ | ४ | ०-२३-०० | ०.२८ |

तरी वरील मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा, कोणताही व कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध, ताबा-कब्जा, कुळवहिवाट, बोजा, चार्ज, पोटगी हक्क, मृत्यूपत्रांकित दान, गहाण, बक्षीस, फरोक्त, लिन, वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून २१ दिवसांचे आत खालील सही करणार यांचेकडे सकृतदर्शनी पुराव्यासह लेखी हरकत कळविणेस विनंती आहे. वरील मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल वरील मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील, मागाहून येणाऱ्या तक्रारी/हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, हे सर्वास कळावे.

तारीख : ३१-०१-२०२२

**ॲड. कल्याणी रवी गायकर**
पत्ता : प्रेमसिंधु अपार्टमेंट, कोतवालनगर-कर्जत, जि. रायगड
मो.नं. ८४४६१४८७८१

## सुधीर कोटकर यांचे निधन

। उरण । वार्ताहर ।

परिसरात मॉर्निंग वॉकसाठी बाहेर पडलेल्या एका नागरिकाचे अज्ञात वाहनाच्या धडकेने निधन झाले आहे. सुधीर बाळकृष्ण कोटकर असे या नागरिकाचे नाव असून, या अपघातानंतर आरोपी वाहनचालक वाहनासह फरार झाला आहे.

याबाबतचे सविस्तर वृत्त असे की, उरण कोटनाका येथील सुधीर बाळकृष्ण कोटकर हे नेहमीप्रमाणे आज पहाटे बोकडविरा पोलीस चौकी परिसरातील रस्त्यावर आपली सायकल घेऊन मॉर्निंग वाकसाठी गेले होते. सायकल उभी करुन पायी मॉर्निंग वाकसाठी जात असताना भरधाव आलेल्या अज्ञात वाहनाने सुधीर कोटकर यांना जोरदार धडक मारून पसार झाला.

या धडकेने सुधीर कोटकर यांचा मृत्यू झाल्याने कोटगाव परिसरात शोककळा पसरली. वर्षभरापूर्वी त्यांचे मोठे बंधू सुनील कोटकर यांचे निधन झाले होते. सुधीर कोटकर यांच्या जाण्याने कोटकर कुटूंबियांना दुहेरी झटका बसला आहे. उरण परिसरातून भाजीपाला, प्रवासी वाहतूक करणाऱ्या गाड्या व अवजड वाहने ही भरधाव वेगाने नेहमीच येजा करीत असताना त्यांच्या वेगावर नियंत्रण नसते. यामुळेच छोटे मोठे अपघात वारंवार घडत आहेत. मात्र आजच्या अपघातात सुधीर कोटकर यांचा मृत्यू झाल्यानेच हे उघड झाले.

**कृषी उत्पन्न बाजार समिती, अलिबाग**
**अलिबाग, जि. रायगड**
**जाहीर नोटीस**
मो.नं. ७२७६२५११०७/८८८८१०७२१९

कृषी उत्पन्न बाजार समिती, अलिबाग या समितीचे आर्थिक वर्ष दि. १-०४-२०२२ पासून सुरु होत आहे. कृषी उत्पन्न बाजार समितीचे कार्यक्षेत्र संपूर्ण अलिबाग तालुका व उरण तालुका (३३ गावे) आहेत. बाजार समितीने नियमित केलेले धान्य, कडधान्य, नारळ, सुपारी, मिरची व मसाल्याचे पदार्थ, तेलबिया, पशुपक्षी, गुरेढोरे, कोंबड्या, अंडी, शेळ्या-मेंढ्या, बकऱ्या, सर्व प्रकारचा भाजीपाला (पालेभाज्या), कांदे, बटाटे, जळावू लाकूड, बांबू, सर्व प्रकारची फळे व फुले यासारख्या शेतीमालाच्या खरेदी विक्री चा व्यवहार करणारे व्यापारी, कमिशन एजंट, प्रक्रिया करणारे शेती मालाची साठवण करणारे, स्टोरेज सुपरीटेन्डंट, हमाल, तोलाई, दलाल व त्यांचे मदतनिस वगैरे संबंधित इसमांनी सन २०२२-२०२३ सालाकरीता नियम ५ अ अन्वये अनुज्ञप्तीच्या (लायसेंस) नुतनीकरणासाठी दि. १-०२-२०२२ ते २८-०२-२०२२ पर्यंत अनुज्ञप्ती नुतनीकरण फी कार्यालयीन वेळेमध्ये भरुन अनुज्ञप्ती नुतनीकरण करुन घ्यावे.

दि. १-०२-२०२२ ते २८-०२-२०२२ या मुदतीत अनुज्ञप्तीचे नुतनीकरण न केल्यास तद्नंतर विलंब आकारसह (प्रतिदिन रु. २०/-) प्रमाणे दंड आकारणी करुन नुतनीकरण करुन देण्यात येईल. तरी वर नमूद केल्याप्रमाणे समितीच्या कार्यक्षेत्रातील नियमित शेत मालाचे खरेदी विक्री चा व्यवहार करणारे स्वस्त धान्य दुकानदार व संबंधित अधिकारी महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह अधिकारी व सब एजन्टस हे बाजार समितीचे लायसेंस घेणे पात्र ठरतील.

समितीने नियमित केलेल्या शेतमालाच्या खरेदी विक्रीचा व्यवहार विना अनुज्ञप्तीने (विना लायसेंस)अलिबाग बाजार समितीच्या कार्यक्षेत्रात करीत असतील त्यांच्यावर महाराष्ट्र कृषी उत्पन्न खरेदी विक्री (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ व नियम १९६७ नुसार योग्य ती पुढील कारवाही करणेंत येईल व होणारे सर्व परिणामांची व खर्चाची जबाबदारी त्यांचेवर राहील. अनुज्ञप्ती न घेणारे इसम गुन्ह्यास पात्र ठरतील.

अनुज्ञप्ती नुतनीकरणासाठी करावयाचे अर्ज व इतर माहिती कार्यालयीन वेळेत समितीचे कार्यालयात मिळू शकतील.

**श्री. मंगेश रा. राऊत** — **सहा.सचिव**
**श्री. आर.डी.मोरे** — **प्र. सचिव**
**श्री. कमळाकर गो. साखळे** — **सभापती**

**कृषी उत्पन्न बाजार समिती, अलिबाग, जि. रायगड**

**टिप** - सर्व अनुज्ञप्ती (लायसन्स) धारकांनी आपले कडील खरेदीचे सन २०२१-२२ चे खरेदीचे अहवाल सादर करुन येणे असलेली बाजार फी व सुपरव्हीजन फीच्या रक्कमा कार्यालयात भरणा कराव्यात. अन्यथा त्यांचे लायसेन्स नुतनीकरण केले जाणार नाही याची नोंद घ्यावी.

कार्यालय - फ्लॅट नं. ८, पहिला मजला, बिल्डींग नं. २, सी विंग, पी.एन.पी. नगर, अलिबाग.

**ग्रुप ग्रामपंचायत विहुले, ता. माणगाव, जि. रायगड**
**जाहीर निविदा जा.क्र. दिनांक ३१-०१-२०२२**

ग्रुप ग्रामपंचायत विहुले यांचेकडील आर.आर.(आबा) पाटील सुंदर गाव पुरस्कार योजना/१५ वित्त आयोग अंतर्गत खालील कामांकरीता अधिकृत साहित्य पुरवठादार यांचेकडून जाहीर निविदा मागविणेत येत आहेत.

| अ.क्र. | कामांचे नाव | कामांचे परिमाण (संख्या) | निधीचा स्त्रोत | अंदाजपत्रकीय रक्कम | निविदा स्वीकारण्याचा अंतिम दिनांक व वेळ | निविदा उघडणेचा दिनांक व वेळ | कामपूर्ण करणेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | विहुले ग्रामपंचायत आय.एस.ओ. प्रमाणिकरण करणे. | १ | आर.आर.(आबा) पाटील सुंदर गाव पुरस्कार योजना | ४००००/- | ०४-०२-२०२२ वेळ स.१०.०० ते सायं. ५.०० वा. | ०७-०२-२०२१ | ३ महिने |
| २ | ग्रामपंचायत हद्दीमध्ये सौर पथदिवे बसविणे. | ६ | आर.आर.(आबा) पाटील सुंदर गाव पुरस्कार योजना | १,२०,०००/- | ०४-०२-२०२२ वेळ स.१०.०० ते सायं. ५.०० वा. | ०७-०२-२०२१ | ३ महिने |
| ३ | विहुल कोंड व विहुले अंगणवाडी सौर सिस्टीम बसविणे. | २ | आर.आर.(आबा) पाटील सुंदर गाव पुरस्कार योजना | १,२०,०००/- | ०४-०२-२०२२ वेळ स.१०.०० ते सायं. ५.०० वा. | ०७-०२-२०२१ | ३ महिने |
| ४ | विहुले कोंड येथे सार्वजनिक ठिकाणी कचराकुंड्या बसविणे. | १० | आर.आर.(आबा) पाटील सुंदर गाव पुरस्कार योजना | ४००००/- | ०४-०२-२०२२ वेळ स.१०.०० ते सायं. ५.०० वा. | ०७-०२-२०२१ | ३ महिने |
| ५ | ग्रा.पं.हद्दीतील कुटूंबाना ओला व सुका कचरा संकलन करणे करिता कचरा पेटी पुरविणे. | ७५० | आर.आर.(आबा) पाटील सुंदर गाव पुरस्कार योजना | २,००,०००/- | ०४-०२-२०२२ वेळ स.१०.०० ते सायं. ५.०० वा. | ०७-०२-२०२१ | ३ महिने |
| ६ | विहुले येथे सनिटरी नपकीन डिस्पोजल मशीन बसविणे. | १ | आर.आर.(आबा) पाटील सुंदर गाव पुरस्कार योजना | १००००/- | ०४-०२-२०२२ वेळ स.१०.०० ते सायं. ५.०० वा. | ०७-०२-२०२१ | ३ महिने |
| ७ | महिला बचत गटास प्रशिक्षण देणे | १ | आर.आर.(आबा) पाटील सुंदर गाव पुरस्कार योजना | ३००००/- | ०४-०२-२०२२ वेळ स.१०.०० ते सायं. ५.०० वा. | ०७-०२-२०२१ | ३ महिने |
| ८ | रा.जि.प.शाळा विहुले येथे प्रोजेक्टर पुरविणे. | १ | १५ वित्त आयोग सन २०२१-२२ | ३५०००/- | ०४-०२-२०२२ वेळ स.१०.०० ते सायं. ५.०० वा. | ०७-०२-२०२१ | ३ महिने |
| ९ | विहुले व विहुले अंगणवाडी येथे एल ई डी टीव्ही पुरविणे. | २ | १५ वित्त आयोग सन २०२१-२२ | ३८४०१/- | ०४-०२-२०२२ वेळ स.१०.०० ते सायं. ५.०० वा. | ०७-०२-२०२१ | ३ महिने |
| १० | विहुले व विहुले कोंड शाळा व अंगणवाडी यांना स्वच्छता संबंधी साहित्य पुरविणे. | १ | १५ वित्त आयोग सन २०२१-२२ | २३२८१/- | ०४-०२-२०२२ वेळ स.१०.०० ते सायं. ५.०० वा. | ०७-०२-२०२१ | ३ महिने |

**अटी व शर्ती :-** १) निविदा संबंधी सविस्तर माहिती ग्रामपंचायत कार्यालयात कार्यालयीन वेळेत पहावयास मिळेल.
२) कोणतेही कारण न देता एक किंवा सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे.
३) निविदा स्विकृती अंतिम दि. ०४-०२-२०२२ असून अपूर्ण व उशिरा पोहचलेल्या निविदांचा ग्रामपंचायत . विचार करणार नाही
४) साहित्य /वस्तू यांचा दर्जा व गुणवत्ता चांगली असावी.
५) कार्यारंभ आदेश प्राप्त झाल्यापासून विहित केलेल्या मुदतीचे कालावधीत साहित्य पुरविणे बंधनकारक राहील. अन्यथा नियमानुसार दंड व शास्ती लागू करणेत येईल.
६) साहित्य पुरवठादार यांचे बँक खाते राष्ट्रीयकृत बँकेत असावे व PFMS प्रणालीशी संलग्न असावे.
७) निविदा मंजुरीअंती साहित्य पुरवठादार यांस रीतसर करारनामा करुन द्यावा लागेल.
८) कामाच्या तरतुदीनुसार साहित्य पुरविणे बंधनकारक राहील..
९) मा. सरपंच ग्रा. पं. विहुले यांचे देखरेखीखाली कामे पूर्ण करावयाची आहेत.

दिनांक :- ३१-०१-२०२२
ग्रा.पं. विहुले

**श्रीम. साक्षी सा.भोनकर**
**ग्रामसेवक ग्रुप ग्रा.पं. विहुले**
**ता. माणगाव, जि. रायगड**

**श्री. पांडुरंग धों. चाळके**
**सरपंच ग्रुप ग्रा.प. विहुले**
**ता. माणगाव, जि. रायगड**

# युवा टीम इंडिया सेमी फायनलमध्ये

## बांगलादेशचा उडविला धुव्वा



**। अँटिग्वा । वृत्तसंस्था ।**
भारताच्या युवा संघाने दिमाखात अंडर १९ वर्ल्डकपच्या उपांत्यफेरीत प्रवेश केला आहे. अँटिंग्वा येथे झालेल्या क्वार्टर फायनलच्या सामन्यात युवा टीम इंडियाने बांगलादेशवर ११५ चेंडू आणि पाच गडी राखून विजय मिळवला. गतविजेत्या बांगलादेशला नमवून युवा टीम इंडियाने दोन वर्षांपूर्वी अंडर १९ वर्ल्डकपच्या अंतिम फेरीत झालेल्या पराभवाचा वचपा काढला. त्यावेळी दक्षिण आफ्रिकेत बांगलादेशने भारताला पराभूत करुन अंडर १९ वर्ल्डकपचे विजेतेपद मिळवले होते. उपांत्यफेरीत भारताचा सामना ऑस्ट्रेलिया विरुद्ध होणार आहे. बांगलादेशने दिलेल्या ११२ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना भारताने पाच विकेट गमावल्या. कर्णधार यश धुल नाबाद (२०) आणि कौशल तांबे नाबाद (११) यांनी भारताच्या विजयावर शिक्कामोर्तब केले.

कर्णधार यश धुलचा नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय भारतीय गोलंदाजांनी सार्थ ठरवला. त्यांनी अख्ख्या बांगलादेशच्या टीमला १११ धावांवर ऑलआऊट केले. त्यामुळे भारताला सोपे लक्ष्य मिळाले. या लक्ष्याचा पाठलाग करताना भारताची सुरुवात चांगली झाली नाही. सलामीवीर हरनुन सिंगला दुसऱ्याच षटकात तंझीम हसन साकीबने भोपळाही फोडू न देता तंबूत पाठवले. त्यानंतर अंगक्रिष रघुवंशी आणि शेख राशिदने डाव सावरला.

दुसऱ्या विकेटसाठी त्यांनी ७० धावांची भागीदारी केली. रिपॉन मंडलने ही जोडी फोडली. त्याने रघुवंशीला (४४) धावांवर बाद केले. पुढच्याच चेंडूवर त्याने सेट झालेल्या राशिदला सुद्धा (२६) धावांवर बाद केले. सिद्धार्थ यादव (६) आणि राज बावाला भोपळाही फोडू न देताना मंडलने पॅव्हेलियनचा रस्ता दाखवला. अखेर धुल आणि तांबेने भारताच्या विजयावर शिक्कामोर्तब केले.

### रवी कुमार सर्वात यशस्वी गोलंदाज

*भारताकडून रवी कुमार सर्वात यशस्वी गोलंदाज ठरला. त्याने सात षटकात १४ धावा देत सर्वाधिक तीन विकेट घेतल्या. विकी ओस्तवालने आपल्या फिरकीच्या तालावर बांगलादेशी फलंदाजांना नाचवलं. त्याने दोन विकेट घेतल्या. कौशल तांबे, राजवर्धन, आणि अंगक्रिष रघुवंशीने प्रत्येकी एक विकेट घेतला. दोन फलंदाज धावबाद झाले. भारताला तुलनेने सोपे लक्ष्य मिळाले.*

# ऋषभ पंतकडे येणार मोठी जबाबदारी

### लवकरच होणार घोषणा

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**
येत्या सहा फेब्रुवारीपासून भारत आणि वेस्ट इंडिजमध्ये वनडे मालिकेला सुरुवात होणार आहे. वनडे नंतर दोन्ही संघांमध्ये तीन टी-२० सामन्यांची मालिका होणार आहे.

अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर ही वनडे सामन्यांची मालिका होणार आहे. वेस्ट इंडिज विरुद्धच्या पहिल्या वनडेसाठी ऋषभ पंतच्या नावाची उपकर्णधार म्हणून घोषणा करण्यात येऊ शकते. दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या वनडे



सीरीजसाठी केएल राहुल संघाचा उपकर्णधार होता. पण रोहितच्या अनुपस्थितीत त्याला नेतृत्वाची संधी मिळाली. पण राहुलच्या नेतृत्वाखाली खेळणाऱ्या टीम इंडियाचा दक्षिण आफ्रिकेकडून ३-० असा पराभव झाला.

केएल राहुल पहिल्या वनडेमध्ये खेळणार नाहीय. त्याच्याजागी पंतकडे उपकर्णधारपदाची जबाबदारी दिली जाऊ शकते. बीसीसीआयमधील सुत्रांनी पंतला उपकर्णधार बनवण्याच्या वृत्ताला दुजोरा दिला आहे. शिखर आणि ऋषभ दोघेही उपकर्णधारपदाची जबाबदारी संभाळण्यासाठी सक्षम आहेत. ऋषभ विकेटकिपर असल्यामुळे रिव्ह्यू घेणे, क्षेत्ररक्षण लावणे, यामध्ये त्याची भूमिका, सल्ला महत्त्वाचा असतो. त्यामुळे एका सामन्यासाठी त्याला उपकर्णधार बनवले जाऊ शकते असे बीसीसीआय अधिकाऱ्यांनी सांगितले.

## वडवली येथे क्रिकेट फेस्टिवल

**। श्रीवर्धन । वार्ताहर ।**
सालाबादप्रमाणे यंदाही महाराष्ट्र नवनिर्माण सेनेतर्फे कोपरा ग्रुप वडवली क्रिकेट फेस्टिवल २०२२ चे आयोजन करण्यात आले आहे. सदरच्या स्पर्धा दि.३ ते ६ फेब्रुवारी दरम्यान श्री गुलामभाई पेशईमाम मैदान, वडवली फाटा ता. श्रीवर्धन येथे खेळविण्यात येणार आहेत. तरी रसिकांनी या स्पर्धेला रसिकांनी जास्तीत जास्त हजेरी लावावी असे आवाहन करण्यात आले आहे.

# नाईट अंडरआर्म बॉक्स क्रिकेट स्पर्धा

**। श्रीवर्धन । वार्ताहर ।**
श्रीवर्धन येथील आझाद क्रिकेट क्लब आयोजित नाईट अंडरआर्म बॉक्स क्रिकेट स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. सदरच्या स्पर्धा या दि.५ फेब्रुवारी रोजी सायं.६ वाजता श्रीवर्धन नगरपरिषद शाळा क्र.१ येथे भरविण्यात आल्या आहेत. या स्पर्धेमध्ये एक हजार रूपये प्रवेश फी आकारण्यात आली आहे. तसेच स्पर्धेत प्रथम क्रमांक ११ हजार १११ रुपये, द्वितीय ७ हजार ७७७ रूपये व आकर्षक चषक व मालिकावीर व सामनावीर यांस मनगटी घड्याळ पारितोषिक म्हणून देण्यात येणार आहे. या स्पर्धेमध्ये ४० वर्षावरील सर्व खेळाडू खेळविले जाणार असून प्रत्येक संघात ८ खेळाडू असणार आहेत. तरी या स्पर्धेच्या अधिक माहितीसाठी शिरीष पाटील ७८२३८४४८६८, सुनील दर्गे ९२२५७९९९८०, शैलेश खापणकर ८८८८१६६८६८, पिंट्या वेश्विकर ९४२०३२४०१६, जितेंद्र मापुस्कर ७२७६५६८००४ यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे.

## आशियाई स्पर्धेत विश्वनाथन आनंद होणार मेंटॉर

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**
यंदाची आशियाई स्पर्धा २०२२ चीनमध्ये १० सप्टेंबर पासून सुरू होत आहे. ऑल इंडिया चेस फेडरेशनला त्यांचे पुरूष आणि महिला संघ आशियाई स्पर्धेत मेडल पदक जिंकतील अशी आशा आहे. यासाठी फेडरेशनने दिग्गज ग्रँडमास्टर विश्वनाथन आनंदला एक वेगळी भुमिका देऊ केली आहे.

ऑल इंडिया चेस फेडरेशनने आपल्या अधिकृत वक्तव्यात म्हटले आहे की, आम्ही आशियाई स्पर्धेत आमचे चार सुवर्ण पदके जिंकण्याचे टार्गेट असेल. त्यासाठी आम्ही दिग्गज ग्रँडमास्टर विश्वनाथन आनंदला एक वेगळी भुमिका देणार आहोत. तो आता संघाचा मेंटॉर असणार आहे. खेळाडूंचे त्याच्यासोबतचे पहिले सत्र पुढच्या गुरूवारपासून सुरू होईल.

ऑल इंडिया चेस फेडरेशनने स्पर्धेची तयारी लवकर सुरू केली आहे. त्यांनी १० पुरूष आणि १०



महिला खेळाडूंचा संभाव्य संघ देखील निवडून ठेवला आहे. हे संघ खेळाडूंचे आंतरराष्ट्रीय रँकिंग लक्षात घेऊन निवडला आहे. पुरूष संघात वैदित गुजराथी, पी हरीकृष्णा, निहाल सरिन, एस.एल नारायणन, के. ससिकिरण, बी. अधिबन, कार्तिकेयन मुरली, अर्जुन इरिगासिस, अभिजीत गुप्ता आणि सूर्या शेखर गांगुली यांचा समावेश आहे. तर महिलांच्या संघात के. हम्पी, डी. हरिका, वैशाली आर., तानिया सचदेव, भक्ती कुलकर्णी, वनतिका अग्रवाल, मेरी ॲन गोमेज, सौम्या स्वामिनाथन आणि इशा करवडे यांचा समावेश आहे.

## केएसएतर्फे फुटबॉलच्या तयारीला सुरुवात

**। कोल्हापूर । वृत्तसंस्था ।**
दोन वर्षांनंतर आशेचे संकेत दिसलेल्या फुटबॉल खेळाडूंनी मातृसंस्था असणाऱ्या कोल्हापूर स्पोर्टस् असोसिएशनकडे नोंदणी केली. कोरोनाची लाट आणि प्रशासनाचे निर्बंध लक्षात घेऊनच हंगाम होणार असला, तरीही गडहिंग्लजच्या खेळाडूंनी या नोंदणीत भाव खाल्ला. जिल्हांतर्गत खेळाडू या नोंदणीची अट ठेवल्याने शहराबाहेर एकमेव ठिकाण असणारे गडहिंग्लज हॉट फेव्हरेट ठरले आहे. के.एस.ए.तर्फे यंदाचा फुटबॉल हंगाम खेळण्याच्या तयारीला सुरवात झाली आहे.

पहिल्यांदा संघ नोंदणी आणि आता प्रत्येक संघासाठी खेळाडू नोंदणीची प्रक्रिया ऑनलाईन पद्धतीने पार पडली. यात १६ संघांची नोंदणी झाली असून, प्रत्येक संघामध्ये २० या पद्धतीने एकूण ३२० खेळाडूंनी नोंदणी केली आहे.

# तनया मंचेकरचा महाराष्ट्र राज्य पुरस्काराने सन्मान

**। अलिबाग । वार्ताहर ।**
ट्रॅडिशनल रेसलिंग या क्रीडा प्रकारात अलिबागच्या तनया किरण मंचेकर हिने केलेल्या सर्वोत्तम कामगिरीमुळे ती महाराष्ट्रातील सर्वोत्कृष्ट खेळाडू ठरली आहे. यासाठी तिला 'अभिमान महाराष्ट्राचा' या २०२२ सालच्या महाराष्ट्र राज्य पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. २७ जानेवारी रोजी पनवेल येथे झालेल्या समारंभात सन्मानपत्र व ट्रॉफी देऊन तिचा गौरव करण्यात आला. या पुरस्काराने रायगडच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

ज्या क्रीडा प्रकारांवर आतापर्यंत पुरुष खेळाडूंचे राज्य होते, त्या प्रकारात अलिबागच्या या कन्येने लहान वयातच कर्तृत्वाचा ठसा उमटवला आहे. तिला हा पुरस्कार २०२१-२२ मधील ट्रॅडिशनल रेसलिंग या




क्रीडाप्रकारातील कामगिरीसाठी देण्यात आला आहे. त्याचबरोबर तिने गोवा येथे झालेल्या ऑल इंडिया कराटे चॅम्पीयनशीपमध्ये कराटे व ट्रॅडिशनल रेसलिंगमध्ये गोल्ड मेडल मिळवण्याची कामगिरी केलेली आहे. यापुर्वी अहमदनगर मधील शिर्डी येथे सिलंबम राज्यस्तरीय स्पर्धेत स्टिक फाईट या क्रीडा प्रकारातही तिला गोल्डमेडल मिळालेले आहे. कु. तनया मंचेकर हिच्या या कामगिरीबद्दल तिचे सर्व स्तरातून कौतुक होत असून अनेकांनी तिला प्रत्यक्ष भेटून भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## पुण्यतिथीनिमित्त महात्मा गांधी यांना विनम्र अभिवादन

**वर्षा मेहता**
**। अलिबाग ।**
नेटिझन्सनी महात्मा गांधींना त्यांच्या ७४ व्या पुण्यतिथीनिमित्त आदरांजली वाहिली आणि असे विचार व्यक्त केले की, राष्ट्रपिता यांच्या उदात्त आदर्शांना आणखी लोकप्रिय करण्याचा हा सामूहिक प्रयत्न आहे. बापूंना त्यांच्या पुण्यतिथीला स्मरण करत आहे. त्यांच्या उदात्त आदर्शांना आणखी लोकप्रिय करण्याचा आमचा सामूहिक प्रयत्न आहे. आज शहीद दिनी, धैर्याने आपल्या देशाचे रक्षण करणाऱ्या सर्व महापुरुषांना आदरांजली वाहतो. त्यांची सेवा आणि शौर्य कायम स्मरणात राहील, असे ट्विट पंतप्रधान मोदींनी केले.

भारताच्या स्वातंत्र्यासाठी प्राणांची आहुती देणाऱ्या स्वातंत्र्यसैनिकांच्या स्मरणार्थ

SOCIAL MEDIA पडसाद



महात्मा गांधी यांची पुण्यतिथी देशभरात शहीद दिन म्हणून पाळली जाते. पंतप्रधान नरेंद्र मोदी, राष्ट्रपती राम नाथ कोविंद आणि इतर प्रमुख राजकीय नेते नवी दिल्लीच्या राजघाटावर महात्मा गांधींना श्रद्धांजली अर्पण केली. केंद्र सरकारने राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांना सकाळी ११ वाजता शहीद स्वातंत्र्यसैनिकांच्या स्मरणार्थ दोन मिनिटे मौन पाळण्याचे निर्देश दिले होते.

३० जानेवारी १९४८ रोजी नथुराम गोडसेने नवी दिल्लीतील बिर्ला हाऊस येथे महात्मा गांधी म्हणून प्रसिद्ध असलेल्या मोहनदास करमचंद गांधी यांची हत्या केली होती.

# टी-२० मालिकेसाठी वेस्ट इंडीज संघाची घोषणा

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**
वेस्ट इंडीजने भारताविरुद्धच्या आगामी तीन आंतरराष्ट्रीय टी-२० सामन्यांच्या मालिकेसाठी १६ जणांचा संघ जाहीर केला आहे. भारत आणि वेस्ट इंडिज यांच्यातील तीन एकदिवसीय सामने संपल्यानंतर १६ फेब्रुवारीपासून टी-२० मालिका सुरू होणार आहे. मुंबई इंडियन्सचा स्टार क्रिकेटपटू कायरन पोलार्ड संघाचा कर्णधार असेल तर निकोलस पूरन उपकर्णधाराची भूमिका बजावणार आहे. शमराह ब्रूक्स, एनक्रुमाह बोनर आणि केमार रोच हे खेळाडू

**॥ मालिकेसाठी १६ जणांचा संघ जाहीर**

आहेत ज्यांना एकदिवसीय मालिकेत संधी मिळाली, परंतु त्यांना टी-२० संघात स्थान मिळालेले नाही.

वेस्ट इंडीजचा संघ सध्या इंग्लंडविरुद्ध पाच टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांची मालिका खेळत आहे. वेस्ट इंडीजने पहिल्या तीन सामन्यात २-१ अशी आघाडी कायम ठेवली आहे.

कायरन पोलार्डच्या नेतृत्वाखालील संघाची गेल्या काही काळापासून चांगली कामगिरी झालेली नाही.

कॅरेबियन संघ २०२१ च्या टी-२० विश्वचषक स्पर्धेच्या जेतेपदाचा प्रबळ दावेदार मानला जात होता, परंतु त्याचा प्रवास गट टप्प्यातच संपला.

### भारताविरुद्ध वेस्ट इंडीजचा टी-२० संघ

**कायरन पोलार्ड (कर्णधार), निकोलस पूरन (उपकर्णधार), फॅबियन ॲलन, डॅरेन ब्राव्हो, रोस्टन चेस, शेल्डन कॉट्रेल, डॉमिनिक ड्रेक्स, जेसन होल्डर, शाई होप, अकील होसेन, ब्रेंडन किंग, रोव्हमन पॉवेल, ओडिन रोमॅरियो शेफर्ड, काइल मेयर्स आणि हेडन वॉल्श.**

***टी-२० सामन्यांचे वेळापत्रक***
*१६ फेब्रुवारी - पहिला टी-२० सामना - कोलकाता*
*१८ फेब्रुवारी - दुसरा टी-२० सामना - कोलकाता*
*२० फेब्रुवारी - तिसरा टी-२० सामना - कोलकाता*

# वेस्ट इंडिज विरुद्धच्या सीरीजसाठी भारताची जोरदार तयारी

**॥ शाहरुख खानसह साई किशोर स्टँडबायवर**

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**
भारताने वेस्ट इंडिज विरुद्धच्या आगामी वनडे मालिकेसाठी आधीच संघाची घोषणा केली आहे. निवड समितीने या संघामध्ये आणखी दोन खेळाडुंची नावे जोडली आहेत. सध्यातरी हे दोन्ही खेळाडू मुख्य संघाचा भाग नसतील. पण गरज पडल्यास त्या दोघांचा टीम इंडियामध्ये समावेश केला जाईल. बीसीसीआयने सध्या या दोन्ही खेळाडूंना स्टँडबायवर ठेवले आहे.

शाहरुख खान आणि साई किशोर अशी बीसीसीआयने स्टँडबायवर



ठेवलेल्या दोन खेळाडुंची नावे आहेत. आगामी वेस्ट इंडिज विरुद्धच्या वनडे सीरीजसाठी दोन खेळाडूंना स्टँडबायवर ठेवण्याचा निर्णय शनिवारी घेण्यात आला. कोरोनाच्या तिसऱ्या लाटेचा सीरीजवर कुठलाही परिणाम होऊ नये, यासाठी बोर्डाने हा निर्णय घेतला आहे.

शाहरुख खान तामिळनाडूचा मधल्याफळीतील फलंदाज आहे. सामना संपवण्याची क्षमता त्याच्याकडे आहे. देशांतर्गत स्पर्धा आणि आयपीएलमध्ये शाहरुख खानने फिनिशरचा खेळ दाखवला आहे. त्याशिवाय फिरकी गोलंदाज साई किशोरलाही तयार ठेवण्यात आले आहे. या दोघांशिवाय तामिळनाडूच्याच वॉशिंग्टन सुंदरचा वेस्ट इंडिज विरुद्धच्या वनडे मालिकेसाठी आधीच संघात समावेश करण्यात आला आहे.

### टी.नटराजनला मिळू शकते संधी

**डावखुरा वेगवान गोलंदाज टी.नटराजनचा तामिळनाडूच्या रणजी संघात समावेश होऊ शकतो. पण त्याआधी त्याला फिटनेस टेस्ट पास करावी लागेल. नटराजनच्या गुडघ्याला दुखापत झाली आहे. त्यामुळे मागच्या दोन महिन्यांपासून तो संघाबाहेर आहे. त्याला टीम इंडियात स्थान मिळालेले नाही. रणजी करंडक स्पर्धा १३ फेब्रुवारीपासून सुरु होईल. यामध्ये विजय शंकर तामिळनाडूचे नेतृत्व करेल.**


## कृषीवल
## क्रीडा संघटनांना आवाहन

रायगड जिल्ह्यात विविध क्रीडा स्पर्धा आयोजित केल्या जात आहेत. त्यामुळे क्रीडाक्षेत्रात नैपुण्य मिळविण्याची संधी खेळाडूंना मिळत आहे. त्यामधून क्रीडापटू तयार व्हावेत आणि त्यांना यथायोग्य प्रसिद्धी लाभावी यासाठी कृषीवलतर्फे सर्वच क्रीडा स्पर्धांच्या आयोजनाची तसेच स्पर्धा झाल्यानंतरचे वृत्त कृषीवलमध्ये विनामुल्य प्रसिद्ध केले जाणार आहे. यासाठी सर्व क्रीडा संघटना,आयोजकांना आवाहन करण्यात येते की त्यांनी आयोजित केल्या जाणाऱ्या स्पर्धांची सविस्तर माहिती, स्पर्धेचे उद्घाटन,स्पर्धेचे बक्षिस वितरण आदींची माहिती कृषीवलकडे krushivalnews@gmail.com या मेलवर पाठवावी.त्यास तातडीने प्रसिद्धी दिली जाईल.

**स्पर्धेसाठी माध्यम प्रायोजकबाबत कृषीवल कार्यालयाशी संपर्क साधावा.**

- मुख्य संपादक





## भगवद्गीता स्पर्धा

**हजारो वर्षांची परंपरा लाभलेल्या भगवद्गीतेचे महत्त्व भावी पिढीलाही ज्ञात व्हावे, हा उदात्त दृष्टिकोन समोर ठेवून इस्कॉन 'हरे कृष्ण' नामहट, अलिबाग केंद्रातर्फे विद्यार्थी तसेच खुल्या गटासाठी भगवद्गीता पाठांतर स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. ही स्पर्धा विनामूल्य असून, विजयी होणाऱ्यांना रोख बक्षिसेही दिली जाणार आहेत.**

**विद्यार्थी गट- ५ वी ते १० वी,**
**खुला गट- ११ वी ते पुढे (मुला/मुलींसाठी)**
**दैनिक कृषीवलमध्ये दररोज छापून येणाऱ्या भगवद्गीतेतील प्रत्येक अध्यायानंतर १० प्रश्न विचारले जातील. त्याची उत्तरे दोन्ही गटांनी द्यायची आहेत. प्रत्येक गटासाठी पुढीलप्रमाणे बक्षिसे दिली जातील.**
*(प्रथम क्रमांक ५ हजार रुपये, द्वितीय ३ हजार रुपये, तृतीय २ हजार रुपये, उत्तेजनार्थ १ हजार रुपये)*
**अधिक माहितीसाठी तसेच प्रश्नाची उत्तरे सादर करण्यासाठी खालील पत्त्यावर संपर्क साधावा.**

**श्री. गुरुनाथ बळीराम नाईक, पत्ता- संत रोहिदास नगर, 'वृंदावन' घर क्र. ७२, चेंढरे कावेरी बिल्डींग समोर ९४२३०९१०८१**
**पाठांतर केलेले श्लोक सादर करण्याची वेळ व ठिकाण वेळोवेळी जाहीर केले जाईल.**


कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ MH/MR/RGD/RNP-16/2018-20 (31-12-2021)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर ■ मुख्य संपादक : इब्राहीम अफगाण* ■ डिजिटल आवृत्ती संपादक : माधवी माणिक सावंत
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)